# सत्याग्रह आश्रमाचा इतिहास

**मो. क. गांधी**

अनुवाद

**ब्रिजमोहन हेडा**

# सत्याग्रह आश्रमाचा इतिहास

(गांधीजींनी हा इतिहास येरवडा तुरुंगात ५ एप्रिल १९३२ ला लिहायला सुरुवात केली. यावर त्यांनी थांबून थांबून काम केले आणि याचा शेवटचा उपलब्ध भाग ११ जुलै १९३२ लिहिलेला आहे. तुरुंगातून मुक्त झाल्यानंतर त्यांनी हे हस्तलिखित काकासाहेब कालेलकरांना दाखवले आणि म्हणाले, “हे काम मी पूर्ण करू शकलो नाही. यात दुरुस्त्या करणे अतिशय आवश्यक आहे. मी हे कधीकाळी पूर्ण करून शकेन की नाही हे मला माहीत नाही. हे ज्या स्वरूपात आहे त्या स्वरूपात हे प्रकाशित करणे योग्य नाही. यात दुरुस्त्या केल्यानंतरच मी हे तुम्हाला देईन.” काकासाहेब म्हणाले. “जे काही लिहिले आहे त्याच्या मी प्रती करून टाकेन.” आणि त्यांनी गांधीजींच्या हातातून जवळपास हे हस्तलिखित ओढून घेतले. परंतु मूळ प्रत उपलब्ध न होऊ शकल्यामुळे नवजीवन प्रकाशन मंदिराने काकासाहेबांजवळ उपलब्ध प्रतीच्या आधारे मे १९४८मध्ये गुजरातीत ‘सत्याग्रहाश्रमाचा इतिहास’ प्रकाशित केला. इंग्रजीत याचा अनुवाद वा. गो. देसाईंनी केला आहे आणि नवजीवन प्रकाशन मंदिराने तो १९५५ साली ‘आश्रम ऑब्झर्व्हेशन्स इन ऍक्शन’ या शीर्षकाअंतर्गत प्रकाशित केला. हिंदीतील हा अनुवाद गुजरातीतून नवजीवन प्रकाशनच्या पहिल्या आवृत्तीच्या आधारे करण्यात आला आहे आणि आता मी तो हिंदीतून मराठीत करतो आहे. गुजराती पुस्तकाच्या शेवटी दिलेले परिशिष्ट, जे संपूर्ण गांधी वांङ्मयाच्या खंड ३६ पृष्ठ ४३९-४० वरून मी देत आहे.)

११-७-१९३२

## प्रास्ताविक

आश्रमाचा अर्थ इथे सामुदायिक जीवन आहे. आजच्या दृष्टीने भूतकाळाचा विचार करताना मला असे वाटते की अशा प्रकारचा आश्रम माझ्या स्वभावतच होता. जेव्हापासून मी वेगळे घर केले तेव्हापासूनच माझे घर आश्रमाच्या वरील व्याख्येतील दोन अटींप्रमाणे आश्रमासारखेच होऊन गेले होते. असे म्हणता येऊ शकते की गृहस्थाश्रम उपभोगाकरिता नसून धर्माकरिता आहे. तरीही त्यात कुटुंबातील लोकांप्रमाणे कोणते ना कोणते मित्र असतातच. आणि ते एक तर धार्मिक संबंधामुळे येतात वा ते आल्यानंतर त्या संबंधांना धार्मिक करण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. अशा प्रकारे हा प्रयत्न १९०४ सालापर्यंत नकळत सुरू होता. १९०४ साली मी रस्किनचे ‘सर्वोदय’ वाचले (पाहा ‘अन टू धिस लास्ट’) आणि त्याचा माझ्यावर विजेप्रमाणे प्रभाव पडला. ‘इंडियन ओपिनियन’चा छापखाना जंगलात नेऊन तिथे मजुरांसोबत सामूदायिक वा कौटुंबिक जीवन व्यतीत करण्याचा मी निश्चय केला. मी शंभर बिघे जमीन विकत घेतली आणि तिथे आश्रमाची स्थापना केली. त्या वेळी आमच्या या संस्थेला मी माझ्या मनात वा बाह्यतः आश्रम म्हणायला शिकलो नव्हतो. याचा एक भाग धर्म निश्चितच होता, परंतु अंतर्गत आणि बाह्य स्वच्छता आणि समानता वगैरे उद्दिष्ट साध्य करण्याचे काम शिल्लक राहिलेले होते. त्यावेळी ब्रह्मचर्याची आवश्यकता ना तर वाटली होती ना त्याचे महत्त्व कळले होते. इतकेच

नाही तर उलट त्या वेळी माझे असे मत होते की सर्व सहकारी गृहस्थजीवनाचे अनुसरण करतील आणि लोकसंख्या वाढवतील. फिनिक्सचा हा संक्षिप्त इतिहास 'दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास' यात आला आहे.

हे पहिले पाऊल आहे असे आपण समजू या.

असे म्हणता येईल की दुसरे पाऊल १९०६ साली उचलण्यात आले. सेवेचे जीवन व्यतीत करण्याकरिता अनुभवाने ब्रह्मचर्याची आवश्यकता सिद्ध झाली. आणि तेव्हापासून फिनिक्सला मी धार्मिक संस्था समजू लागलो. माझ्या मनात त्याबदल धार्मिक रूप तयार होऊ लागले. याच वर्षी राजकीय सत्याग्रहाची सुरुवात झाली. त्याच्या मुळाशी तर धर्मच होता. सत्यस्वरूपी परमेश्वरावर अविचल श्रद्धा हा त्याचा आधार होता. इथे धर्म शब्दाचा कोणीही संकुचित अर्थ करू नये. 'धर्म' शब्दाचा अर्थ आहे वेगवेगळ्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सर्व धर्मांना जोडणारा आणि एकाच रूपात पाहता येणारा परमधर्म.

१९११ पर्यंत अशाच प्रकारे सुरू राहिले. इतक्या वर्षात फिनिक्स संस्थेची आश्रमाच्या रूपात ओळख नसतानाही आश्रमाच्या रूपात प्रगती होत राहिली असे मी समजतो.

१९११ साली तिसरे पाऊल उचलण्यात आले. आजपर्यंत फिनिक्समध्ये तेच लोक कायम स्वरूपी राहू शकत होते ज्यांचा मुद्रणालयात उपयोग होत होता. परंतु आता सत्याग्रहाच्या कामाकरिता अशा आश्रमाची आवश्यकता जाणवली की जिथे सत्याग्रही कुटुंब राहू शकेल आणि धार्मिक जीवन जगू शकेल. या वेळेपर्यंत मी जर्मन मित्र कॅलेनबाकच्या संपर्कात आलेलो होतो. आम्ही दोघेही एकाच प्रकारचे आश्रमजीवन व्यतीत करत होतो. मी वकिली करत होतो आणि कॅलेनबाक आपल्या स्थापत्याचा व्यवसाय करत होता. असे असूनही आम्ही दूर आणि विरळ वस्तीत असे जीवन व्यतीत करत होतो की ज्याला तुलनात्मक दृष्टीने अतिशय साधे जीवन म्हणता येईल. आणि त्याचबरोबर आमचे मन यथाशक्ती धर्मात लागलेले असायचे. नकळत भरपूर चुका झाल्या, परंतु प्रत्येक कामात आम्ही धर्माची मुळे शोधण्याचा प्रयत्न करत असू. नंतर जेव्हा सत्याग्रही कुटुंबांची संख्या वाढली तेव्हा आम्हांला सोबत राहण्याची आवश्यकता जाणवू लागली. यामुळे कॅलेनबाकने ११०० चौरस बिघे जमीन विकत घेतली आणि तिथे सत्याग्रही कुटुंब राहू लागले. इथे पावलोपावली धार्मिक प्रश्न उपस्थित होत राहिले आणि ही संस्था धार्मिक दृष्टीने चालू लागली. या संस्थेत हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारसी सर्व राहत होते. या कारणाने कधीही चिडाचिडी वा भांडण झाले असल्याचे मला मुळीच आठवत नाही. याचबरोबर तिथे राहणाऱ्या लोकांमध्ये आपापल्या धर्माबद्दल शैथिल्य होते असेही नाही. आमच्या मनात

एकमेकांच्या धर्माबद्दल आदर होता आणि आपापल्या धर्माप्रमाणे चालण्याकरिता आणि आपला आध्यात्मिक विकास करण्याकरिता आम्ही एकमेकांना प्रेरित करत होतो.

असे असले तरी ही संस्था 'सत्याग्रह आश्रम' म्हणून ओळखली जात नव्हती. हीचे नाव 'टॉलस्टॉय फार्म' ठेवण्यात आले होते. कॅलनबॅक आणि मी, आम्ही दोघेही टॉलस्टॉयचे पुजारी होतो, आणि त्यांच्या बहुतेक विचारांची अंमलबजावणी करण्याचा आम्ही भरपूर प्रयत्न करत होतो. १९१२ साली ही संस्था सत्याग्रही निवास राहिली नाही आणि ज्या कोणाला सोबत राहायचे होते ते फिनिक्ला निघून गेले. टॉलस्टॉय फार्मच्या इतिहासाची ज्यांना माहिती करून घ्यायची असेल ते 'दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास' पाहू शकतात.

आता फिनिक्स 'इंडियन ओपिनियन'च्यासंबंधात सुरू झालेली संस्था राहिले नाही. आता ते सत्याग्रहाची संस्था होऊ लागले. हे स्वाभाविक होते कारण 'इंडियन ओपिनियन'च्या अस्तित्वाकरिता हीच संस्था जबाबदार होती. परंतु हा बदल काही समान्य नव्हता. फिनिक्सवासीयांचे जीवन अस्थिर झाले आणि या अस्थिरतेत सत्याग्रहीप्रमाणे त्यांच्यांवरही स्थैर्य शोधण्याची वेळ आली. यामुळे ते पराभूत झाले नाही. इथेही मला टॉलस्टॉय फार्मप्रमाणेच सर्वांकरिता एकच स्वयंपाकघर ठेवण्याची आवश्यकता जाणवली. परंतु काही लोक त्यात सामील झाले, काही नाही. सायंकाळच्या सामुदायिक प्रार्थनेचे दिवसेंदिवस महत्त्व वाढत गेले आणि त्यानुसार तिची व्याप्ती वाढत गेली. सत्याग्रहींच्या अखेरच्या लढाईची सुरुवात तर फिनिक्सवासियांद्वारेच झाली. (१५ सप्टेंबरला, पाहा संपूर्ण गांधी वाङ्मय, खंड २९, पृष्ठ २०८-११) ही घटना १९१३ ची आहे. १९१४ साली ही लढाई संपली. (पाहा संपूर्ण गांधी वाङ्मय, खंड २९, पृष्ठ २११-१४) जुलै महिन्यात मी दक्षिण आफ्रिका सोडली. ज्या कोणाची हिंदुस्थानात जाण्याची इच्छा होती जवळपास त्या सर्वांचे हिंदुस्थानात जाणे निश्चित झाले. मला विलायतेत गोखलेंना भेटायचे होते आणि तिथून हिंदुस्थानात जायचे होते. हिंदुस्थानात वेगळी संस्था स्थापून तिथे सर्वांची राहायची व्यवस्था करायची होती. आणि दक्षिण आफ्रिकेत मी जे सामाजिक जीवन जगायला सुरुवात केली होती ते सुरू ठेवायचे होते. यामुळे आश्रमाच्या नावाने कोणत्याही आश्रमाची स्थापना न करायचे ठरवून मी १९१४ साली हिंदुस्थानात पोहोचलो. (ही तारीख चूक आहे. गांधीजी ९ जानेवारी १९१५ साली हिंदुस्थानात पोहोचले होते. - पाहा संपूर्ण गांधी वाङ्मय, खंड १३, पृष्ठ १)

हिंदुस्थानात मी एक वर्ष तर खूप फिरलो. किती तरी संस्था पाहिल्या (सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी, शांतिनिकेतन, गुरुकुल वगैरे) आणि त्यांच्यातून बरेच काही शिकायला मिळाले. किती तरी ठिकाणांवरून आश्रम

स्थापण्याकरिता निमंत्रण मिळाले, आणि मदत करण्याचे किती तरी प्रकारचे आश्वासन मिळाले. अखेरीस अहमदाबादमध्ये आश्रम उघडण्याचा निर्णय झाला. हे चौथे आणि अखेरचे पाऊल आहे असे मी समजतो. हे शेवटचे पाऊल राहील की नाही ही तर भविष्यकालीन गोष्ट आहे. (१९३१ साली गांधीजींनी सत्याग्रहाश्रम भंग केला. १९३६ साली गांधीजी जेव्हा सेगावला पोहोचले तेव्हा तिथे आश्रम स्थापण्याचा त्यांचा विचार नव्हता. तरीही हळूहळू तो सत्याग्ह आश्रमात परिवर्तित झाला.) या संस्थेला काय नाव द्यावे, संस्थेचे नियम कोणते असावे याबद्दल मी मित्रांशी भरपूर चर्चा केली, पत्रव्यवहार केला नियमांचा मसुदा मित्रांना पाठवला आणि अखेरीस संस्थेचे नाव 'सत्याग्रह आश्रम' ठेवले. उद्देश जर लक्षात घेतला तर असे वाटते की हे नाव बरोबरच होते. माझे जीवन मी सत्याच्या शोधाकरिता समर्पित केले आहे. त्याकरिताच जगायचा आणि आवश्यकता असली तर मरायचाही माझा आग्रह आहे. त्या शोधात जितके सहकारी मिळतील त्या सर्वांना घेण्याची इच्छा आहे.

२५ मे १९१५ साली हा आश्रम कोचरब येथे एका भाड्याच्या घरात उघडण्यात आला. त्याच्या खर्चाची जबाबदारी अहमदाबादच्या काही नागरिकांनी घेतली. आश्रम उघडला तेव्हा त्यात २० (खंड १३ पृष्ठ १०१ वर गांधीजींनी ही संख्या ३५ सांगितली आहे.) लोक होते आणि त्यात बरेचसे लोक दक्षिण आफ्रिकेतून आलेले होते. त्यावेळी बरेचसे लोक दक्षिणेकडील म्हणजे तमिळ आणि तेलगू बोलणारे हिंदुस्थानी होते. त्या दिवसात लहानमोठ्या सर्वांचे मुख्य काम भाषा शिकण्याचे म्हणजे संस्कृत, हिंदी आणि तमिळ शिकण्याचे होते. मुलांकरिता दुसऱ्या सर्वसामान्य शिक्षणाची व्यवस्था होती. हातविणाई हे मुख्य काम होते. आणि त्याच कामाबरोबर सुतारी कामही चालायचे. नोकर न ठेवण्याचा आमचा आग्रह होता. यामुळे स्वयंपाक करणे, साफसफाई करणे, पाणी भरणे इत्यादी सर्व काम आश्रमवासीच करत होते. सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्वाद, अस्तेय, अपरिग्रह वगैरे व्रत आश्रमवासींकरिता अनिवार्य होते. (आश्रमाच्या घटनेच्या मसुद्याच्या कच्च्या खर्ड्याकरिता पाहा संपूर्ण गांधी वाङ्मय खंड १३ पृष्ठ ९५-१०१ आणि अंतिम घटनेकरिता पाहा खंड ३९ पृष्ठ ४१९-३१) जातिपातीचा भेदभाव मुळीच पाळला जात नव्हता. अस्पृश्यतेला आश्रमात कुठेही स्थान नव्हते. इतकेच नाही तर हिंदू समाजातील अस्पृश्यता नाहीशी करण्याला प्रमुख स्थान देण्यात आले. आणि अस्पृश्यतेप्रमाणेच हिंदू समाजातील स्त्रियांवर जी बंधने होती त्यांतील काही तोडण्याचा आग्रह आश्रमात सुरुवातीपासून घेण्यात आला होता. यामुळे आश्रमातील स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य होते. त्याचबरोबर हिंदू, मुसलमान वगैरे समाजातील लोकांमध्ये बाहेर जितका भ्रातृभाव असू शकतो तितकाच भ्रातृभाव आश्रमात पाळण्याच्या नियमाचे पालन करणे सुरू झाले.

परंतु एका गोष्टीकरिता केवळ मीच जबाबदार आहे आणि त्याकरिता मी पश्चिमेचा आभारी आहे, ही गोष्ट आहे आहारासंबंधीचे प्रयोग. १९८८ साली मी जेव्हा विलायतेत गेलो होतो तेव्हा याची सुरुवात झाली. माझ्या प्रयोगात मी माझ्या कुटुंबातील लोकांना आणि इतर सहकाऱ्यांना ओढत राहिलो. या प्रयोगाच्या मुळाशी तीन मुख्य कारणे होती. (१) स्वादेंद्रियावर म्हणजे जिभेवर आणि तिच्या माध्यमातून इतर इंद्रियांवर नियंत्रण मिळवणे. (२) साध्यात साधे आणि स्वस्तात स्वस्त आहाराचा शोध घेणे. म्हणजे गरिबांशी स्पर्धा करता यावी. (३) आहार आणि प्रकतीचा खूप जवळचा संबंध आहे. या विचाराच्या आधारावर पूर्ण स्वास्थ्याच्या रक्षणाकरिता कोणते खाद्यपदार्थ चांगले आहेत हे शोधून काढणे.

हे सांगण्याचा असा अर्थ नाही की या तीन कारणांमुळे हे प्रयोग करण्याचा मोह झाला. मी जर निरामिष जेवणाची प्रतिज्ञाकरून विलायतेत गेलो नसतो तर कदाचित आहारासंबंधी प्रयोग करण्याचे मला सुचलेच नसते. परंतु मला जेव्हा हे प्रयोग करावे लागले तेव्हा मला ही तीन कारणे खोल पाण्यात ओढून घेऊन गेली आणि मी आहारासंबंधी अनेक प्रकारचे प्रयोग करण्याकरिता प्रेरित झालो. अशा प्रकारे आश्रमसुद्धा माझ्या आहाराच्या प्रयोगात सामील झाला. परंतु हे प्रयोग आश्रमाचा भाग नाहीत.

अशा प्रकारे पाहिले तर ज्या कोणत्या गोष्टी देशाकरिता आणि समाजाकरिता दोषास्पद वाटल्या त्या दूर करण्याची़ि प्रयोग आश्रमात करावे हीच इच्छा होती. यांत धार्मिक, राजकीय आणि आर्थिक अशा सर्व दोषांचा समावेश होतो. जसजसे अनुभव येत गेले आणि प्रसंग येत गेले तसतसे नवीन काम सुरू होत गेले. आज हे लिहवून घेत असताना माझ्या मनात जितके काम आहेत त्या सर्वांना आश्रमाच्या कामकाजात सामील करण्यात आले आहे असे म्हणता येऊ शकत नाही. सुरुवातीपासून एकदोन निश्चय करूनच आश्रमाचा कारभार चालत आला आहे. (१) ‘चादर पाहूनच पाय पसरावे’ म्हणजे आश्रमाला सहजपणे मित्रांकडून जी मदत मिळेल त्यावरच भागवावे. (२) कोणतेही काम मागे राहू द्यायचे नाही. परंतु जे कार्य आपोआप समोर येऊन उभे राहील ते निःसंकोचपणे आणि प्रसंगी धोका पत्करूनही हाती घेणे.

मी मान्य करतो की या दोन्ही निश्चयांमागे धार्मिक प्रवृत्तीच होती. धार्मिक प्रवृत्ती म्हणजे ईश्वरावर श्रद्धा आणि इश्वराने पाठवलेल्या पैशाच्या आधारावर आणि प्रेरणेने त्याचेच कार्य करणे. अशा प्रकारे चालणारा माणूस इश्वराने पाठवलेल्या संपत्तीद्वारे (साधन) त्यानेच सांगितलेले कार्य करत असतो. ईश्वर स्वतः काही करतो असे तर तो आपल्याला दिसू देत नाही वा लक्षात येऊ देत नाही. माणसाला प्रेरित करून तो त्याच्याच माध्यमाने हे काम करत असतो. आणि जेव्हा कल्पनाही केलेली नसेल अशा ठिकाणाहून जेव्हा मदत येते वा

न मागता मित्र मदत करतात तेव्हा तर ही मदत ईश्वराकडून आली आहे असेच माझी श्रद्धा मान्य करील. आणि अशा प्रकारे जे कार्य येऊन पडते आणि जे हाती न घेण्याकरिता आळस, भित्रेपणा वा असेच कोणते तरी दुषित कारण आहे असे वाटते तेव्हा ते कार्य ईश्वराने पाठवलेले कार्य आहे असेच माझी श्रद्धा समजेल.

आणि जी गोष्ट रुपये-पैसे वा कार्याच्या बाबतीत खरी आहे तीच गोष्ट सहकाऱ्यांसंबंधीही खरी आहे. पैसे असले, कार्यही आले परंतु सहकारी रूपी साधन नसले तर ते काम हाती घेता येत नाही. हे साधनसुद्धा सहजपणे मिळायला पाहिजे. आश्रम ईश्वराचा आहे अशी केवळ कल्पनाच नसते तर विश्वास असतो, अशी समर्पणबुद्धी जिथे असते तिथे ज्या कोणत्या कार्याकरिता ईश्वर आश्रमाला साधन करतो त्या कार्याकरिता तोच संपूर्ण सामुग्रीही पाठवत असतो. गत सोळा वर्षांपासूनच नाही तर जेव्हा फिनिक्सची स्थापना झाली तेव्हापासूनच कळतनकळत लहान वा मोठ्या प्रमाणात याच नियमानुसार संस्था चालत आली आहे. जे नियम आधी सौम्य होते ते नंतर कडक होत गेले आणि माझ्या मते अजूनही कडक होत चालले आहेत.

थोड्याच दिवसात आश्रमवासीयांची संख्या दुप्पट झाली. आणि कोचरबच्या बंगल्याची रचना तर आश्रमाच्या अनुकूल होऊच शकत नव्हती. बंगला तर अखेरीस बंगलाच. त्यात एक श्रीमंत कुटूंब पूर्व आणि पश्चिमेच्या रितीभातीनुसार राहून आपले काम भागवू शकत होता. अशा ठिकाणी स्त्रिया, पुरुष आणि मुले, एकूण साठ लोक, किती तरी प्रकारचे काम करत होते, ब्रह्मचर्य व्रताचे पालन करत ते मोठ्या अडचणीने त्या बंगल्यात राहू शकत होते. परंतु जे घर मिळाले त्यातच निभवणे आवश्यक होते. परंतु तरीही थोड्याच वेळात तिथे राहणे अशक्य झाले. यामुळे ईश्वराने जणू काय आम्हांला तिथून बाहेर काढले असावे अशा प्रकारे नवीन जमिनीचा शोध घ्यावा लागला आणि बंगला रिकामा करावा लागला. या घटनेचे वर्णन 'आत्मकथा'मध्ये आलेले आहे. (पाहा संपूर्ण गांधी वाङ्मय खंड ३९ पृष्ठ ३००-३०३ आणि पृष्ठ ३२४-२५) यामुळे ते इथे परत सांगून राहिलेलो नाही. कोचरबमध्ये एक उणीव आधीपासूनच जाणवत होती. ती साबरमतीत आल्यापासून दूर झाली. फळझाडे, जनावरे आणि शेती याशिवाय आश्रम अर्धवटच म्हणावा लागेल. साबरमतीत शेती करण्याइतकी जमीन असल्यामुळे तिथे लगेच शेती सुरू होऊ शकली.

इथपर्यंत आश्रमाच्या इतिहासाचे सिंहावलोकन करण्यात आले. आता व्रते आणि कामकाजासंबंधात जे काही प्रयत्न करण्यात आले आणि त्यांतील जे काही मला आठवते त्यांचा उल्लेख करू इच्छितो. माझी दैनंदिनी माझ्याजवळ नाही, आणि शिवाय तिच्यात आश्रमवासीयांच्या जीवनात आलेल्या नाजूक घटनांचा उल्लेख करण्यात आलेला नाही. यामुळे केवळ स्मरणशक्तीच्या आधारावरच हा इतिहास लिहिला जाऊन

राहिलेला आहे. माझ्याकरिता हा प्रयोग नवीन नाही. ‘दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास’ अशाच प्रकारे लिहिण्यात आला. ‘सत्याचे प्रयोग’ही अशाच प्रकारे लिहिण्यात आले. या इतिहिसातही वाचकांनी या उणिवेकडे लक्ष द्यायला पाहिजे.

## सत्य

जेव्हाकेव्हा आश्रमात खोटे बोलण्यात आले तेव्हा तेव्हा तो एक महारोग आहे असे समजून त्याला दूर करण्याची उपाययोजना करण्यात आली. चूक करणाराला शिक्षा करण्याची पद्धत आश्रमात मुळीच नाही. इतकेच नाही तर चूक करणाराला आश्रमापासून दूर करण्याच्या धोरणासंबंधातही संकोच वाटत असायचा. दोषास्पद गोष्ट होऊ नये म्हणून तीन उपाय केले जात असत आणि केले जात आहेत. पहिला आणि मुख्य म्हणजे कार्यकर्त्याची शुद्धी. यामागे असा विश्वास राहिला आहे की जर कार्यकर्त्यात कुठेही दोष नसेल तर आजूबाजूचे वातावरण शुद्ध राहीलच. सूर्यासमोर ज्याप्रमाणे काळोख टिकत नाही, त्याचप्रमाणे सत्यासमोर असत्य टिकू शकत नाही.

दुसरा उपाय होता आपली चूक जाहीर करणे. कोणी जर खोटे आचरण करत असताना आढळला तर त्याला समाजासमोर उभे करण्यात येत असे. ही उपाययोजना विवेकाने केली तर तिचे परिणाम फार चांगले होत असतात. यात दोन प्रकारची सावधगिरी बाळगणे आवश्यक असते. एक तर चूक करणाराने ती जाहीरपणे कबूल केली पाहिजे, दुसरी गोष्ट म्हणजे त्यात बळजबरीचा लवलेशही नसायला पाहिजे. याशिवाय दोष करणावर याचा असा परिणाम व्हायला नको की त्याला लाजच वाटणार नाही. दोष जाहीर झाला की पाप धुतल्या गेले असा जर विचार माणसाच्या मनात रुजला तर मग दोषाबद्दल वाटणारी लाज नसल्यासारखी होऊन जाते. थोडेसे असत्यसुद्धा महारोगासारखे असते याचे भान असायला पाहिजे.

तिसरा उपाय मुख्य कार्यकर्त्याने आणि दोष करणाराने प्रायश्चित्त म्हणून उपवास करणे हा आहे. असत्य आचरण करणारा उपवास करो वा न करो, ते त्याच्या इच्छेवर अवलंबून आहे, परंतु मुख्य कार्यकर्ता त्याच्या संस्थेत कळतनकळत होण्याऱ्या दोषाकरिता जबाबदार असतोच. असत्य विषारी हवेपेक्षाही जास्त विषारी आणि जास्त सूक्ष्म असते. जिथे प्रमुखाला आध्यात्मिक दृष्टी असते, जेव्हा तो जागृत असतो तिथे हा विषारी वायू शिरूच शकत नाही. यामुळे जहर शिरत असलेले जर लक्षात आले तर तो प्रमुखाला सावधगिरीची

सूचना करण्यासारखा असतो. हे विष शिरण्यात कुठे ना कुठे त्याचाही हात आहे. मला असे वाटते की जितका स्पष्ट परिणाम रसायन शास्त्रातील काही विशिष्ट मिश्रणांचा वा क्रियेचा होतो तितकाच, किंबहुना त्यापेक्षाही जास्त स्पष्ट परिणाम आध्यात्मिक क्रियांचा होत असतो. इतकेच की त्याचे मोजमाप करण्याचा तराजू आपल्याजवळ नाही. यामुळेच अशा परिणामांवर आपला लवकर विश्वास बसत नसतो. आणि जरी विश्वास वाटला तरी तो दृढ नसतो. याशिवाय आपण आपल्याशी अतिशय उदारपणे वागत असतो. परिणामी आपल्या प्रयोगात आपल्याला यश मिळत नाही, आणि आपण घाण्याच्या बैलाप्रमाणे त्याच त्या ठिकाणी चकरा मारत असतो. अशा प्रकारे असत्याची गाडी चालत असते आणि अखेरीस असत्य अपरिहार्यपणे या निर्णयावर येत असते. आणि जे अनिवार्य वाटत असते ते स्वाभाविकपणे आवश्यक होऊन जात असते. याचमुळे सत्यापेक्षा असत्याची प्रतिष्ठा वाढत असते.

यामुळेच आश्रमात जेव्हा असत्य पाहण्यात आले तेव्हा तेव्हा मी माझाही दोष मान्य केला. याचा अर्थ हा आहे की मी माझ्या व्याख्येच्या सत्यापर्यंत पोहोचू शकलेलो नाही. शक्य आहे की अज्ञानामुळे का होईना मला सत्याचा पूर्ण अर्थ कळला नाही, त्याचा विचारही केला नाही आणि तो सांगूही शकलो नाही. असे असताना मी सत्यानुसार आचरण कसा करणार होतो? मग अशा प्रकारे दोष कबूल केल्यानंतर काय मी पळून जाऊ? गुफेत जाऊन बसू? मौन घेऊ? याला मी भित्रेपणा समजतो. गुफेत बसून सत्याचा शोध लागू शकत नाही. जिथे बोलणे आवश्यक असेल तिथे मौन कसे? विशेष परिस्थितीत गुफेचे महत्त्व आहे. परंतु सामान्य माणसाची कसोटी तर समाजातच होत असते.

तर मग असत्य काढण्याकरिता मी काय उपाय करू? याचा विचार केल्यानंतर मला देहदमनाशिवाय दुसरा कोणताही उपाय दिसत नाही. देहदमनचा अर्थ आहे उपवास इत्यादी. देहदमनाचे तीन परिणाम होतात - एक आपल्या स्वतःवर, दुसरा असत्याचरण करणारावर आणि तिसरा समाजावर. देहदमनामुळे माणूस स्वतः खूप सावध होत असतो. तो अतःकरणात खोलवर शिरून आत्मनिरीक्षण करत असतो आणि स्वतःची दुर्बलता लक्षात आल्यानंतर ती दूर करण्याकरिता तो उपाययोजना करत असतो. असत्य आचरण करणारात दयाभाव असेल तर त्याला त्याला त्याच्या दोषाची जाणीव होते. त्याला स्वतःलाही लाज वाटते आणि परत असे कधीही न करण्याचा तो निर्धार करतो. आजूबाजूचा समाजही आपल्या उणिवा आणि अतिरेकी वर्तन यांचा तपास करू लागतो.

परंतु देहदमन हे केवळ एक साधन आहे, साध्य नाही. देहदमनात माणसाला सुधारण्याची अगदीच शक्ती नाही. त्यामागे जी विचारसरणी असते ती असेल तरच तिचा लाभ घेता येतो. ही विचारसरणी अशी आहे - माणूस देहाचा दास होऊन राहत असतो. भोगाकरिता देह अनेक गोष्टी करत असतो, अनेक पाप करत असतो. यामुळे जेव्हा केव्हा पाप होते तेव्हा देहाचे दमन करण्यात यावे. देहाच्या भोगात फसलेला माणूस शुद्धीवर नसतो. भोजनाचा थोडाफार त्यागसुद्धा त्याची बेशुद्धी कमी करण्याकरिता मदत करू शकते. उपवासाचा हा परिणाम लक्षात ठेवला तर त्याची व्यापक व्याख्या करण्याची आवश्यकता आहे. उपवासाचा अर्थ आपल्या वा दुसऱ्याच्या आत्म्याला शुद्ध करण्याकरिता केलेले सर्व इंद्रियांचे दमन. केवळ आहारत्याग म्हणजे उपवास समजला जात नाही. आणि रोगनिवारणाकरिता केलेल्या उपवासाची तर उपवासात गणनाच होत नाही.

माझा असाही अनुभव आहे की उठताबसता जर उपवास केला तर त्याचा परिणाम फार कमी होत असतो. याचे कारण वारंवार केलेले उपवास यांत्रिक क्रियेसारखे होतात. त्यामागे वर सांगितलेली विचारसरणी नसते. यामुळे प्रत्येक उपवासामागे सर्व प्रकारची जागृती आवश्यक असते.

मला स्वतःच्या बाबतीत एका विशेष परिणामाचाही अनुभव आला आहे. मी अनेकदा उपवास केले आहेत. यामुळे माझे सहकारी घाबरलेले असतात. उपवासामुळे माझ्या शरीराला धोका निर्माण होईल अशी त्यांना भीती वाटत असते. यामुळे माझे काही सहकारी संयम-नियमांचे पालन करत असतात. मी याला उपवासाचा उलट परिणाम समजतो. तरीही अशा भीतीने पाळलेला संयम हानिकारक आहे असे मी समजत नाही. ही भीती प्रेमाची भीती आहे. अशा भीतीमुळेसुद्धा माणूस अनीती असलेले वर्तन करणार नसेल तर चांगलेच आहे. बुद्धी आणि स्वेच्छेने जी सुधारणा होते ती उत्तम असते. परंतु मोठ्या लोकांच्या लाजेमुळे वा त्यांना दुःख होईल या भीतीमुळे पाप न करणे ही गोष्टसुद्धा उपेक्षा करण्यासारखी नाही. यात पाशवी बलात्कार येत नाही. असे अनेक उदाहरण आढळतात की आपल्या प्रियजनांच्या भीतीने ज्या सुधारणा केल्या जात असतात त्या नंतर कायम स्वरूपी होऊन जातात.

उपावस वगैरेंमुळे एक दुःखद परिणामसुद्धा होत असतो. तो लक्षात ठेवला पाहिजे. उपवास वगैरेंच्या भीतीमुळे पाप न करण्याऐवजी पापाच्या प्रभावात आलेले लोक पाप लपवताना आढळतात.

या सर्व गुणदोषांचा विचार करता माझे असे मत झाले आहे की काही परिस्थितीत उपवास इत्यादी प्रायश्चित्त आवश्यक आहेत. माझा असा विश्वास आहे की एकूण पाहता यामुळे आश्रमाचा लाभच झाला आहे.

परंतु इतके लक्षात ठेवले पाहिजे की उपावास इत्यादी प्रायश्चित्तांकरिता अधिकाराची आवश्यकता आहे. कोणालाही कोणत्याही वेळी प्रायश्चित्त म्हणून उपवास करण्याचा अधिकार असूच शकत नाही. प्रसंग आणि पात्र पाहूनच यासंबंधात निर्णय घेता येऊ शकतो. सामान्यपणे अधिकार आहे की नाही हे ठवण्याकरिता ज्या अटी आढळल्या आहेत त्या अशा आहेत -

१. दोष करणाराच्या मनात प्रायश्चित्त करणाराबद्दल प्रेम असले पाहिजे. प्रायश्चित्त करणाराच्या मनात दोषीबद्दल प्रेम असेल, परंतु दोषी त्या प्रेम ओळखू शकत नसेल वा तो स्वतः प्रायश्चित्ताचा शत्रू होऊन राहील तर त्याच्याकरिता प्रायश्चित्त असूच शकत नाही. जो स्वतःला शत्रू शमजतो त्याच्या मनात प्रायश्चित्त घेणाराबद्दल तिरस्काराची भावना असते. यामुळे त्याच्यावर प्रायश्चित्ताचा उलट परिणाम होत असतो. वा उपवास पाशवी बलात्काराचे रूप धारण करू शकते. तसेच तो दुराग्रह आहे असे समजले जाऊ शकते. याशिवाय ज्याच्याशी विशेष प्रेमसंबंध नसतील आणि त्याच्या दोषाकरिता प्रायश्चित्ताचे अधिकार जर सर्वांना असतील तर माणसाला प्रायश्चित्तापासून फुरसतच मिळणार नाही. संपूर्ण जगाकरिता प्रायश्चित्त ही गोष्ट एखाद्या महात्म्याला जरी शोभत असेल तरी इथे तर आपण सर्वसामान्य माणसाचाच विचार करत आहो.

२. दोषाचा संबंध प्रायश्चित्त घेणाराशीही असला पाहिजे. असे म्हणण्याचा अर्थ हा आहे की दोषाशी ज्याचा कोणताही संबंध नसतो त्याने दोषीकरिता उपवास करू नये. उदाहणार्थ 'अ'शी 'ब'ची मैत्री आहे. परंतु 'ब' आश्रमवासी आहे आणि 'अ'चा आश्रमाशी काहीही संबंध नाही. 'ब'ने आश्रमासंबंधात काही दोषास्पद वर्तन केले आहे. इथे 'अ'चे ना तर प्रायश्चित्त घेणे कर्तव्य आहे आणि ना त्याला तो अधिकार आहे. 'अ' जर मध्ये लुडबुड करू लागला तर आश्रमाची विचित्र स्थिती होईल आणि 'ब'चीही तशीच अवस्था होऊ शकते. 'अ'जवळ 'ब'दोषी आहे की नाही हे ठरवण्याचे कोणतेही साधनसुद्धा असू शकत नाही. 'ब'ने आश्रमात राहणे मान्य केलेले असल्यामुळे 'ब'ने आपल्या नैतिकतेची आणि प्रायश्चित्ताची जबाबदारी आश्रमावर सोपवली आहे.

३. प्रायश्चित्त करणारा स्वतः अशा दोषांपासून मुक्त असला पाहिजे. 'जात्यातल्याला सूपातल्याने का हसावे' हा व्यावहारिक वाक्प्रचार इथे अगदी चपखलरित्या लागू होतो.

४. प्रायश्चित्त करणारा इतर प्रकारेही इतका शुद्ध असला पाहिजे की त्यामुळे दोषीच्या मनात त्याच्याबद्दल आदर निर्माण होईल. प्रायश्चित्ताच्या गर्भातच पावित्र्याचा समावेश होतो. आणि दोषीच्या मनात प्रायश्चित्त घेणाराबद्दल आदर नसेल तर त्याच्यावर उपवासाचा वाईट परिणाम होणे स्वाभाविक आहे.

५. प्रायश्चित्त घेणाराचा वैयक्तिक स्वार्थ नसायला पाहिजे. 'अ'ने 'ब'ला दहा रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. हे आश्वासन पूर्ण न करणे हा 'अ'चा दोष होईल. परंतु 'अ'ने ते आश्वासन पूर्ण केले नाही म्हणून 'ब'ने उपवास करू नये.

६. प्रायश्चित्त घेणाराने क्रोधात प्रायश्चित्त घेऊ नये. मुलाने एखादा अपराध केला आणि म्हणून वडिलांना राग आला आणि म्हणून ते उपवास करायला बसले तर ते प्रायश्चित्त होणार नाही. प्रायश्चित्तात केवळ दया वा करुणा असली पाहिजे. याचे कारण प्रायश्चित्ताचा हेतू स्वतः शुद्ध होणे आणि दोषीला शुद्ध करणे असतो.

७. दोष प्रत्यक्ष, सर्वमान्य आणि आत्म्याची हानी करणारा असला पाहिजे. तसेच दोष करणाराला त्याची जाणीव असली पाहिजे. केवळ अंदाजाने कोणाला दोषी ठरवून प्रायश्चित्त घेता येत नाही. असे केल्याने अनेकदा फार भयंकर परिणाम होऊ शकतात. दोषाबद्दल शंका नसावी. शिवाय आपण मान्य केलेला दोष प्रायश्चित्ताचे कारण असू शकत नाही. असेही होऊ शकते की माणूस आज ज्याला दोष समजतो ते उद्या दोषास्पद वाटणारही नाही. यामुळे जी गोष्ट दोषास्पद वाटते ती अशी असली पाहिजे की जिला समाजही दोषास्पद मानतो. खादी न वापरणे ही माझ्या मते फार मोठी दोषास्पद गोष्ट असू शकेल, परंतु माझ्या सहकाऱ्याला जर त्यात दोष दिसत नसेल तर वा त्याला महत्त्व न देता खादी घालून वा न घालून तो आपले काम भागवत असेल आणि त्याच्या अशा वर्तनामुळे मी जर उपवास करीन तर ते प्रायश्चित्त न ठरता अनुचित दडपण ठरेल. याशिवाय दोषीला आपण काही दोषास्पद वर्तन करत आहो याचे जर भान नसेल तरी त्याकरिता प्रायश्चित्त घेता येऊ शकत नाही.

ज्याला अशी एखादी संस्था चालवायची असेल की जिच्यात दंड करता येण्याची कोणतीही तरतूद नाही आणि जिथे प्रत्येक काम धर्मानुसार करण्याचा प्रयत्न केला जातो तिथे अशी चर्चा आवश्यक असते. कारण तिथे दंड वगैरेची जागा संचालकांचे प्रायश्चित्त घेत असते. इतर कोणत्याही प्रकारे संस्था सुसंचालित ठेवता येणे अशक्य आहे. दंडामुळे जरी बाह्य स्वरूप कायम ठेवता येऊ शकत असेल, बाह्य व्यवस्था कायम राहत असेल आणि संस्थेच्या कामात प्रगती होताना दिसत असेल तरी दंड त्यापुढे जाऊ शकत नाही. प्रायश्चित्तामुळे अंतर्बाह्य शुद्धी होत असते, आणि संस्था दिवसेंदिवस मजबूत होत जात असते. यामुळे वर सांगितलेल्या काही नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

उपवास वगैरे प्रायश्चित्त झाल्यानंतरही सत्याग्रह आश्रम आपल्या आदर्श सत्यापासून दूर आहे. याची कारणे आपण पुढे पाहू. अजून तर आपण याला 'उद्योग मंदिर' म्हणूनच ओळखतो. इतके निश्चितच म्हणता

येते की आश्रमातील कार्यकर्ते सावध आहेत. आपल्या अपूर्णतेची त्यांना पूर्ण जाणीव आहे आणि कुठूनही असत्य शिरू नये याकरिता ते प्रयत्नशील आहेत. परंतु वेळेवेळी नवनवीन लोक भरती होत असतात. त्यांना बहुतेक सदस्यांच्या विश्वासावरच भरती करण्यात येत असते. तिथे सर्व प्रांतांचे आणि सर्व देशाचे लोक येत असतात. अशा परिस्थितीत नेहमीच सत्य कायम ठेवणे ही काही सामान्य गोष्ट नाही. इथे जणू काय सत्याचीच परीक्षा होत असते. कार्यकर्ते प्रामाणिक असतील तर परीक्षा कितीही कठीण असली तरी आश्रम त्यात उत्तीर्ण व्हायलाच पाहिजे. सत्याग्रहीची शक्ती जरी मोजकी असली तर सत्याची शक्ती असीम आहे. परंतु सत्याग्रही जर जागृत साधक असेल तर त्याचीही शक्ती असीम होईल.

## प्रार्थना

सत्याचा आग्रह जर आश्रमाच्या मुळातच असेल तर त्या मुळाचे पोषण प्रार्थनेने होत असते. जेव्हा पासून आश्रम सुरू झाला आहे तेव्हापासून दररोज आश्रमाच्या कामाची सुरुवात प्रार्थनेच होत असते आणि शेवटही प्रार्थनेनेच होत असतो. माझ्या आठवणीप्रमाणे एकही दिवस प्रार्थनेशिवाय गेला नाही. मला असे प्रसंग आठवतात की जेव्हा पावसावगैरेंच्या कारणामुळे प्रार्थनेकरिता एकच जबाबदार माणूस हजर होता. सुरुवातीपासूनच नियम तर असा राहिला आहे की जो माणूस आजारी असेल वा आजारासारखेच ज्याच्याजवळ सबळ कारण असेल तो वगळता इतर सर्व प्रौढ व्यक्तींनी प्रार्थनेत सामील व्हायला पाहिजे. सायंकाळच्या प्रार्थनेत तर या नियाचे बऱ्याच चांगल्या प्रमाणात पालन होत असते. परंतु सकाळच्या प्रार्थनेसंबंधात असे म्हणता येत नाही.

सकाळच्या प्रार्थनेची वेळ सुरुवातीच्या काळात अनिश्चित होती. त्यासंबंधात मी प्रयोग केले. क्रमशः प्रार्थनेची वेळ ४, ५, ६, आणि ७ वाजताची ठेवण्यात आली. परंतु वेळोवेळी मी केलेल्या आग्रहामुळे ४. १० वा ४.२० ची वेळ निश्चित करण्यात आली. म्हणजे जागे करण्याची घंटी जर ४ वाजता झाली तर हाततोंड वगैरे धुऊन माणसाला ४. १० वाजता पोहोचता यावे.

माझे मत आहे की हिंदुस्थानसारख्या समशितोष्ण वातावरणाच्या दिवसात माणूस जितका लवकर उठेल तितके चांगले आहे. करोडो लोकांना लवकर उठावे लागतच असते. शेतकरी उशिरा उठला तर त्याच्या शेतीचे नुकसान होईल. जनावरांची काळजी घेणे मोठ्या पहाटेच होत असते. ज्या देशात अशी परिस्थिती

असेल त्या देशात सत्यार्थी, मुमूक्षू, सेवक वा संन्यासी तीन वाजता उठत असेल तर त्याने काही मोठी गोष्ट केली असे म्हणता येत नाही. हं, न उठणेच आश्चर्याची गोष्ट होईल. सर्व देशांमध्ये धार्मिक लोक, ईश्वराचे भक्त, शेतकरी हे सर्व सवकरच उठत असतात. भक्त ईश्वाराचे ध्यान करण्यात लीन होतात, आणि शेतकरी आपल्या शेतीच्या कामाला लागून जगाची सेवा करत असतो. माझ्या मते दोघेही भक्त आहेत. पहिला समजूनउमजून भक्त आहे, शेतकरी नकळत आपल्या मेहनतीने ईश्वराची भक्ती करत असतो. याचे कारण त्याच्यावर संपूर्ण जग उदरनिर्वाहाकरिता अवलंबून असते. मेहनत करण्याऐवजी जर ते ध्यान लावून बसतील तर ते धर्मभ्रष्ट होतील आणि त्याचबरोबर ते जगाचाही नाश करतील.

परंतु शेतकऱ्याला आपल्याला भक्त मानायचे असो वा नसो, परंतु जेव्हा शेतकऱ्यांना, मजुरांना, इतर गरिबांना लवकर उठावे लागत असेल तर मग जो सवेला धर्म समजतो, जो सत्यनारायणाचा पुजारी आहे तो कसा झोपून राहू शकतो? आणि शिवाय आश्रमात तर भक्ती, सेवा आणि उद्योग यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न होत असतो. यामुळे कितीही जरी अडचण आली तरी सर्व सशक्त माणसांनी लवकर उठायला पाहिजे ही गोष्ट मला दिव्याप्रमाणे स्पष्ट दिसते. आणि चार वाजताची वेळ तर मी लवकरची समजत नाही तर उशिरात उशिराची समजतो.

अनेक प्रयागानंतर आता आश्रमाची घंटी ठीक ४ वाजता वाजू लागली आहे आणि प्रार्थना ४.१० वाजता ४.२० वाजता सुरू होऊ लागली आहे.

प्रार्थना कुठे करण्यात यावी? एखादे मंदिर बांधून तिथे की अनंत आकाशाखाली? तिथे एखादा ओटा वगैरे बांधून की खाली रेतीवर वा धुळीत बसून? एखादी मूर्ती उभारावी की नाही? वगैरे प्रश्नांचा निर्णय घ्यायचा होता. अखेरीस आकाशाखाली रेती वा धूळ असलेल्या जमिनीवरच प्रार्थना करावी असे ठरले. आश्रमाचे ध्येय गरिबीचा स्वीकार करणे आहे. करोडो उपासमार होणारांची सेवा करणे आहे. आश्रमात कंगालाकरिता जागा आहे. असे म्हणतात की जे नियमांचे पालन करायला तयार नाहीत तेही आश्रमात भरती होऊ शकतात. अशा आश्रमात प्रार्थनामंदिर विटाचुन्याचे असू शकत नाही. त्याच्याकरिता आकाशाचे छप्पर, दिशाचे खांबआणि भिंती हेच पुरेसे आहेत. एखादा ओटा बाधायचा जो विचार होता तोही सोडून देण्यात आला. संख्येची सीमा ठरवता येऊ शकत नाही तर ओट्याची सीमा कोण ठरवू शकेल? फार मोठा ओटा बांधण्याकरिता खर्चही फार होत असतो. अनुभवाने असे लक्षात आले की मंदिर वा ओटा न बांधण्याचाच निर्णय योग्य होता.

आश्रमातील प्रार्थनेत बाहेरचे लोकही सामील होऊ शकतात. परिणामी केव्हा केव्हा अशी वेळ येते की कितीही मोठा ओटा बांधला तरी तो लहान पडायचीच वेळ येते.

याशिवाय आश्रमातील प्रार्थनेच्या अनुकरणांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. यामुळे प्रार्थनेकरिता आकाश मंदिराचा जो निर्णय घेण्यात आला होता तोच योग्य होता. जिथेकुठे मी जात असतो तिथे सकाळसंध्याकाळी प्रार्थना होत असते. विशेषतः संध्याकाळच्या प्रार्थनेत इतकी गर्दी असते की प्रार्थना मोकळ्या मैदानातच होऊ शकते. आणि मला जर मंदिरातच प्रार्थना करायची सवय लागली असती तर प्रवासात सार्वजनिक प्रार्थेनेचा विचारही करता आला नसता.

याशिवाय आश्रमात सर्व धर्मांचा समान आदर आहे. सर्व धर्मांच्या लोकांना प्रार्थनेत सहभागी होण्याची परवानगी आहे. त्यात मूर्तिपूजकही असू शकतात आणि मूर्तिपूजेवर विश्वास नसणारेही असू शकतात. कोणीही दुखवला जाऊ नये या विचाराने आश्रमातील सामूहिक प्रार्थनेत मूर्ती ठेवण्यात येत नाही. ज्याला हवी तो आपल्या खोलीत मूर्ती ठेवू इच्छील तर त्याला मनाई नाही.

## प्रार्थनेत काय होते?

सकाळच्या प्रार्थनेत 'आश्रम भजनावली'त छापलेले श्लोक, एखादे भजन, रामधून आणि गीतापाठ हे सर्व होत असतात. सायंकाळी गीतेच्या दुसऱ्या अध्यायाच्या अखेरचे १९ श्लोक, भजन, रामधून आणि बहुधा कोणता तरी पाठ होत असतो. सुरुवातीला असे नव्हते. श्लोकांची निवड काकासाहेबांनी केली आहे. काकासाहेब आश्रमात सुरुवातीपासूनच आहेत. काकासाहेबांशी मगनलालची ओळख शांतिनिकेतनमध्ये झाली होती. मी जेव्हा विलायतेत होतो तेव्हा मगनलाल मुलांना घेऊन शांतिनिकेतनमध्ये आश्रयार्थ येऊन राहिला होता. दीनबंधू ॲन्ड्रूज आणि पिअर्सन त्या वेळी आश्रमातच होते. त्या दिवसात काकासाहेब शांतिनिकेतनमध्येच होते. तिथे ते शिक्षकाचे काम करत होते. मगनलाल आणि काकासाहेबांमध्ये घनिष्ठ संबंध निर्माण झाले. मगनलालला संस्कृत येणाऱ्या अध्यापकाची उणीव जाणवली. ती काकासाहेबांनी पूर्ण केली. त्यात तेथील चिंतामणीही सामील झाले. काकासाहेबांनी प्रार्थनेतील श्लोक शिकवले. शांतिनिकेतनमध्ये जे श्लोक शिकवले जात होते ते आजपेक्षा जास्त आहेत. त्यांतील काही श्लोक काकासाहेबांच्या सल्ल्याने वेळ वाचवण्याकरिता काढून टाकले. जे शिल्लक आहेत ते आजही सुरू आहेत. अशा प्रकारे प्रार्थनेत म्हटले जाणारे

श्लोक सुरुवातीपासून तर आतापर्यंत कायम आहेत. आणि बहुधा असा एकही दिवस गेला नसेल की जेव्हा हे श्लोक म्हणण्यात आले नाहीत.

या श्लोकांवर खूप हल्ले झालेले आहेत. केव्हा वेळ वाचवण्याच्या दृष्टीने तर केव्हा हे श्लोक सत्याचा पुजारी म्हणू शकत नाही या कारणाने. आणि काही वेळा हिंदूशिवाय इतर लोक म्हणू शकत नाहीत या कारणाने. हे तर निश्चित आहे की हे श्लोक हिंदू समाजातच म्हटले जातात. परंतु दुसऱ्या समाजाच्या लोकांनी हे श्लोक गायीले वा गात असताना उपस्थित राहिले तर त्यांच्या भावना दुखवल्या जाण्यासारखे काही आहे असे मला वाटत नाही. ज्या मुसलमान वा ख्रिश्चन मित्रांनी हे श्लोक ऐकले आहेत त्यांनीही विरोध केला नाही. ज्यांच्या मनात इतर धर्मांबद्दल आदर आहे ते दुखवले जाऊ शकत नाहीत. आणि इथे अशा लोकांचाच उल्लेख केला आहे. या श्लोकांमध्ये कोणाची निंदा वा उपेक्षा व्हावी अशी कोणतीही गोष्ट नाही. आश्रमात हिंदू धर्मीयांची संख्या फार मोठी असल्यामुळे पसंती तर हिंदू लोकांप्रमाणेच होईल. परंतु इतरांचे काहीही गाऊ नये वा म्हणू नये असा नियम नाही. उलट प्रार्थनेची वेळ झाल्यानंतर इमामसाहेब कुराणातील आयती म्हणत असतात. मुसलमानी भजन वा गझल तर अनेकदा म्हटल्या जात असतात. हीच गोष्ट ख्रिश्चन भजनांनाही लागू होते.

परंतु फार जबरदस्त जो विरोध झाला तो सत्याच्या दृष्टीने झाला. गणपती, सरस्वती यांची पूजा सत्याचे हनन करणारी आहे. कमळाच्या आसनावर बसलेली आणि वीणा हातात घेतलेल्या सरस्वतीचे कोणतेही अस्तित्व नाही. मोठ्या पोटाचा सोंड असलेला गणपती नावाची कोणतीही गोष्ट नाही. एका आश्रमवासीने अतिशय नम्रपणे परंतु तितकाच जोरदार युक्तिवाद केला होता की अशा काल्पनिक देवांची प्रार्थना करण्याने आणि ती मुलांना शिकवण्याने सत्याची हानी होत असते. आणि त्याला इतर आश्रमवासियांचे समर्थनही होते. याबद्दल मी माझे मत असे सांगितले होते -

मी सत्याचा पुजारी आहे. असे असूनही हे श्लोक म्हणत असताना वा मुलांना शिकवत असताना मी दुखवला जात नाही. वर करण्यात आलेल्या युक्तिवादाप्रमाणे जर काही श्लोक रद्द केले तर त्यांच्या गर्भात हिंदू धर्माची जी रचना आहे त्यावर हल्ला होईल. मला असे म्हणायचे नाही की हिंदू धर्मात जी कोणती गोष्ट आक्रमण करण्यासारखी आहे, मग ती कितीही का जुनी असेना, तिच्यावर आक्रमण करू नका. परंतु ही गोष्ट मला हिंदू धर्माला दुर्बल वा त्यावर हल्ला करण्यासारखी वाटत नाही. याउलट माझा विश्वास आहे की हिंदू धर्मात हा जो काही भाग राहिलेला आहे तो कदाचित त्याचा विशेष भाग असावा. माझा स्वतःचा गणेशाच्या वा सरस्वतीच्या अस्तित्वावर विश्वास नाही. हे सर्व वर्णन एकाच ईश्वराची स्तुती आहे. त्याच्या असंख्य गुणांना

भक्तकवींना मूर्त रूप दिले आहे. ही काही वाईट गोष्ट नाही. देहधारी जेव्हा ईश्वराचे स्तवन करायला बसतो तेव्हा तो आपल्याला रुचेल तशी कल्पना करत असतो. त्याच्या कल्पनेतील ईश्वर तर त्याच्याकरिता आहेच. निर्गुण निराकार ईश्वराची प्रार्थना करायला गेलो की त्याच्या गुणांची कल्पना करण्यात येते आणि ते त्याच्यात आहेत असे गृहीत धरण्यात येतेच. गुणसुद्धा एक आकारच आहेत. खरे म्हणजे तर ईश्वर वर्णातीत आहे. तो वाणीच्या सीमेपलीकडे आहे. परंतु क्षुद्र मानवाला तर त्याच्या कल्पनेचाच आधार आहे. त्या कल्पनेच्या आधारेच तो भवसागराच्या पलीकडे जातो आणि त्याच कल्पनेमुळे तो बुडतोही. ईश्वराकरिता ज्या कोणत्या विशेषणांचे शुद्ध हेतूने आणि विश्वासाने गान कराल तर तो तुमच्याकरिता खरा आहे. आणि मुळात तर तो खोटा आहेच. कारण ईश्वराकरिता कोणतेही विशेषण पुरेसे होत नाही. मला स्वतःलाही बुद्धीने ही गोष्ट माहीत आहे आणि तरीही त्याच्या गुणांचे वर्णन केल्याशिवाय, त्याचे स्तवन केल्याशिवाय मी राहू शकत नाही. माझी बुद्धी जे सांगते त्याचा हृदयावर कोणताही परिणाम होत नाही. मी हे कबूल करायला तयार आहे की माझ्या दुर्बल हृदयाला सगुण ईश्वराचा आधार पाहिजे. जे श्लोक मी गत पंधरा वर्षांपासून गात आलो आहे ते मला शांती देतात. माझ्या दृष्टीत ते मला खरे वाटतात. त्यात मला सौंदर्य, काव्य आणि शांततेचे दर्शन होते. सरस्वाती, गणेश यांच्याबद्दल विद्वान लोक अनेक कथा सांगत असतात. त्या सर्व सारहीन नाहीत. त्यांचे रहस्य मला माहीत नाही. त्यात मी खोलवर उतरलोही नाही. माझ्या शांततेकरिता मला खोलवर उतरण्याची आवश्यकताही वाटली नाही. यामुळे शक्य आहे की माझे अज्ञानच मला वाचवत असावे. सत्याचा शोध घेताना ही गोष्ट समजून घेतलीच पाहिजे असे मला वाटलेच नाही. माझा ईश्वर मला माहीत आहे. तोपर्यंत मी अजून पोहोचू शकलेलो नाही. परंतु मी त्या दिशेने जातो आहे इतके माझ्याकरिता पुरेसे आहे.

माझा असा आग्रह नाही की मी हा जो युक्तिवाद केला आहे त्याने माझ्या सहकाऱ्यांचे समाधान होईलच. मला हेही माहीत नाही की यामुळे कोणाचे किती समाधान होईल. याकरिता एकदा एक समिती तयार करण्यात आली होती, आणि खूप चर्चा झाल्यानंतर असा निर्णय घेण्यात आला की जी कोणती निवड करण्यात येईल त्यात कोणाला ना कोणाला कोणता तरी दोष दिसेलच. यामुळे जे आहे तेच राहू द्यावे. या श्लोकांचा अर्थ प्रत्येकजण आपापल्या कल्पनेप्रमाणे करतील. वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या कारणाने विरोध झाले. मी ते सर्व एका ठिकाणी गोळा करून सांगितले आहेत.

श्लोकांबरोबर भजन तर असतातच. प्रार्थनेची सुरुवात दक्षिण आफ्रिकेत भजनांनीच झाली होती. श्लोक तर हिंदुस्थानात आल्यानंतर जोडण्यात आले होते. भजन गाण्यात, गायला लावण्यात मगनलालच प्रमुख होते.

यामुळे आम्हा दोघांचेही समाधान होत नव्हते. जे काही करायचे ते चांगल्या प्रकारे आणि प्रामाणिकपणे करण्याचा मोह होता. यामुळे कोणी संगीतशास्त्री मिळाला तर त्याच्याकडून सर्वांनी शिकावे आणि रस घेऊन भजन गावे असे वाटत होते. भजनात एकसारखा सूर निघाला नाही तर माणूस त्यात तल्लीन होऊ शकत नाही. असे जरी नसेल तरी त्यात तल्लीन होणे कठीणच असते. परंतु शास्त्री असा असला पाहिजे की जो आश्रमाच्या नियमांचे पालन करील. चौकशी करता करता मगनलालला स्वर्गीय संगिताचार्य विष्णू दिगंबर शास्त्रींनी आपला पहिला शिष्य नारायण खरेंना आम्हांला अतिशय प्रेमाने सोपवले. आणि ते आता आश्रमाचे पूर्ण सदस्य झाले असून इथेच राहत आहेत. त्यांनी आश्रमाच्या दृष्टीने आमचे पूर्ण समाधान केले. त्यांनी भजनात पूर्ण रस टाकला. जी 'आश्रम भजनावली' आज अनेक लोक आनंदाने वाचतात ती प्रामुख्याने त्यांचीच कृती आहे. भजनाबरोबर त्यांनी रामधूनही सुरू केली.

अजून प्रार्थनेचा चौथा भाग राहिलेला आहे. तो आहे 'गीता'पाठ. वेळोवेळी 'गीता' तर वाचली जातच असते. वर्षांपासून आश्रमवासी 'गीतेला' आचारविचाराचे प्रमाणग्रंथ मानतात. एखादे आचरण शुद्ध आहे की नाही हे पाहण्याकरिता आश्रम 'गीतेचा' तसाच आधार घेतो जसे एखाद्या शब्दाचा अर्थ समजावा म्हणून विद्यार्थी शब्दकोशाचा आधार घेतो. 'गीतेचा' अर्थ प्रत्येक आश्रमवासीला कळेल तर चांगले. आणि जर असे होऊ शकत नसेल तर मूळ शुद्ध स्वरूपात गीता वाचली तरी हरकत नाही. अशा प्रकारच्या विचाराने रोज 'गीता'पाठाला सुरुवात केली. आधी थोडे श्लोक होते आणि ते पाठ होईपर्यंत आम्ही ते रोज म्हणत होतो. यामुळे पारायणाची कल्पना निर्माण झाली आणि आता 'गीतेचे' अध्याय अशा प्रकारे म्हणण्यात येतात की १४ दिवसात संपूर्ण गीतेचा पाठ संपावा. अशा प्रकारे कोणत्या दिवशी कोणता पाठ वाचला जाईल हे आश्रमवासीला कळू शकते. एका शुक्रवारी पहिला अध्याय सुरू होतो. ज्या दिवशी हे लिहून घेतो आहे त्याच्या पुढील शुक्रवारी पहिला अध्याय सुरू होईल. चौदा दिवसात संपूर्ण गीतापाठ व्हावा म्हणून ७-८. १२-१३ आणि १६-१७ अध्याय हे एकाच दिवशी म्हणण्यात येत असतात. (नंतर 'गीता'पाठ १४ दिवसांऐवजी ७ दिवसातच पूर्ण करण्यात येऊ लागला. त्यांचा क्रम असा होता - शुक्रवार १आणि २, शनिवार ३, ४ आणि ५, रविवार ६, ७ आणि ८, सोमवार ९,१० आणि ११, मंगळवार १३, १४ आणि १५, बुधवार १६ आणि १७, गुरूवार १८.) मी सांगितलेले आहेच की सायंकाळच्या प्रार्थनेत भजन, रामधून आणि 'गीतेच्या' दुसऱ्या अध्यायातील शेवटचे १९ श्लोक म्हणण्यात येत असतात. या श्लोकांमध्ये स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगितलेली आहेत. सत्याग्रहीमध्ये ही लक्षणे असली पाहिजे. जी गोष्ट स्थितप्रज्ञ साध्य

करू इच्छितो तीच गोष्ट साध्य करायची सत्याग्रहीचीसुद्धा इच्छा असली पाहिजे. यामुळेच हे श्लोक म्हणण्यात येत असतात ही गोष्ट आपण नेहमी लक्षात ठेवली पाहिजे.

रोज एकच प्रार्थना करणे उचित आहे की नाही अशी शंका यासंबंधात घेण्यात आली. 'रोज एकच प्रार्थना केल्यामुळे प्रार्थना यंत्रवत होऊन जाते' की काय हा प्रश्न होता. रोज एकच प्रार्थना असली तर प्रार्थना यंत्रवत होते आणि तिचा परिणाम कमी होत जातो हे खरे आहे काय? परंतु आम्ही स्वतःही तर एक यंत्रच आहो. ईश्वर हे यंत्र चालवतो आहे असे जर आपण मान्य करत असू तर आपण यंत्राप्रमाणे चालायलाच पाहिजे. सूर्य, चंद्र जर आपले काम यंत्राप्रमाणे करणार नसतील तर जग क्षणभरही चालू शकणार नाही. परंतु यंत्रवत म्हणजे जडवत होत नाही. आम्ही चेतन आहो, चेतनला शोभेल इतक्याच प्रमाणात त्याने यंत्रवत काम केले पाहिजे. प्रार्थना एकसारखी असावी की वेगवेगळ्या प्रकारची हे दोन प्रश्न नाहीत. असेही होऊ शकते की अनेक प्रार्थना ठेवल्या तरी त्यांचा काहीही परिणाम होणार नाही. हिंदूंची तीच गायत्री, मुसलमानांचा तोच कलमा, ख्रिश्चनांचा तीच प्रार्थना या धर्मांचे लाखो लोक शेकडो वर्षांपासून रोज म्हणत आले आहेत. परंतु यामुळे त्यांचा चमत्कार काही कमी झालेला नाही, उलट वाढला आहे. त्यामागे जर माणसाची भावना असेल तर चमत्कार अजूनच वाढेल. हीच गायत्री, हाच कलमा, येशूची हीच प्रार्थना नास्तिक म्हणो की एखादा पोपट म्हणो त्याचा काहीही परिणाम होणार नाही. परंतु हीच प्रार्थना जेव्हा आस्तिकाच्या तोंडून रोज निघते तेव्हा तिची भव्य शक्ती दररोज वाढत असते. आपला दररोजचा मुख्य आहार तोच असतो. आपण दररोज तेच्या तेच अन्न खात असतो. गहू खाणारा दुसऱ्या गोष्टी नक्कीच घेत असेल, परंतु गव्हाची पोळी तर दररोज असतेच. यामुळे त्याच्या शरीराची घडण होईल. त्याला त्याचा कंटाळा येणार नाही. तो जर कंटाळला तर त्याच्या शरीराचा शेवट जवळ आला असेच समजायचे. हीच गोष्ट प्रार्थनेची आहे. मुख्य प्रार्थना तर एकच असते. आत्म्याला जर प्रार्थनेची भूक असेल तर माणूस त्या प्रार्थनेला कंटाळणार नाही, उलट त्यामुळे तो पुष्ट होईल. ज्या दिवशी प्रार्थना होणार नाही त्या दिवशी त्याची उपासमार होईल. उपवासात माणूस शिथिल होतो. तसेच माणसाचा आत्माही प्रार्थना झाली नाही तर शिथील होईल, नाही त्याहूनही जास्त. एखाद्या दिवशी शरीरात बद्धकोष्ठता होऊ शकते परंतु आत्म्याला प्रार्थनेची लागलेली भूक कधीही शमत नसते.

खरी गोष्ट तर ही आहे की आपल्यामधील बहुतेक लोक आत्म्याला प्रार्थनेची भूक न लागताच प्रार्थना करत असतात. 'आत्मा' आहे असे मानणे एक 'फॅशन' आहे, एक परंपरा आहे. यामुळे 'आत्मा' आहे यावर आपण विश्वास ठेवत असतो. अशा प्रकारची हीन अवस्था अनेकांची होत असते. यामुळे 'आत्मा' आहे असे

त्यांची बुद्धी निश्चित करत असते. अशांकरिता हा विचार हृदयात रुजू शकत नाही. यामुळे त्यांना प्रार्थनेची आवश्यकता वाटत नसते. बहुतेक लोक प्रार्थनेत असे समजून सामील होत असतात की जे बहुतेक लोक करत असतात तेच समाजात राहून करायचे असते . अशा लोकांना विविधतेची आवश्यकता वाटत असते. परंतु खरे पाहता ते प्रार्थनेत समरस होतच नसतात. ते संगीत ऐकतात, कुतुहल म्हणून प्रार्थनेत येतात. प्रवचन ऐकतात. ते ईश्वराशी तादात्म्य पावण्याकरिता येत नसतात.

## प्रार्थनेचा अर्थ काय आहे?

प्रार्थनेचा मूळ अर्थ तर याचना करणे, मागणे असा आहे. ईश्वराला वा मोठ्यांना नम्र होऊन काही मागणे हीच प्रार्थना आहे. इथे प्रार्थना हा शब्द या अर्थाने घेण्यात आलेला नाही. इथे प्रार्थनेचा अर्थ आहे ईश्वराची स्तुती, भजन-कीर्तन, उपासना, सत्संग, अंतर्ज्ञान, अंतरशुद्धी.

परंतु ईश्वर कोण आहे? तो कोणी आपल्या शरीरात वा जगाबाहेर राहणारी व्यक्ती नाही. तो तर सर्वव्यापक आहे, सर्वज्ञ आहे, सर्वशक्तिमान आहे. त्याला स्तुतीची काय आवश्यकता? सर्वव्यापी होऊन तो सर्व काही ऐकत असतो. त्याला आपले विचार माहीत असतात. मोठ्या आवाजात बोलून त्याला आपण काय ऐकवू इच्छितो? त्याचा आमच्या अंतःकरणात वास असतो. बोटांच्या जितक्या जवळ नख आहेत त्याहूनही तो आपल्याजवळ आहे. तिथे प्रार्थनेचा काय उपयोग आहे?

अशी समस्या असल्यामुळेच प्रार्थनेचा अर्थ अंतर-शुद्धी असासुद्धा करण्यात आला आहे. प्रार्थनेचा उच्चार करून आपण ईश्वराला काही सांगत नसतो, आपण स्वतःलाच सांगत असतो, स्वतःला सुषुप्तीतून जागे करत असतो. आपल्यामधील काही लोक ईश्वराला बुद्धीने ओळखतात. काहींना तर त्याच्याबद्दलही शंका आहे. ईश्वराला कोणीही डोळ्यानी पाहिलेले नाही.  त्याला अंतःकरणाने ओळखायचे आहे, त्याचा साक्षात्कार करायचा आहे. त्याच्या स्वरूपाशी एकरूप व्हायचे आहे. याकरिता आपण प्रार्थना करत असतो.

ज्याचा आपल्याला साक्षात्कार करायचा आहे तो ईश्वर सत्य आहे. वा असे म्हणा की सत्यच ईश्वर आहे. परंतु सत्याचा अर्थ खरे बोलणे इतकाच नाही. सत्यचा अर्थ आहे ते तत्त्व जे या जगात आधीपासून राहिलेले आहे, राहील आणि त्याच्याशिवाय दुसरे काहीही नाही. ते तत्त्व जे आपल्या शक्तीने अस्तित्वात आहे, ज्याला कोणाच्याही आधाराची आवश्यकता नाही, उलट जगात जे काही आहे ते त्याच्या आधारावरच टिकलेले

आहे. सत्यच शास्वत आहे, बाकी सर्व क्षणिक आहे. त्याला कोणत्याही आकाराची आवश्यकता नाही. तोच शुद्ध चैतन्य आहे, आनंद आहे, त्याला आपण ईश्वर म्हणतो कारण त्याच्याच आधारावर सर्व काही सुरू आहे. तो आणि त्याचा कायदा एकच आहे. यामुळेच तो कायदा चैतन्यस्वरूपी आहे. त्याच कायद्याच्या आधाराने सगळे तंत्र चालत असते. त्याच सत्याची आराधना प्रार्थना आहे. याचाच अर्थ सत्यमय होण्याची आपली इच्छा आहे. ही इच्छा चोवीसही तास असली पाहिजे. परंतु आपण इतके जागृत नाही. यामुळे आपण ठरलेल्या वेळी प्रार्थना, आराधना वा उपासना केली पाहिजे. आणि असे करता करता आपण चोवीसही तास सत्याचे चिंतन करू लागत असतो.

आश्रम अशा प्रकारे प्रार्थना सिद्ध करण्याचा प्रयत्न करू इच्छितो. अजून तर तो त्यापासून फार दूर आहे. वर सांगितलेले उपचार तर बाह्योपचार आहेत. परंतु कोणत्या का प्रकाराने प्रार्थना हृदयात उतरवण्याचा हा प्रयत्न आहे. आणि अजूनही आश्रमातील प्रार्थना आकर्शक झाली नसेल, अजूनही आश्रमवासींना प्रार्थनेला हजर राहण्याकरिता हटकावे लागत असेल तर त्याचा अर्थ आश्रमातील कोणालाही तो अर्थ मूर्तिमंत सत्य आहे असा विश्वास वाटत नाही असा होतो.

हार्दिक प्रार्थनेत तर भक्त इतका काही ध्यानस्थ झाला पाहिजे की त्या वेळी त्याला इतर कोणत्याही गोष्टीचे भान राहायला नको. भक्ताला 'विषयी' अशी जी उपमा देण्यात आली आहे ती अगदी योग्य आहे. विषयीला जेव्हा त्याचा विषय मिळतो तेव्हा तो सर्व भान विसरतो आणि त्या विषयाशी एकरूप होतो, विषयरूप होतो. त्याची सर्व इंद्रिये तेच रूप धारण करतात. त्याशिवाय त्याला काही सुचतच नाही हे याचे कारण आहे. याहूनही जास्त तादात्म्य उपासकात असले पाहिजे. हे तादात्म्य प्रयत्नांनी, तपश्चर्येने, संयमाने योग्य वेळी येत असते. जिथे असा कोणी भक्त असतो तिथे प्रार्थनेत हजर राहण्याकरिता कोणाला मोहवावे लागत नसते. त्याची भक्तीच इतरांना आपल्याकडे बळजबरीने ओढून घेत असते.

आतापर्यंत सामूहिक प्रार्थनेबद्दल लिहिले. परंतु आश्रमात व्यक्तिगत एकांतात प्रार्थना करण्यावरसुद्धा भर देण्यात येत असतो. जो एकटा प्रार्थना करत नाही तो कितीही जरी सामूहिक प्रार्थनेत सामील झाला तरी तो त्या प्रार्थनेतून विशेष काही मिळवू शकत नाही. यामुळे समाजाकरिता सामूहिक प्रार्थना फार आवश्यक आहे. परंतु ज्याप्रमाणे व्यक्तीशिवाय समाज होऊच शकत नाही त्याचप्रमाणे व्यक्तिगत प्रार्थनेशिवाय सामूहिक प्रार्थना असूच शकत नाही. यामुळे प्रयेक आश्रमवासीला वारंवार सूचीत करण्यात येत असते की त्याने झोपताना, उठताना, खाताना, पिताना प्रार्थनेत तल्लीन व्हायला पाहिजे. याकरिता कोणी पहारेदार ठेवता येत

नाही आणि ना कोणी याचा हिशेब ठेवू शकतो. आश्रमात अशी प्रार्थना कितपत होत असते हे मी सांगू शकत नाही. मी असे समजतो की थोड्याफार प्रमाणात सर्वच या दृष्टीने प्रयत्नशील असतील.

## अहिंसा

असे म्हणतात की जास्तीत जास्त त्रास बहुधा अहिंसापालनात होत असतो. सत्याचे कोडे कायम असतेच. प्रार्थना हृदयात उतरत नाही, परंतु सत्य आणि प्रार्थना काय आहेत हे समजण्यात फारशी अडचण येत नाही. अहिंसा समजून घेण्यातच जीव घाबराघुबरा होऊन जातो. आश्रमात जितकी चर्चा अहिंसेची झाली आहे तितकी अजून कोणत्याही विषयाची झालेली नसेल. एखादे काम जर करण्यात आले तर ते हिंसा आहे की अहिंसा हा प्रश्न आश्रमात निर्माण होतच असतो. आणि अनेकदा हिंसा-अहिंसा यांच्यातील भेद माहीत असतानाही अहिंसेचे पालन केले जाऊ शकत नाही. पालन करण्यात बहुधा आमचा दुबळेपणा आडवा येत असतो. आणि हा दुबळेपणाही असा नसतो की जो सहजपणे दूर करता येईल. मन, वचन आणि शरीराने कोणालाही दुःख न देणे, आपले आणि इतरांचे हिंत चिंतूनही कोणाला दुःख न देणे ही अंहिसा आहे. यावर पूर्णपणे अंमल करणे देहधारीकरिता अशक्य आहे. माणूस तर एक श्वास घेण्यातच अनेक जीवांची हत्या करत असतो. जो जीव डोळ्याच्या पापणीवर बसतो त्याची पापणी मिटताच हत्या होत असते. शेती करताना अनेक लहानमोठ्या जीवांची हत्या होत असते. साप, विंचू दंश करण्याची भीती असल्यामुळे आम्ही जरी त्यांना मारत नाही तरी त्यांना पकडून दूर जंगलात सोडून देतो. पकडण्यात त्यांना थोडे दुःख तर निश्चितच होत असेल. आपण ते अनिवार्य जरी समजत असलो तरी वरील व्याखेनुसार तर ती हिंसाच आहे.

मी जे खातो, जी जागा अडवतो, जे कपडे घालतो त्यातून जर मी काही वाचवू शकलो तर, स्पष्ट आहे की ज्यांना माझ्यापेक्षा त्यांची जास्त आवश्यकता आहे त्या गरिबांकरिता ते उपयोगी पडतील. माझ्या स्वार्थामुळे त्यांना या गोष्टी मिळू शकत नाही. यामुळे माझ्या उपभोगामुळे माझ्या कंगाल शेजाऱ्याची (शेजारी या शब्दाचा व्यापक अर्थ करायचा आहे. आपल्या शेजाऱ्याचा शेजारीही आपला शेजारी असतो अशा प्रकारे विचार केला तर सर्व जग आपले शेजारी असते.) मी हिंसा करत असतो. मी जी अनेक प्रकारची वनस्पती खात असतो त्यात वनस्पती जीवाची हत्या तर होतच असते. हीसुद्धा हिंसा आहे.

अशा व्यापक अहिंसेत पडलेला मी कशा प्रकारे अहिंसेचे पालन करू? पावलोपावली नवनवीन समस्या निर्माण होत असतात.

वर सांगतलेली हिंसा तर अशी आहे की जी समजू शकते. परंतु एकमेकांचा जो सूक्ष्म द्वेष करत असतो त्याचे काय करावे? शिक्षक मुलांना मारतात, आई मुलावर रागावते, बरोबरीचे लोक कधीकधी एकमेकांकडे डोळे वटारून पाहत असतात ही सर्व हिंसाच आहे. यावरील योग्य उपाययोजना काय आहे हे कळत नाही. जिथे रागद्वेष आहेत तिथे हिंसा आहेच. ही हिंसा कशी नाहीशी करावी?

यामुळे आश्रमातील लोकांना आम्ही अशी शिकवण देत असतो की देशाकरिता, कुटुंबाकरिता की स्वतःकरिता एखाद्याचे डोके छाटणे ही तर हिंसा आहेच, परंतु क्रोधामुळे होणारी सूक्ष्म हिंसा या स्थूल हिसेपेक्षा कदाचित जास्त वाईट असेल. वेगळा हिशेब केला तर जगात दररोज किती तरी खून होत असतात, आणि त्यांची संख्या बरीच जास्त आहे असे जाणवते. परंतु जगाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात इतर प्रकारे जे मृत्यू होतात त्यांची तुलना केली तर या खुनांची संख्या खिजगणतीत घेण्यासारखीही नाही असे वाटते. आणि क्रोध वगैरेंमुळे होणाऱ्या हिंसेला तर पारावारच नाही. अशा सर्व हिंसेपासून दूर राहण्याचा प्रयत्न आश्रमात करण्यात येत नसतो. सर्वांना आपला दुबळेपणा कळतो. सापविंचू यांची भीती माझ्यापासून तर सर्व आश्रमवासीयांकरिता सारखीच आहे. यामुळे त्यांना पकडून अशा ठिकाणी सोडायची पद्धत आहे की जिथे सामान्यपणे कोणाचेही नुकसान होणार नाही. आणि भीतीमुळे त्याला मारून जरी टाकले तर ते टीकेकरिता पात्र होत नाही. एकदा गोशाळेत नाग अशा ठिकाणी जाऊन बसला होती की तिथून त्याला पकडता येऊ शकत नव्हते. अशा परिस्थितीत तिथे जनावरे बांधण्यात धोका होता. माणसे काम करायलाही घाबरत होती. निरुपायाने मगनलालने त्याला मारण्याची परवानगी दिली. मला जेव्हा त्याने ही गोष्ट सांगितली तेव्हा मला त्याचे काम आवडले. मी कबूल करतो की मी जर त्या वेळी आश्रमात असतो तर अजून कोणतीही उपाययोजना करू शकलो नसतो. माझी बुद्धी सांगते की सापालाही आपण आपला नातलग समजून त्याच्याशी तसे वर्तन केले पाहिजे. तो चावण्याचा जरी धोका असेल तरी तो पत्करून सापाला हाताने उचलून त्याला घाबरणारांपासून दूर ठेवले पाहिजे. परंतु माझ्या अंतःकरणात ना तर इतकी मित्रभावना आहे आणि ना इतकी निर्भयता आहे. आणि साप वगैरे चावल्यामुळे होणाऱ्या मृत्यूकडे उपेक्षेने पाहू शकतो. या तिन्ही गोष्टी हृदयात निर्माण व्हाव्या म्हणून मी प्रयत्नरत आहे, परंतु अजून तरी मला त्यात यश आले नाही. शक्य आहे की सापाने

मझ्यावर हल्ला केला तर तो हल्ला मी सहन करेनही, आणि त्याला मी मारणार नाही. परंतु इतरांच्या देहाला संकटात टाकण्याची माझी तयारी नाही.

एकदा आश्रमात माकडांचा उपद्रव अतिशय वाढला होता. ते पिकाचे नुकसान करू लागले होते. पहारेकरी त्यांना गोफणीने घाबरवण्याचा प्रयत्न करत होते, परंतु ते कशाचे घाबरतात? अखेरीस ते माकडांना जखमी करू लागले. एक माकड लंगडा झाला. मला यात शरीरदंडापेक्षाही जास्त हिंसा दिसती. याबद्दल सहकाऱ्यांची चर्चा केल्यानंतर असे ठरले की माकड जर जात नसतील तर त्यांना गोफण वा दुसऱ्या कोणत्या उपायांनी जखमी करण्याऐवजी एकदोन माकडांना मारून  माकडाचा उपद्रव शांत करण्यात यावा. हा अंतिम निर्णय घेण्याआधी मी 'नवजीवन'द्वारा आणि मित्रांना पत्र लिहून उघड चर्चा केली होती. यामुळे मी संपूर्ण युक्तिवादात पडत नाही. ज्यांना याबाबतीत जास्त जाणून घेण्याची इच्छा आहे त्यांनी 'नवजीवन' वाचावे. (पाहा संपूर्ण गांधी वाङ्मय, खंड ३७ पृष्ठ ३४ - ३५ आणि ३८ पृष्ठ ७६- ७७)

मनुष्येतर प्राणी जरी हिंसक झाले तरी त्यांना मारू नये अशी धर्मभावना हिंदुस्थानच्या बाहेरही निर्माण झाली आहे की नाही हे मला माहीत नाही. कळले आहे की अशा धर्माचे पालन सेंट फ्रॅंसिससारख्या व्यक्तीने केले होते. परंतु सर्वसामान्य व्यक्तींनी या धर्माचे पालन केले होते की नाही हे मला माहीत नाही. आश्रमाचा या धर्मावर विश्वास आहे. परंतु या गोष्टीची अंमलबजावणी करण्यात आश्रम फार कच्चा आहे ही दुःखाची गोष्ट आहे. या धर्माचे पालन करण्याची कला अजून हाती लागलेली नाही. शक्य आहे जेव्हा या धर्माचे पालन करण्याकरिता अनेक लोक मारले जातील तेव्हा कदाचित ही कला साध्य होईल. सध्या तर हा धर्म मनोरथाच्या रूपाने अस्तित्वात आहे. बऱ्याच काळापूर्वी जरी हा धर्म मान्य करण्यात आलेला असला तरी त्याचे पालन फार कमी होत आहे. ज्या लोकांनी याला धर्म म्हणून मान्यता दिली आहे ते आळसामुळे म्हणा की इतर कारणांमुळे म्हणा स्वतःला फसवत आहे हे माझ्या समजाप्रमाणे याचे मुख्य कारण आहे.

वेड लागलेल्या कुत्र्याला मारून टाकण्याची आश्रमात पद्धत आहे. माझ्या माहितीत अशी वेळ आश्रमात एकदाच आली आहे. याचे कारण हे आहे की वेड लागलेला कुत्रा त्रास सहन करत करत अखेरीस मरत असतो. हे काही चांगले नाही. तो दुरीकडे गेला तर लोक त्याला मारून टाकण्याऐवजी त्रास देत असतात. आणि असे करून आपण अहिंसा धर्माचे पालन करत आहो असे समजून स्वतःला फसवत असतात. परंतु माझ्या मते तर ते जास्त हिंसा करत असतात. अशा दृष्टिकोनामुळे आश्रमाने वेड लागलेल्या कुत्र्याला मारणे हा धर्मच आहे असे ठरवले आहे.

एखाद्या प्राण्याला देहमुक्त करण्यातच कधी कधी अहिंसा असू शकते अशा स्पष्ट मान्यतेने आश्रमात एकदा एका वासराचा देहांत करण्यात आला. हे प्रसिद्ध उदाहरण आहे. त्या वासराचा पाय तुटला होता. त्याच्या जखमा चिघळल्या होत्या आणि त्यात किडे पडले होते. त्याला ना तर उचलता येत होते ना त्याला दुसरी काही मदत करता येऊ शकत होती. ते इतके मोठे जनावर होते की ना तर माणूस त्याला एका कडेवरून दुसरीकडे करू शकत होता ना त्याला मांडीवर बसवता येऊ शकत होते. त्याला जर जिवंत ठेवले असते तर तो तडफडत राहिला असता आणि आम्ही त्याची तडफड पाहत राहिलो असतो. ते वासरू फार दिवस जगेल अशीही आशा नव्हती. अशा अवस्थेत मला वाटले की त्याचा जीव घेण्यातच दया आहे. तडफडत असलेल्या प्राण्याच्या वेदना लांबवण्यात धर्म आहे असे मला वाटले नाही. जिथे आपला स्वार्थ नसेल तिथे आपण प्राण्याचाच स्वार्थ पाहिला पाहिजे. यामुळे या वासराचे प्राणहरण करण्यातच धर्म आहे असे मला स्पष्टपणे वाटले. यासंबंधात आश्रमवासीयांशी दीर्घ चर्चा केली. काहींनी विरोधही केला. परंतु अखेरीस मारण्याचा निर्णय घेण्यात आला. मी प्रसिद्ध सेठ अंबालाल साराभाईंची मदत मागितली. त्यांच्याकडे जे बंदुकवाले शिपाई होते त्यांना पाठवायला सागिंतले. त्यांनी विषाच्या पिचकारीने वासराचा जीव घेणे जास्त पसंत केले. मी त्यांचे समर्थन केले. त्यांचा डॉक्टर आला आणि थोड्याच वेळात वासराला संपवले. (पाहा संपूर्ण गांधी वाङ्मय, खंड ३७, पृष्ठ ३२३-२७ आणि खंड ३८, पृष्ठ १४७-१४८.) मी पूर्ण वेळ तिथे हजर होतो. हे लिहीत असतानाही या घटनेचा विचार करत असताना मला कोणताही पश्चात्ताप झाला नाही, उलट ते पूण्यकर्म होते असा माझा विश्वास आहे. अनेक हिंदूंचे अंतःकरण यामुळे दुखवले गेले होते. शक्य आहे की हे वाचूनही ते दुखवले जातील. मला वाटते की असे वाटण्यामागे अहिंसेच्या स्वरूपाविषयीचे आपले अज्ञानच आहे. आज तर हा जिवंत धर्म राहिलेला नाही. अहिंसेची परंपरा झाली आहे. त्यानुसारच विचार न करता जोपर्यंत स्वतःला त्रास होणार नाही अशा प्रकारे हिंदुस्थानातील हिंदू वागत असतात. या वासराच्या घटनेची पूर्ण चर्चा 'नवजीवन'मध्ये आलेली आहे.

इतके सांगून मी माणसाशिवाय इतर जीवांच्या संबंधात आश्रमात अहिंसेचे जे प्रयोग करण्यात आले त्यांची चर्चा पूर्ण करतो.

आश्रमाच्या दृष्टीने या जीवदयेत सामावलेली अहिंसा या व्यापक धर्माचा एक मोठा भाग असला तरी तो एक भागच आहे. त्यातही एक मोठा भाग माणसामाणसांमधील एकमेकांशी व्यवहाराचा आहे. लहानात लहान व्यवहारही एक तर हिंसक असतात वा अहिंसक. भाग्याने अहिंसा एक व्यापक धर्म असल्यामुळे माणूस त्याचे पालन सहजपणे करू शकतो. एकमेकांना निभवून घेतले नसते तर मानवजातीचा कधीचाच नाश झाला

असता. अशा प्रकारच्या महत्त्वाच्या अवलोकनाने आम्ही अहिंसाधर्म सिद्ध करू शकतो. परंतु यामुळे त्याचे पालन करण्याच्या यशाचे श्रेय आपण घेऊ शकत नाही.

जिथेकुठे आपल्या क्षणिक स्वार्थाला धक्का लागतो तिथे आपण जाणूनबुजून हिंसेचा मार्ग अवलंबितो. आणि हे कुटुंबात, गावात, देशात, वेगवेगळ्या धर्मांच्या संबंधात वेळोवेळी पाहण्यात येत असते. अहिंसेचे ज्ञानपूर्वक पालन माणसाला नवजीवन देते, त्याच्यात परिवर्तन घडवून आणते. हा कठीण धर्म पालन करण्याचे आश्रमाने जाणूनबुजून ठरवले आहे. यात अनेक अडथळे येत असतात, निराशा पदरी पडत असते आणि अनेकदा श्रद्धेची परीक्षा होते. आपसातील व्यवहारात आचारशुद्धीनेच समाधान होत नाही. कोणाकरिताही वाईट विचार न करणे, कोणी आपले नुकसान जरी केले असेल तरी त्याचे अनहित न इच्छिणे, विचारातही त्याला दुःख न देणे - हे फार कठीण आहे. परंतु अहिंसापालनाची कसोटी यातच आहे.

आश्रमात चोर आले आहेत, चोर निर्माण झाले आहेत. त्यांना शिक्षा करण्याचे धोरण आश्रमात ठरवण्यात आलेले नाही. पोलिसांना सूचना दिली जात नाही, त्यांचा उपद्रव यथाशक्ती सहन केला जातो. या नियमाचे पूर्णपणे पालन नेहमीच केले जात नाही. एकदा दिवसा चोरी करताना एक चोर पकडला गेला. ज्याने त्याला पकडले त्याने त्याला बांधून ठेवले. त्याचा अपमान तर केलाच. मी त्या दिवशी आश्रमातच होतो, दुःखद अंतःकरणाने मी त्याला त्याची चूक समजावून सांितली आणि त्याला बंधनमुक्त केले. परंतु खरे पाहता यामुळे अहिंसावादीचा धर्म पूर्ण होत नाही. असा उपद्रव करणाऱ्या माणसाला अडवण्याचे अनेक उपाय शोधले पाहिजे आणि त्यानुसार उपाययोजना केली पाहिजे. एक उपाय तर हा आहे की आश्रमातील परिग्रह आणि भोगविलास इतका कमी केला पाहिजे की ज्यामुळे इथून कोणाला काही घेण्याचा मोहच होणार नाही. दुसरा उपाय आजूबाजूच्या गावात शुद्ध आचरणाचा प्रचार केला पाहिजे. आणि तिसरा उपाय हा आहे की आश्रमाची सेवा इतकी व्यापक करण्यात यावी की बऱ्यावाईट सर्व लोकांच्या मनात हा आश्रम आमचा आहे अशी भावना निर्माण झाली पाहिजे.

यावरून लक्षात येईल की परिग्रहीकरिता स्थूल अहिंसेचे पालनसुद्धा अशक्यप्राय आहे. जो आपली संपत्ती ठेवील त्याला त्या संपत्तीचे रक्षण करण्याकरिता उपाययोजना करावीच लागेल. आणि असे करण्यात कुठे ना कुठे दंडाचे स्थान असेलच. जो प्रत्येक गोष्टीपासून ममत्वाची भावना काढून टाकून उदासीन होऊन व्यवहार करतो तोच स्थूल अहिसेचे पूर्णपणे पालन करू शकतो. ज्या समाजात असे लोक वा अशा संस्था जास्त असतील तिथे हिंसेची उपाययोजना कमीतकमी केली जाण्याची शक्यता असते. ज्याप्रमाणे हिंसेवर

आधारित समाजात गोळाबारूदला महत्त्वाचे स्थान असते आणि त्याचा उपयोग करू शकणाराला चांगला शिपाई समजण्यात येते आणि त्याचा बक्षिसाकरिता हक्क आहे असे समजले जाते, त्याचप्रमाणे जिथे समाजरचना अहिंसेवर आधारित असते तिथे गोळाबारूदची जागा तप आणि संयम घेतात, आणि त्या आधारे काम करणारा शिपाई समाजाचे रक्षण करत असतो. जगाने अजून अशा धर्माचा स्वीकार केलेला नाही. हिंदुस्थानात त्याचा थोड्याफार प्रमाणात स्वीकार करण्यात आला आहे, परंतु त्याचा व्यापक प्रमाणात स्वीकार करण्यात आला आहे असे म्हणता येत नाही. आश्रमात असा विचार प्रतिष्ठाप्राप्त आहे की अशी अहिंसा व्यापक व्हायला पाहिजे, व्यापक होऊ शकते आणि त्या आधारावर समाजरचनाही करता येऊ शकते. याच विश्वासाच्या आधारावर प्रयोग सुरू आहे. आता तर असेच म्हणता येईल की यात यश फार कमी मिळाले आहे. या प्रकरणात मी असे उदाहरण देऊ शकलेलो नाही की ज्यामुळे अहिंसेचा पुजारी आश्वासित होऊ शकेल. राजकीय क्षेत्रात अहिंसेचा जो प्रयोग झाला आहे त्याची गणना मी यात करत नाही. त्याच्या प्रयोगाकरिता एक वेगळे प्रकरण असेल. (हे प्रकरण लिहिण्यात आलेले नाही.)

## ब्रह्मचर्य

अहिंसेप्रमाणेच ब्रह्मचर्याचे व्रतही धर्मसंकट आणि अनेक प्रकारच्या समस्या निर्माण करणारे आहे. सामान्यपणे याचा अर्थ सर्वांना कळतो. परंतु अर्थ कळत असतानाही याचे पालन करत असताना अनेकांची तारांबळ उडते. आणि अनेक प्रयत्न केल्यानंतरही ते पुढे जाऊ शकत नाहीत. काहींनी तर माघार घेतली आहे. पूर्णतेला कोणीही पोहोचू शकलेला नाही. सर्वांना याचे महत्त्व माहीत आहे. १९०६ पूर्वीच याकरिता माझे प्रयत्न सुरू झाले. मी व्रत १९०६ साली घेतले. फार अडीअडचणी आल्या. ब्रह्मचर्याचा सूक्ष्म अर्थ मला अनुभवाने, ठेचा खाऊनच कळला. त्याचा अर्थ कळल्यानंतर माझ्या लक्षात आले की पुस्तकात वाचलेला अर्थही अनुभवाशिवाय न कळण्यासारखाच आहे. अनुभवानंतरही तो अर्थ वेगळ्याच प्रकारे लक्षात येतो. चरख्यासारखे अगदी साधे यंत्र कसे चालवावे हे पुस्तकातून वाचणे एक गोष्ट आहे आणि त्यावर अंमल करणे वेगळी गोष्ट आहे. अंमल करत असतानाच नवा प्रकाश दिसतो. आणि चरख्यासारख्या अगदी साध्या आणि डोळ्यांना दिसणाऱ्या यंत्राबद्दल जर अशी गोष्ट असेल तर अप्रत्यक्ष भावनांच्या सबंधात ही गोष्ट किती जास्त खरी असेल?

जो मन, वचन आणि कार्यातून इंद्रियांवर अंकुश ठेवतो तोच ब्रह्मचारी असतो. ब्रह्मचर्यावर अंमल सुरू केल्यानंतर याचा अर्थ मला थोडा थोडा स्पष्ट झाला. आणि पूर्णपणे अजूनही स्पष्ट झालेला नाही. याचे कारण मी स्वतःला संभर टक्के पूर्ण ब्रह्मचारी समजत नाही. मनाचे विकार नियंत्रणात राहू शकतात, परंतु पूर्णपणे नष्ट झाले नाहीत. ज्याचे मनोविकार पूर्णपणे नष्ट झाले नाहीत त्याला पूर्ण ब्रह्मचारी म्हणता येऊ शकत नाही. जेव्हा मी त्या स्थितीत पोहोचेन तेव्हा मी हीच गोष्ट नवीन दृष्टिकोनातून पाहीन. साधे ब्रह्मचर्य जितके कठीण दिसते तितके कठीण नाही. आम्ही त्याचा अनर्थ करून त्याला कठीण केले आहे. ब्रह्मचर्याचा खेळ खेळणारे बरेच लोक आगीत हात टाकूनही ते पोळणार नाहीत असा प्रयत्न करत असतात. आणि जेव्हा त्यांचे हात पोळतात तेव्हा ते या व्रताच्या कठीणपणाची तक्रार करत असतात. हे तर फार कमी लोकांना कळते की ब्रह्मचर्य म्हणजे केवळ एकाच इंद्रियाचा संयम नसून त्यात सर्व इंद्रियांच्या संयमाचा समावेश करणे आवश्यक असते. स्त्रीसंगातच ब्रह्मचर्याची  सुरुवात आणि शेवट आहे असे जे लोक समजतात ते ब्रह्मचारी नसतात. आणि यामुळे ते जेव्हा म्हणतात की ब्रह्मचर्य फार कठीण आहे तेव्हा ते बहुधा अतिशय साधे विधान करत असतात. दुसरे सर्व भोग भोगत असताना केवळ स्त्रीसंगापासून दूर राहण्याची इच्छा जो पुरुष करतो वा कोणा स्त्रीची पुरुषसंगापासून दूर राहण्याची इच्छा असेल तर त्याचा वा तिचा प्रयत्न निष्फळ होईल. त्यांचा हा प्रयत्न तर विहिरीत राहूनही पाण्याच्या स्पर्शापासून दूर राहण्याच्या प्रयत्नासारखा असेल. जे स्त्री-पुरुष संग त्यागाला सहजसाध्य  करू इच्छितात त्यांनी त्याला उत्तेजन देणाऱ्या सर्व गोष्टी टाळल्या पाहिजे. त्यांनी जिभेचा स्वाद सोडला पाहिजे, श्रृंगार रस सोडायला पाहिजे, पूर्णपणे विलास सोडला पाहिजे. अशा लोकांकरिता ब्रह्मचर्य पालन सोपे आहे याबद्दल मुळीच शंका नाही.

काही लोक असे समजतात की आपल्या वा परस्त्रीबद्दल विकरवश होण्यात, तिला स्पर्श करण्यात ब्रह्मचर्याचा भंग नाही. ही भयंकर चूक आहे. यामुळे स्थूल ब्रह्मचर्याचा सरळ सरळ भंग होतो. अशा प्रकारचा खेळ खेळणारे स्त्री-पुरुष स्वतःला आणि जगालाही फसवत असतात, आणि दिवसेंदिवस ते शक्तिहीन होत असतात. अशा स्त्री-पुरुषांना अनेक आजार होतात, असे लोक जर टोकाला गेले नाही तर याचे श्रेय त्यांना नसून परिस्थितीला वा वातावरणाला असते. ते पहिली संधी मिळाली की घसरणारांमधील असतात. हे मी माझ्या आणि माझ्या अनेक मित्रांच्या अनुभवांवरून लिहिले आहे. आश्रमाच्या ब्रह्मचर्यात तर आपल्या पत्नीचा सहवासही त्याज्य आहे. परंतु आपल्या पत्नीच्या सहवासात राहून परस्त्रीच्या सहवासाचा त्याग करणे ही

चांगली गोष्ट आहे. अशांच्या ब्रह्मचर्याला सीमीत जरी म्हणता येईल तरी त्याला ब्रह्मचारी समजणे ही ब्रह्मचारी शब्दाची हत्या आहे.

अशा प्रकारे तर ब्रह्मचर्याची व्याख्या पूर्णच ठेवण्यात आली आहे. तरीही आश्रमात स्त्री-पुरुष दोघेही राहतात, आणि त्यांना एकमेकांना भेटायचे बरेचसे स्वातंत्र्य आहे. याचा अर्थ आदर्श असा आहे की जितके स्वातंत्र्य आईमुलगा वा बहीणभाऊ भोगतात तितकेच स्वातंत्र्य परस्परांशी वागताना आश्रमवासीयांना मिळाले पाहिजे. याचा अर्थ सामान्यपणे ब्रह्मचर्याकरिता ज्या मर्यादांची कल्पना करण्यात आली आहे त्या सर्व इथे ठेवण्यात आलेल्या नाहीत. याउलट आश्रमाचा असा विश्वास आहे की ज्या ब्रह्मचर्याकरिता अशा सगळ्या भिंतींची आवश्यकता असते ते ब्रह्मचर्यच नाही. ब्रह्मचर्याच्या प्रयत्नाकरिता त्या भिंतींची आवश्यकता आहे असे समजले जात असेलही, परंतु अखेरीस तर या भिंती तुटल्याच पाहिजे. याचा असा अर्थ नाही की भिंत तुटताच ब्रह्मचाऱ्याने स्त्रियांच्या सहवासाचा शोध सुरू करावा; याचा अर्थ असा आहे की स्त्री-सेवेचा प्रसंग आला तर ब्रह्मचाऱ्याने असे समजू नये की माझ्याकरिता स्त्रीसहवास निषिद्ध असल्यामुळे मी स्त्रियांची सेवा करू शकत नाही.

ब्रह्मचाऱ्याकरिता स्त्री नरकाची खाण नाही. त्याच्याकरिता ती अंबामाता आहे, जगतजननी आहे. स्त्री दिसली वा सेवेकरिता स्त्रीला स्पर्श करताच ज्याच्या मनात विकार निर्माण होतात तो ब्रह्मचारी नाहीच. त्याच्याकरिता सजीव स्त्री वा लाकडाची मूर्ती या दोन्ही गोष्टी सारख्याच असल्या पाहिजे. परंतु स्त्रीचे नाव ऐकताच जो विकारवश होतो त्याने तर लाकडाच्या मूर्तीपासूनही दूर पळायला पाहिजे.

वर सांगितल्याप्रमाणे स्त्रीपुरुष एकाच आश्रमात राहत असतील, सोबत काम करत असतील, एकमेकांची सेवा करत असतील आणि ब्रह्मचर्य पालनाचा प्रयत्न करत असतील तर त्यात अनेक प्रकारची भीती तर आहेच. यात एका सीमेपर्यंत पश्चिमेची जाणूनबुजून नक्कल करण्यात आलेली आहे. अशा प्रकारचे प्रयोग करण्यासंबंधात माझ्या पात्रतेबद्दल मलाही शंका आहे. परंतु असे तर माझ्या सर्व प्रयोगांविषयी म्हणता येऊ शकते. ही शंका फार जबरदस्त आहे. यामुळेच मी कोणालाही माझा शिष्य समजत नाही. समजून उमजून जे आश्रमात आले आहेत त्या सर्वांना हे धोके माहीत माहीत असतानाही सहकारी म्हणून आले आहेत. मुलामुलींना मी माझी स्वतःची मुले समजतो. यामुळे ते स्वाभाविकपणेच माझ्या प्रयोगात ओढले जातात. माझे सर्व प्रयोग तर सत्य नावाच्या परमेश्वराच्या नावावर चालत असतात. तो कुंभार आहे आणि आम्ही सर्व त्याच्या हातातील मातीप्रमाणे आहो.

आश्रमातील आजपर्यंतच्या अनुभवाच्या आधारे मी सांगू शकतो की जो धोका पत्करून ब्रह्मचर्याचा प्रयत्न करण्यात आला आहे त्यामुळे निराश होण्यासारखे कोणतेही कारण मिळालेले नाही. एकूण पाहता स्त्रीपुरुषांना याचा लाभच झाला आहे. परंतु माझा विश्वास आहे की सर्वात जास्त लाभ स्त्रियांचा झाला आहे. प्रयोगात काही स्त्रीपुरुष अयशस्वी झाले आहेत, काही पडून परत उभे राहिले आहेत. कोणताही प्रयोग असला तरी ठेचा तर खाव्याच लागत असतात. सोळा आणे जर यश मिळत असेल तो प्रयोग राहत नसतो. तो तर सर्वज्ञाचा स्वभाव होऊन जात असतो.

ज्याचे स्थान पहिले आहे त्याचे स्थान मी शेवटचे ठेवले आहे. 'गीतेच्या' दुसऱ्या अध्यायात सांगितले आहे की "निराहारीची इंद्रिये तोपर्यंत दबलेली असू शकतात जोपर्यंत त्याचा निराहार सुरू असतो. परंतु विषयांचा रस नाहीसा होत नसतो. तो तर तेव्हा नाहीसा होईल जेव्हा परमेश्वराचे म्हणजे सत्याचे म्हणजेच ब्रह्माचे त्याला दर्शन होईल." यात निराहारी ऐवजी संयमी शब्द समजायला पाहिजे. मग तो अर्थ सर्व इंद्रियांना लागू होऊ शकतो. या श्लोकात अनुभवी कृष्णाने संपूर्ण सत्य सांगितले आहे. उपवासापासून तर ज्या कोणत्या बाबतीत संयमाची कल्पना आपण करू शकतो ते सर्व ईश्वरकृपेशिवाय व्यर्थ आहे. सत्य वा ब्रह्मदर्शनचा काय अर्थ आहे? त्यात या डोळ्यांनी दर्शन होण्याची गोष्ट सांगितलेली नाही. एखादा चमत्कार पाहण्याचीही गोष्ट नाही. ब्रह्मचे दर्शन म्हणजे ब्रह्म हृदयात वसलेला आहे असे अनुभवज्ञान. जोपर्यंत हे होत नाही तोपर्यंत रस कधीही नाहीसा होत नाही. ते अनुभवज्ञान होताच रस ताबडतोब शुष्क होऊन जातात. या ज्ञानाकरिता सगळे व्रत आहेत, सगळी साधना आहे, आश्रमाची रचना आहे. हे ज्ञान मनन, चिंतन आणि अभ्यासानेच होत असते. प्रियकराचा प्रेयसीकरिता सर्वनाश होताना पाहिले आहे. परंतु ही सर्व मेहनत तो क्षणभंगूर भोगाकरिता करत असतो. यामुळे त्याच्या नशिबी धूळच धूळ राहत असते. परंतु ज्या चिकाटीने प्रियकर मेहनत करत असतो त्यापेक्षाही जास्त चिकाटी सत्यदर्शनाकरिता हवी. आणि सत्यदर्शनानंतरच परमानंद होत असतो. असे असले तरी प्रियकरासारखी चिकाटी फार कमी जिज्ञासूंमध्ये आढळत असते. यामुळे जर ते दर्शन दुर्लभ असते अशी जर तक्रार करत असतील तर तिला काय अर्थ आहे? प्रेयसी तर हजारो कोस दूर असू शकते, परंतु ब्रह्माचा वास तर आपल्या हृदयातच आहे. बोटापासून नख जितके दूर आहे तितकासुद्धा ब्रह्म दूर नाही. परंतु जिथे 'डोळ्यावर चष्मा आणि घरभर शोधला' असे असते तिथे काय म्हणायचे?

निराहारीचा ब्रह्म उपेक्षा करण्यासारखा नाही. त्याचाही रस अखेरीस क्षीण होऊ शकतो. उपवास करून, डोके खाली पाय वर करून लटकून, हातपाय वाळून गेल्यामुळे - कोणत्याही प्रकारे विषय निवृत्ती

करायचीच आहे. शक्य आहे की असे करता करता रस जवळपास क्षीण होऊन जातील. एवढ्याने ब्रह्मदर्शन होईल आणि रस नेहमीकरिता नाहीसे होतील आणि ज्याला आपण हरवलेला हिरा समजत होतो तो सापडू शकेल. ज्याने मरेपर्यंत ब्रह्मदर्शनाचा प्रयत्नच केला नसेल त्याला ब्रह्मदर्शन झाले नाही अशी तक्रार करायला जागाच नाही. ब्रह्मचर्यपालन ब्रह्शोधाचे एक साधन आहे. ब्रह्मचर्याशिवाय ब्रह्मदर्शन होऊ शकत नाही, आणि बह्माशिवाय ब्रह्मचर्याचे पूर्ण पालन करणे शक्य नाही. यामुळेच इथे निराहारीचा निषेध करण्यात आलेला नाही, त्याची केवळ मर्यादा सांगितली आहे.

आश्रमात ब्रह्मचर्यपालनाचा प्रयत्न लहानमोठे, पतिपत्नी असे सर्वच करत असतात. असे असले तरी सर्वच काही जीवनभराकरिता ब्रह्मचर्याचे पालन करत नसतात. असे तर फार कमी आहेत. मुलेमुली विवाहयोग्य होतात तेव्हा त्यांना सूचीत करण्यात येते की कोणावरही आयुष्यभर ब्रह्मचर्य पाळण्याचे बंधन नाही. जे त्याचा तेजस्वीपण सहन करू शकत नाहीत ते विवाह करू शकतात. आणि जर ते मागणी करतील तर योग्य साथीदार शोधण्याकरिता आश्रम त्यांची मदत करील. ही गोष्ट इतक्या स्पष्टपणे आणि इतक्या अधिक वेळा  सांगण्यात आली आहे की ती सर्वांना समजली आहे. याचे परिणामही फार चांगले झाले आहेत. तरुण जास्त प्रमाणात ब्रह्मचर्याचे पालन करत आहेत. मुली बऱ्याच काळापर्यंत याचे पालन करतात. कोणतीही मुलगी पंधरा वर्ष वयाच्या आत विवाहित झालेली नाही. बहुतेक मुलींचे लग्न १९ वर्षाच्या आजूबाजूलाच झाले आहे.

आश्रमाच्या मदतीने जे विवाह करू इच्छितात त्यांना अतिशय साधेपणावर समाधान मानावे लागत असते. जेवणावळी होत नाहीत. वराती येऊ शकत नाहीत. ढोलनगाऱ्यांना वाव नसतो. केवळ धार्मिक विधी होत असतात. वरवधूला खादीमय व्हावे लागत असते. एकही दागिना नसतो. वराला मुलीला काहीही द्यावे लागत नसते. मुलीला आईवडीलांकडून वा पालकाकडून नेसायचे कपडे आणि चरखा वगैरेंशिवाय काहीही दिले जात नाही. लग्नात दहा रुपयेसुद्धा खर्च केले जात नाहीत. विधीकरिता एका तासापेक्षा अधिक वेळ लागत नाही. सप्तपदीचे वचन (वचन आणि श्लोकांकरिता पाहा संपूर्ण गांधी वाङ्मय, खंड ३०, पृष्ठ ९२-९३) वरवधू आपल्या मातृभाषेत म्हणतात. विवाहाच्या दिवशी विवाहाआधी दोघेही उपवास करतात, गोशाळेची सफाई करतात, जलाशय साफ करतात, गीतापाठ करतात. कन्यादान करणारा उपवास करतो. आता असाही आग्रह असतो की आश्रमातर्फे एकाच जातीत लग्न केले जाणार नाही. उपजातींचे बंधन सैल करण्याकरिता आश्रम उपजातींमधील विवाहांना प्रोत्साहन देत नाही. आणि आश्रमात जे लग्न करतात त्यांना उपजातीबाहेर लग्न

करण्याकरिता प्रोत्साहन दिले जाते. (१९४८ साली गांधीजी म्हणाले होते की मी अशाच विवाहाला आशीर्वाद देईन ज्यात सवर्ण हिंदूत आणि अस्पृश्यात विवाह होईल.)

## अस्तेय आणि अपरिग्रह

या व्रतांसबंधी जास्त लिहिण्याची आवश्यकता नाही. चार महायज्ञांमधील हे एक व्रत आहे. आत्मदर्शन करू इच्छिणारांकरिता हे आवश्यक आहे. यामुळे आश्रमाच्या व्रतात याला स्थान देण्यात आले आहे.

अस्तेय - दुसऱ्याची वस्तू आपण त्याच्या परवानगीशिवाय घेऊ नये इतकेच या व्रतात नाही. जी गोष्ट आपल्याला आपल्या मित्राने ज्या कामाकरिता वा जितक्या काळाकरिता दिली असेल त्यापेक्षा वेगळ्या कारणाकरिता वा अधिक काळाकरिता ती वापरणे हीसुद्धा चोरी आहे. या व्रताच्या मुळात हे सूक्ष्म सत्य सामावलेले आहे की परमेश्वर प्राण्यांकरिता दैनंदिन आवश्यकतांच्या गोष्टी निर्माण करत असतो, आणि त्या त्यांना देत असतो. त्याहून अधिक तो निर्माणच करत नाही. याचा अर्थ माणसाजवळ आपल्या किमान आवश्यकतांपेक्षा जितके जास्त तितकी तो चोरी करतो.

अपरिग्रह - अपरिग्रह अस्तेयातच सामावलेले आहे. अनावश्यक गोष्टी जशा घेऊ नये तसेच त्यांचा संग्रहही करू नये. देहधारीकरिता याची पूर्ण अंमलबजावणी करता येणे अशक्य आहे. शरीर स्वतः एक परिग्रह आहे. काही परिग्रह तर अपरिहार्य आहे. यात 'काही' हा जो शब्द आहे त्याचा अर्थसुद्धा प्रत्येकाच्या मानसिक परिस्थितीवर अवलंबून आहे. जसजसा माणूस या व्रतांकडे वळत जाईल तसतसा माणूस शरीराचा मोह सोडत जाईल आणि आपल्या गरजा कमी करत जाईल. प्रत्येकाकरिता एकच प्रमाण ठरवता येऊ शकत नाही. मुंगीचा परिग्रह वेगळा असेल. एका कणापेक्षा जास्त गोळा करणारी मुंगी परिग्रही म्हणवली जाईल, परंतु हजारो कणांचा ज्यात समावेश होईल इतके गवत जरी हत्त्यासमोर पडलेले असेल तरी त्याला परिग्रही म्हणता येणार नाही.

अशाच समस्यांमुळे संन्यासाची कल्पना निर्माण झाली आहे असे वाटते. संन्यासाचे पालन करणे आश्रमाचे ध्येय नाही. आणि एखाद्या व्यक्तीकरिता जरी असा संन्यास आवश्यक असेल तरी, जर कोणामध्ये दिगंबर राहून, समाधी लावून, गुफेत बसून केवळ विचारांनी समाजाची सेवा करण्याची शक्ती असेलही, परंतु

सर्वच जर गुफेत जाऊन बसले तर परिणाम वाईटच होईल. सर्वसामान्य स्त्रीपुरुषांकरिता तर मानसिक संन्यास शक्य आहे. जगात राहून जो सेवाभावाने आणि केवळ सेवेकरिता जगतो तो संन्यासीच असतो.

असा संन्यास घेता येऊ शकतो हे सिद्ध करण्याची आश्रमाला आशा आहे. आश्रम त्याच दिशेने जातो आहे. अशा मानसिक संन्यासात जरी काही आवश्यक गोष्टींचा संग्रह असला तरी संपूर्ण परिग्रहाचा, शरीराचासुद्धा, त्याग करण्याची माणसाची तयारी असली पाहिजे. याचा अर्थ लहानात लहान जरी गोष्ट चोरीला गेली तरी त्याने दुखवल्या जायला नको. आणि जोपर्यंत देह आहे तोपर्यंत त्याच्यासमोर जे कोणते सेवेचे काम येईल ते त्याने करत राहायला पाहिजे. खायला, कपडे घालायला मिळाले तर ठीक आहे, नाही मिळाले तरी 'आता कसे' हा प्रश्न त्याला पडायला नको. अशी परीक्षेची जरी वेळ आली तरी एकही आश्रमवासी पराभूत होणार नाही अशा प्रकारची मानसिकता तयार करण्याचे काम सुरू आहे.

## शारीरिक श्रम

प्रत्येक स्त्रीपुरुषाने मेहनत करणे हा आश्रमाला धर्म वाटतो. हा विचार मला टॉलस्टॉयच्या एका लेखावरून सुचला. त्यांनी रशियातील लेखक बोन्डारेफबद्दल लिहितांना सांगितले की भाकरीकरिता श्रमाची आवश्यकता ही जी गोष्ट या लेखकाने सांगितली आहे ती या युगातील मोठ्यात मोठ्या शोधांपैकी एक आहे. याचा अर्थ हा आहे की एका निरोगी माणसाने आपल्या पोटाकरिता शारीरिक श्रम केलेच पाहिजे. माणसाने आपल्या बुद्धीचा, शक्तीचा उपयोग आजीविकेकरिता वा त्याहूनही अधिक धनसंपत्ती मिळवण्याकरिता करू नये. उलट त्याने त्यांचा उपयोग सेवेकरिता, परोपकाराकरिता केला पाहिजे. या नियमाचे पालन जर संपूर्ण जग करू लागेल तर सहजपणे समता स्थापित होईल, कोणीही उपाशी मरणार नाही आणि जग अनेक पापांपासून वाचेल.

शक्य आहे की या सुवर्ण नियमानुसार सर्व जग कधीही वागणार नाही. हा नियम माहीत नसताना वा त्याचा अर्थ कळत नसताना याचे पालन तर करोडो लोकांना बळजबरीने करावे लागत आहे. त्यांचे मन त्याविरुद्ध दिशेने चालत असते. यामुळे ते दुःखी होतात आणि परिणामी याचा जितका लाभ त्यांना स्वतःला आणि जगाला व्हायला पाहिजे तितका होत नाही. ज्या लोकांना हा नियम कळतो त्यांच्या ज्ञानामुळे त्यांना या

नियमाचे पालन करण्याकरिता प्रोत्साहन मिळते. या नियमाचे पालन करणारांवर त्याचा चमत्कारिक प्रभाव असतो. याचे कारण यामुळे त्यांना परम शांतता मिळते, त्यांची सेवाशक्तीत आणि आरोग्यात वाढ होते.

माझ्यावर टॉलस्टॉयचा फार प्रभाव पडला आहे. आणि त्यांनी सांगितलेल्या गोष्टींनुसार तर मी दक्षिण आफ्रिकेत असतानापासूनच शक्य तितके आचरण करू लागलो होतो. आश्रम सुरू झाला तेव्हापासून त्यात भाकरीकरिता श्रम या नियमाला प्रमुख स्थान मिळाले.

'गीतेचा' अभ्यास केल्यानंतर तिसऱ्या अध्यायात मला यज्ञस्वरूपात हाच नियम दिसतो. मला असे म्हणायचे नाही की यज्ञाचा अर्थ शरीरश्रम आहे. परंतु यज्ञामुळे पाऊस पडतो (पाहा संपूर्ण गांधी वाङ्मय, खंड ३२, पृष्ठ १५७) अशी जी भावना व्यक्त करण्यात आली आहे त्यातून मला शरीरश्रमाचा धर्म दिसतो. यज्ञातून वाचलेले अन्न तेच आहे जे मेहनत केल्यानंतर मिळते. (पाहा संपूर्ण गांधी वाङ्मय, खंड ३२, पृष्ठ १५७) आजिविकेकरिता पुरेशा श्रमाला 'गीता' यज्ञ म्हणते. आपल्या पोषणाकरिता आवश्यक असलेल्या अन्नापेक्षा जो जास्त खातो तो चोरी करतो. याचे कारण माणूस आजीविकेकरिता श्रमसुद्धा मोठ्या मुश्किलीने करू शकतो. माझे मत आहे की माणसाला आजिवेकेपेक्षा जास्त घेण्याचा अधिकार नाही.  आणि जे लोक शरीरश्रम करतात त्यांना तितके घेण्याचा अधिकार तर आहेच जितके त्यांच्या आजिविकेकरिता आवश्यक आहे.

यावर कोणी असे म्हणू शकेल की यात श्रमविभाजनाला वावच नाही. माणसाच्या आवश्यकतेकरिता जे काही तयार होते त्यात शरीरश्रम तर लागतच असतात. यामुळे श्रम जरी कोणत्याही आवश्यक क्षेत्रात करण्यात येत असले तरी ते भाकरीकरिता श्रमच आहे. परंतु लोक इतकेही श्रम करत नाहीत. यामुळे आरोग्य चांगले ठेवण्याकरिता त्यांना व्यायामाच्या नावावर विशेष असे शारीरिक श्रम करावे लागत असतात. जो दररोज शेतीत मेहनत करतो त्याने वेगळा व्यायाम करण्याची आवश्यकता नसते. शेतकरी जर आरोग्याच्या इतर नियमांचे पालन करील तर तो आजारी पडणारच नाही.

असे आढळले आहे की माणसाला दररोज जितके पाहिजे तितके निसर्ग निर्माण करत असतो. त्यातून जर कोणी आपल्या गरजेपेक्षा अधिक घेत असेल तर त्याच्या शेजाऱ्याला उपाशी राहावे लागते. बरेच लोक आपल्या आवश्यकतेपेक्षा अधिक घेत असतात. हेच कारण आहे की ज्यामुळे आपल्याला उपासमार दिसते. निसर्गाने दिलेल्या देणगीचा आपण कसाही उपयोग करो, निसर्ग तर आपल्या जमाखर्चाच्या दोन्ही बाजू समान ठेवत असतो. त्याच्या वहीखात्यात ना जमेच्या बाजूने शिल्लक राहते ना नावेच्या बाजूने. तिथे तर आयव्ययचा

हिशेब बरोबर होत असतो आणि शेवटी शून्य शिल्लक राहत असते. आणि या शून्यात आपणही शून्य होऊन सामावून जायचे आहे.

माणूस विविध रसायन आणि यंत्रांद्वारे जमिनीतून अधिक उत्पन्न घेतो, आपल्या मेहनतीने तो इतर अनेक उपयोगी वस्तू निर्माण करतो, निसर्गाच्या शक्तीचेच हे रुपांतर आहे ही गोष्ट वरील नियमाला बाधक होत नाही. या सर्वांचा अखेरीस परिणाम तर शून्यच होणार आहे. रोजच्या रोज हे आकडे जुळवण्याइतकी साधने आपल्याजवळ नाहीत. परंतु आम्हांला दररोज जो काही अनुभव येतो त्याचे जर विश्लेषण केले तर त्यातून असाच निष्कर्ष निघतो की जमेच्या आणि खर्चाच्या दोन्ही बाजू बरोबर असतात.

निसर्ग असे करत असो वा नसो, माझ्या इतर युक्तिवादात सार असो वा नसो, परंतु आश्रमात भाकरीकरिता श्रम या नियमाचे चांगल्या प्रकारे पालन करण्यात येते यात नवल वाटावे असे काहीही नाही. याचे पालन करण्याकरिता साधारण आग्रह असेल तर पालन सुलभ होते. जर काही तासात शरीरश्रमाशिवाय दुसरे काही कामच नसेल तर मजुरी तर आहेच. मग त्यात आळशीपणा जरी असला, कार्यदक्षता नसली, मन नसेल तरी काही तास तर पूर्ण होतीलच. शिवाय काही मेहनत लगेच फळ देणारी असल्यामुळे त्यात आळसालासुद्धा फारसा वाव नसतो. श्रमप्रधान संस्थेत एक तर नोकर नसतात वा असले तरी फार कमी असतात. पाणी भरणे, लाकूड कापणे वा फोडणे, दिवाबत्ती तयार करणे संडास आणि रस्ते साफ करणे घरांची साफसफाई करणे, आपापले कपडे धुणे, स्वयंपाक वगैरे काम अशी आहेत की जी व्हायलाच पाहिजे.

याशिवाय शेती, विणाई, आणि त्यांच्याशी संबंधित इतर काम आश्रमात असतात. त्यात थोडे वा सर्व आश्रमवासी लागल्याशिवाय कामच होऊ शकत नाही. हे सर्व काम भाकरीकरिता श्रम म्हणून पुरेशी समजली जातात.

परंतु यज्ञाचा दुसरा भाग परमार्थ वा सेवेचे काम आहे. या कामात जर त्या कामाचा समावेश केला तर आश्रमाची उणीव निश्चितच लक्षात येईल. सेवेकरिता जगणे हाच आश्रमाचा आदर्श आहे. अशा पद्धतीने चालणाऱ्या आश्रमात कामचोरीला स्थान नसते. तिथे सर्व काम तनमनाने व्हायला पाहिजे. सर्व लोकांनी जर असे केले असते तर आज आश्रमाची सेवा करण्याची पात्रता किती तरी वाढली असती. परंतु अशा सुंदर परिस्थितीपासून आश्रम आजही किती तरी दूर आहे. यामुळे आश्रमाचे सर्व काम जरी यज्ञरूप असले, तरी आदर्शाचा विचार करून दरिद्रनारायणाकरिता कमीकमी एक तास कताईला आवश्यक सेवेचे स्थान देण्यात

आले आहे. ज्याचे शरीर काम करू शकते त्याच्याकरिता कताई अनिवार्य आहे. या स्थितीत पोहोचण्याकरिता बरीच मेहनत करावी लागली आहे. परंतु याचा विचार खादीकार्याचे वर्णन करताना करणे चांगले होईल.

वेळोवेळी असा आरोप ऐकण्यात येत असतो आणि आजही ऐकू येतो की श्रमप्रधान संस्थेत बुद्धिविकासाला फार कमी वाव असतो. श्रमामुळे माणूस जड होतो. माझा अनुभव याउलट आहे. आश्रमात जितके काही लोक आले आहेत त्या सर्वांची बुद्धी काही प्रमाणात तरी धारदार झाली आहे. कोणाचीही बुद्धी मंद झाली असल्याचे लक्षात आले नाही.

अनेकदा असा अर्थ करण्यात येत असतो की जगातील अनेक घटनांचे मान्य असलेले बाह्य ज्ञानच बुद्धी आहे. मला कबूल करावे लागेल की अशी बुद्धी आश्रमात कमी विकसित होते. परंतु बुद्धीचा अर्थ जर आकलन, विवेक वगैरे असेल तर ती आश्रमात बरीच विकसित होते. जिथे शरीरश्रम मजुरीकरिता आणि पोट भरण्याकरिता करण्यात येतात तिथे माणूस जड होणे शक्य असते. विशिष्ट गोष्ट कशाकरिता वा कशा प्रकारे तयार होते याचे ज्ञान त्याला कोणीही देत नाही आणि त्याला स्वतःला या विषयाबद्दल जिज्ञासा नसते. त्याला स्वतःच्या कमातही रस वाटत नसतो. आश्रमात याच्या उलट होत असते. प्रत्येक काम - अगदी संडास सफाईचे कामसुद्धा समजून घेऊन करावे लागत असते. त्यात रस घ्यावा लागतो, ते काम परमेश्वर प्रसन्न व्हाहा म्हणून करण्यात येत असते. यामुळे ते काम करत असतानाही बुद्धिविकासाला वाव असतो. सगळ्यांना आपापल्या विषयाचे ज्ञान मिळवण्याकरिता प्रोत्साहित करण्यात येत असते. जे हे ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करत नसतात त्यांच्याकरिता ही गोष्ट मान्य करता येऊ शकते. आश्रमात सर्व मजूर आहेत वा कोणीही मजूर नाही.

असे समजणे की पुस्तकातूनच, टेबल खुर्चीवर बसूनच ज्ञान मिळते, बुद्धीचा विकास होतो हे घोर अज्ञानाचे चिन्ह आहे, फार मोठा भ्रम आहे. यातून तर आपण बाहेर पडायलाच पाहिजे. जीवनात वाचनाला निश्चितच स्थान आहे, परंतु ते आपल्या जागेवरच शोभते. शरीरश्रमाची हानी करून ज्ञानाचा पुरस्कार केला गेला तर त्याविरुद्ध बंड पुकारणे आपले कर्तव्य होऊन जाते. शरीरश्रमाला दिवसभरात जास्त वेळ दिला पाहिजे आणि वाचन वगैरेला कमी. आजकाल या देशात तथाकथित उच्च वर्णाचे लोक शारीरिक श्रमाला कमी लेखतात, त्याचा अनादर करतात. शारीरिक श्रमाला उच्च दर्जा देणे आवश्यक आहे. तसचे बुद्धीशक्तीला वेग देण्याकरिताही शारीरिक श्रमाला त्याची आवश्यकता असणाऱ्या कोणत्या तरी उपयोगी व्यवसायात लावणे आवश्यक आहे.

वाचनाला आश्रम जर काही जास्त वेळ देऊ शकत असेल तर तो वेळ देण्यासारखा आहे. जो आश्रमवासी निरक्षर आहे त्याला जर शिक्षकाची मदत देता येऊ शकत असेल तर तीही द्यायला पाहिजे. तरीही असे वाटते की जे जे काम आश्रमात होत आहे त्याचे नुकसान करून वाचन वगैरेंमध्ये वेळ घालवण्यात येऊ नये. शिक्षक पगारावर तर ठेवले जाऊ शकत नाही. आणि जोपर्यंत आश्रम शिक्षण देणाऱ्या लोकांना आपल्याकडे ओढू शकत नाही तोपर्यंत जितके लोक आहेत तितक्यांनीच काम भागवावे लागेल. शाळेत आणि महाविद्यालयात शिकलेले जे लोक आश्रमात आहेत ते श्रम आणि शिक्षण यांचा समन्वय करण्याच्या कलेत पुरसे दक्ष नाहीत. आम्हा सर्वांकरिता हा नवा प्रयोग आहेत. अनुभवाने काम कसे करावे याबद्दलचे आकलन वाढत चालले आहे आणि जसजशी व्यवस्थाशक्ती विकसित होत जाईल तसतसे ज्या लोकांना सामान्य शिक्षण मिळालेले आहे त्या लोकांचे कामाचे आकलन वाढत जाईल आणि ते आपले ज्ञान दुसऱ्याला देत जातील.

## स्वदेशी

आश्रम स्वदेशीला सार्वभौम धर्म समजतो. प्रत्येक माणसाचे पहिले कर्तव्य आपल्या शेजाऱ्याबद्दल असते. यात विदेशांबद्दल द्वेषभावना नाही, आणि स्वदेशाबद्दल पक्षपातही नाही. शरीरधारीची सेवा करण्याची मर्यादा असते. तो आपल्या शेजाऱ्याबद्दलचे कर्तव्यसुद्धा मोठ्या मुश्किलीने पार पाडू शकतो. आपल्या शेजाऱ्याबद्दलचे कर्तव्य जर सर्व लोक चांगल्या प्रकारे पार पाडू शकले तर मदतीच्या अभावामुळे जगात कोणीही दुःखी होणार नाही. यामुळेच माणूस आपल्या शेजाऱ्याची सेवा करून सर्व जगाची सेवा करत असत असतो असे म्हणतात. खरे पाहता या स्वदेशी धर्मात आपलापरका असा भेदभाव असूच शकत नाही. शेजाऱ्याबद्दलचे आपले कर्तव्य पालन करण्याचा अर्थ आहे जगाबद्दलचे कर्तव्यपालन. आणि अजून कोणत्याही प्रकारे जगाची सेवा होऊच शकत नाही. ज्याच्या दृष्टीत संपूर्ण जगच कुटुंब आहे त्याला आपल्या जागेवर राहूनच संपूर्ण जगाची सेवा करता आली पाहिजे. आणि काम तर शेजाऱ्यांद्वारेच होऊ शकते. टॉलस्टॉय तर याही पुढे जाऊन सांगतात की सध्या तर आपण एकमेकांच्या खांद्यावर बसलेलो आहो. आपण दुसऱ्याच्या खांद्यावरून उतरलो तर तितके पुरेसे आहे. हे विधान हीच गोष्ट वेगळ्या पद्धतीने सांगते. स्वसेवा केल्याशिवाय कोणीही परसेवा करूच शकत नाही. आणि दुसऱ्याची सेवा न करता जर कोणी केवळ आपली सेवा करण्याच्या दृष्टीने काम सुरू करत असेल तर तो स्वतःची आणि जगाचीही हानी करत असत असतो.

कारण स्पष्ट आहे. आम्ही सर्व जीव एकमेकांशी इतके काही जुळलेलो आहो की एक माणूस जे काही करतो त्याचा चांगला वा वाईट परिणाम सर्व जगावर होत असतो. आपल्या अतिसीमीत दृष्टीमुळे जरी आपण पाहू शकलो नाही, जरी एका माणसाच्या कामाचा संसारसागर नगण्य होत असेल तरी तो होत असतो इतके खरे आहे. आपली जबाबदारी समजण्याकरिता इतके ज्ञान पुरेसे आहे.

यामुळे शुद्ध स्वदेशी धर्म विदेशींच्या विरोधात नाही. तरीही स्वदेशी सर्वदेशी नाही कारण असे करता येणे अशक्य आहे. 'सर्वांचे' करायला गेलो तर ते होत नाही, आणि 'आपले'ही निघून जाते. 'आपले' करत गेल्याने 'सर्वांचे' होत असते. 'सर्वांचे' करण्याचा हाच एकमेव उपाय आहे. 'माझ्याकरिता सर्व समान आहेत' असे म्हणण्याचा अधिकार त्यालाच आहे ज्याने शेजाऱ्यांबरोबरचे आपले कर्तव्य पार पाडले आहे. 'माझ्याकरिता सर्व बरोबर आहेत' असे म्हणून जो शेजाऱ्यांचा तिरस्कार करतो आणि आपले शौक पूर्ण करतो तो स्वेच्छाचारी असतो, स्वच्छंदी असतो. तो केवळ स्वतःकरिताच जगत असतो.

काही साधू पुरुषांना आपले ठिकाण सोडून जगभरात फिरत असताना आणि 'परदेशातील लोकांची' सेवा करताना आपण पाहतो. ते वाईट काम करतात वा स्वदेशी धर्माच्या दृष्टीने अपवाद आहेत अशी गोष्ट नाही. त्यांचे हात त्यांच्याकडून शक्तीपेक्षा जास्त सेवा करवून घेतात. कोणत्याही माणसाजवळ राहणारा त्याचा शेजारी असतो. दुसऱ्याचा शेजार त्याच्या गावापर्यंत पोहोचलेला असू शकतो, तर तिसऱ्याचे शेजारी आजूपाजूच्या दहा गावात पसरलेले असू शकतात. अशा प्रकारे सर्व आपापल्या शक्तीप्रमाणे काम करतील. सामान्य माणसाची शक्तीही सामान्यच असते. व्याख्या अशी केली पाहिजे की जी सर्वसाधारण माणसाला लागू होईल. या व्याख्येच्या भावार्थात त्या सर्व गोष्टी सामावू शकतात, ज्या त्याच्या विपरीत नसतील. स्वदेशीचा वापर करून आपण कोणाची सेवा करत आहो हे सामान्य माणस कळतच नाही. तो आपल्या शेजाऱ्याशी व्यापार करतो कारण तसे करणे त्याच्याकरिता सोयीस्कर असते असे समजणे योग्यच आहे. परंतु या सोयीत कधीकधी गैरसोयही असते. ज्याला स्वदेशीचा धर्म कळतो तो गैरसोय असतानाही त्याचे पालन करील. आपल्याच देशात तयार झालेल्या गोष्टींनी आज बहुतेक लोकांचे समाधान होत नाही. अनेक प्रकारचे प्रलोभन दाखवण्यात येत असल्यामुळे आजकाल विदेशी वस्तु विकत घेणे लोकांना सुविधाजनक आहे असे वाटते. अशा वेळी सांगावे लागत असते की स्वदेशी केवळ सोयच नाही तर धर्मही आहे. हिंदुस्थानात आज अशीच परिस्थिती असल्यामुळे स्वदेशी धर्म समजावून सांगावा लागत असतो. दुसऱ्या देशाच्या द्वेषातून

अनेकदा स्वदेशीचा जन्म होतो. तो पूर्णपणे त्याज्य आहे. कोणाचे वाईट करणे वा चिंतणे हा धर्म होऊच शकत नाही.

या स्वदेशीचे पालन आपल्या देशाकरिता धर्म आहे.

माझ्या मते खादी या स्वदेशीचे साकार रूप आहे. तिचे पालन सोडून हिंदुस्थानने घोर पाप केले आहे, आणि आपला स्वाभाविक धर्म सोडून दिला आहे. खादीच्या आवश्यकतेसंबंधी अनेक ठिकाणी आणि वेगवेगळ्या प्रसंगी बरेच काही लिहिण्यात आले आहे. इथे तर खादीचा आश्रमाशी कसा संबंध आला हेच सांगण्याकरिता याचा उल्लेख करण्यात आला आहे. परंतु याचा उल्लेख करण्यात खादीकार्याच्या सुरुवातीचा इतिहास येऊन जातो.

१९०८ साली मला पहिल्यांदा चरखाधर्म आणि खादीधर्म सुचला. (या विषयावरील आपले विचार गांधीजींनी हिंद स्वराजमध्ये लिहिले आहेत पाहा - संपूर्ण गांधी वाङ्मय खंड १०, पृष्ठ ५७ - ६०.) त्या वेळी चरखा कसा असतो याची मला कल्पनाही नव्हती. मला चरखा आणि मागातील अंतरही माहीत नव्हते. हिंदुस्थानातील गावांचे मला फार कमी ज्ञान होते. परंतु मला स्पष्टपणे दिसत होते की हिंदुस्थानची गावे कंगाल होण्याचे कारण चरख्याचा नाश आहे. मी ठरवून टाकले की हिंदुस्थानात जाईन तेव्हा चरख्याचा प्रचार करीन.

१९१५ साली मी जेव्हा देशात आलो तेव्हा मनात हा विचार तर भरलेलाच होता. आश्रमाच्या स्थापनेबरोबरच स्वदेशीचे व्रत सुरू झाले होते. परंतु आमच्यापैकी कोणालाही माहीत नव्हते की सूत कसे काततात. यामुळे हातमाग लावूनच आम्ही समधान मानले. सगळ्यांच्या मनातून तलम कपड्यांचा मोह मिटला नव्हता. स्त्रियांची साडी तयार करण्याइतके स्वदेशी सूत तर मिळतच नव्हते. यामुळे विदेशी सुताद्वारे विणाईचे काम सुरू केले. नंतर काही गिरण्यांमधून स्वदेशी सूत विकत घेतले आणि विदेशी सुताला निरोप दिला.

आश्रमात माग बसवण्यातही बऱ्याच अडचणी होत्या. आमच्यापैकी कोणालाही विणाईचे ज्ञान नव्हते. मित्राद्वारे माग मिळवला आणि माग शिकवू शकणारा विणकर शोधला. विणाई शिकण्याचे ओझे मगनलालवर पडले.

जसजसे आश्रमात प्रयोग करत गेलो तसतसा देशात स्वदेशीचा प्रयोगही करत गेलो. परंतु जोपर्यंत सूत कातले जाऊ शकत नव्हते तोपर्यंत बिन वराची वरात सारखेच झाले होते. अखेरीस चरखा मिळाला,

कताई करणारी मिळाली आणि चरख्याचा आश्रमात प्रवेश झाला. ही हकिगत 'सत्याचे प्रयोग'मध्ये आली आहे. (पाहा संपूर्ण गांधी वाङ्मय, खंड ३९, पृष्ठ ३६६-६८)

कोणी असे समजू नये की चरखा मिळाला आणि सर्व अडचणी दूर झाल्या. अडचणींचे सूक्ष्म ज्ञान झाले आणि जसजशा त्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करू लागलो तसतशा नवीन अडचणी डोकेवर काढू लागल्या. म्हणजेच अडचणी कमी न होता त्या वाढल्या.

देशाचा दौरा करत असताना असे काही झाले नव्हते चरख्याची गोष्ट केली आणि जनतेने त्याचा स्वीकार केला. हे माहीत होते की त्यात कमाई थोडीच आहे. परंतु हे माहीत नव्हते की किती कमी असेल. चरख्यातून एकसारखे आणि बारीक सूत निघत नाही. बहुतेक स्त्रिया तर जाड-बारीक सूतच कातत होत्या. शिवाय असेही आढळले की सूत कच्चे असते. कशाही प्रकारच्या रुईने काम होऊ शकत नाही. तिला पिंजावे लागते, पेळू तयार करावे लागतात. कापूस कोणत्या प्रकारचा मिळाला आहे यावरच रुईची प्रत अवलंबून राहणार होती. चरखा जर कसाही असला तर काम भागत नाही. यामुळे चरख्याचा पुनरुद्धार करणे आवश्यक होते. याचाच अर्थ एक मोठी योजना तयार केली पाहिजे. हे काम केवळ पैसा काम करू शकणार नाही. एकदोन माणसांच्या आटोक्यातील ही गोष्ट नाही. शेकडो सेवक मिळतील तेव्हाच हे काम होईल. सेवकसुद्धा सामान्य पातळीचे नको. ते असे असणे आवश्यक होते की ज्यांची नवीन शास्त्र शिकायची तयारी असेल, थोड्या कमाईत समाधान वाटेल आणि ग्रामीण जीवन व्यतीत करण्याची त्यांची तयारी असेल. इतकेसुद्धा पुरेसे नव्हते. ग्रामीण लोकांमध्ये आळस, निराशा आणि अविश्वास भरलेला आहे. हे दुर्गुण नाहीसे झाले नाही तर चरखा गावखेड्यात प्रवेश करू शकणार नव्हता. यामुळे चरखा यशस्वी करण्याकरिता सेवक आणि सेविका या दोघांचीही गरज होती. आणि याचबरोबर अतूट धैर्य आणि अढळ श्रद्धा नसेल तर चरखा चालू शकत नव्हता.

सांगण्याची आवश्यकता नाही की अशा श्रद्धेत आधी तर मी एकटाच होतो. आणि श्रद्धेशिवाय माझ्याजवळ दुसरी कोणतीही शक्ती नव्हती. मी पाहिले आहे की जिथे श्रद्धा असते तिथे इतर साधने आपोआप जुळत जात असतात. श्रद्धेनुसारच बुद्धी सुचत जात असते, श्रम करता येत असतात. हे तर स्पष्ट झाले होते की सर्व प्रयोग आश्रमात आणि आश्रमाद्वारेच केले जाणार होते. आश्रमाचे अस्तित्त्व याकरिताच होते. माझ्या लक्षात आले की आश्रमाचे मुख्य बाहेरचे काम चरखाच असू शकत होते. चरखाशास्त्र तयार करण्याचा दुसरा

कोणताही मार्ग नव्हता. यामुळे कताईक्रियेला अखेरीस महायज्ञ समजण्यात आले. यामुळे जो कोणी आश्रमात प्रवेश करील त्याला कताई शिकून हा यज्ञ करावाच लागणार होता.

परंतु यज्ञाचा अर्थ आहे कामाबरोबरच त्यातील कौशल्यसुद्धा मिळवणे. (पाहा गीता २ - ५० योगः कर्मसु कौशलम्) कशीही कताई म्हणजे यज्ञ होत नाही. यामुळे आधी तर अर्धा तास कताई करण्याचा निश्चय केला. परंतु लवकरच लक्षात आले की चरखा बिघडला तर अर्ध्या तासात चारपाच तारही निघत नसतात. यामुळे कमीतकमी १६० तार तर कातायचेच असे ठरले. एक तार म्हणजे चार फूट सूत. परंतु सूत पातळजाड असेल तर काय कामाचे? यामुळे सुताची समानता, मजबुती यावर भर देण्यात आला. आणि आता तर या परिस्थितीत पोहोचलो आहो की २० अंकाच्या कमी प्रतीचे सूत असेल तर त्याची यज्ञात गणनाच होत नाही.

परंतु चांगल्यात चांगल्या सुताचा उपयोग कोण करील? माझ्या तर आधीच लक्षात आले होते की यज्ञाकरिता अशा सुताची कताई करणारे लोक स्वतःकरिता त्याचा उपयोग करूच शकत नाही. परंतु ही गोष्ट मी सर्वांच्या गळी उतरवू शकलो नाही. कोणी सुताची मजुरी स्वतः देईल आणि सूत विकत घेईल तर काय हरकत आहे? असे केल्याने चांगल्यात चांगले सूत कातले जाईल. यामुळे मी मनाला समजावले की मजुरी चुकवून जो सूत विकत घेईल तोसुद्धा यज्ञात भाग घेणारा आहे समजले जाईल. यो ओळी लिहीत असतानासुद्धा ही उणीव दूर करता आलेली नाही. जो दोष सुरुवातीपासूनच काढून टाकला जात नाही तो कायम वास्तव्य करून टाकतो. आणि शरीरात घर केलेला रोग जसा हटवणे कठीण असते तसेच या रोगाचेही होते.

असे म्हणता योऊ शकते की यज्ञाच्या या फलश्रुततेमुळेच चरखा हिंदुस्थानभरात इतक्या तीव्र गतीने पसरला आहे. परंतु असे म्हणता येत नाही की त्याने गावोगावी आणि घरोघरी घर केले. याचे कारण मला स्पष्टपणे दिसू शकते. माझ्या श्रद्धेबरोबर ज्ञान मुळीच नव्हते. चुका करत करत, ठेचा खात खात थोडेसे ज्ञान मिळाले. सहकारीसुद्धा मिळाले, परंतु असे म्हणता येत नाही की या महान कार्याकरिता ते पुरेसे होते. शेकडो सेवक तयार झाले आहेत, परंतु असेही म्हणता येत नाही की त्यांच्यात अढळ श्रद्धा आणि ज्ञान होते. जिथे मुळातच जोम नाही तिथे पूर्णपणे परिपक्व फळ कसे मिळेल?

परंतु माझ्या मते यात कोणाचाही दोष नाही. हे नवीन काम आहे, महासागरासारखे विशाल आहे आणि यातील अडचणींना तर सीमाच नाही. परंतु एवढ्याकरिता जितके झाले त्यावर समाधान तर मानता येत नाही. असे जरी असले तरी माझी श्रद्धा टिकवून ठेवण्याकरिता ते पुरे◌ेसे आहे. यशाची अपेक्षा पूर्णपणे करता येते.

इतके ज्ञान मिळाले आहे आणि इतके श्रद्धाळू सेवक सेविका मिळाले आहेत की हे काम आता नष्ट तर होणार नाही असे निश्चितच म्हणता येते.

या एका कामाबरोबर आश्रमात आणि देशात इतके काही लहान लहान काम निर्माण झाले की त्यांचाही इतिहास लिहिण्याची इच्छा होते. परंतु तसे केले तर इतिहासाचे सीमोल्लंघन होईल. मी अशी कल्पना केली नव्हती की आश्रमाचा इतिहास सांगताना इतरही सर्व विभागाचा इतिहास सांगण्याचे साहस करावे लागेल. परंतु थोडक्यात सांगतो की त्यासंबंधात शेती होते, सुताराचे काम चालते, रंगाई, धुनाईच्या कामापासून तर विणकामाचे अवजार तयार करण्याचेसुद्धा काम चालते. त्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत आणि अजूनही सुरू आहेत. चरख्याचे प्रकार सुधारण्यात जी प्रगती झाली आहे ती तर मला एखाद्या काव्यासारखी वाटते.

## अस्पृश्यता

सत्याचा आग्रह कायम ठेवण्याकरिता आणि त्याकरिता मरावे लागणार असेल तर मरण्याची कला शिकण्याकरिता आश्रमाची स्थापना झाली आहे. अस्पृश्यता कलंक आहे असा विश्वास असतानाही ती दूर करण्याचा प्रयत्न केला जाणार नसेल तर सत्याग्रह आश्रमाला सत्याग्रह आश्रम कसे म्हणता येईल? मी आणि माझे सहकारी दक्षिण आफ्रिकेतच अस्पृश्यतेला पाप मानणे शिकलो होतो. यामुळे इथे आश्रमाची स्थापना होताच अस्पृश्यता निर्मूलनाचे मोठे काम सुरू झाले.

आश्रम सुरू झाल्यानंतर एक महिन्यातच दुधाभाईंनी आपल्या कुटुंबासह आश्रमात राहण्याची मागणी केली. इतक्या लवकर आश्रमाची परीक्षा होईल अशी मला कल्पना नव्हती. दुधाभाईंना भरती करण्याची शिफारस अमृतलाल ठक्कर यांनी केली होती. त्यांनी शिफारस केलेल्या कुटुंबाचे मी स्वागत केलेच पाहिजे. यामुळे मी त्यांना येण्याचे पत्र लिहून टाकले. हे कुटुंब येताच आश्रमात खळबळ सुरू झाली. (पाहा संपूर्ण गांधी वांङ्मय, खंड ३९, पृष्ठ ३०१-३ सुद्धा.)

मी पाहिले की आश्रमात जे लोक राहत होते त्यांच्या मनात कुठे ना कुठे या कुटुंबाबद्दल घृणा होती. माझ्या पत्नीतही. जरी दक्षिण आफ्रिकेत याकरिता तिला बराच त्रास सहन करावा लागला होता तरी यासंबंधात तिच्या मनात अजूनही स्पर्शास्पर्शतेची भावना कायम होती. मगनलालसारख्या बहाद्दूर माणसाच्याही लक्षात

आले की त्याच्यातही यासंबंधात कुठे तरी दोष राहिलेला आहे. त्याच्या बायकोत तर त्यापेक्षाही जास्त. इथपर्यंत वेळ आली की माझ्या पत्नीने एक तर आश्रम सोडावा वा आश्रमाच्या कठोर नियमांचे पालन करावे. स्पर्शास्पर्शतेवर विश्वास ठेवणारांनी माझ्या बायकोची समजूत घातली की नवऱ्याच्या पावलावर पाऊल टाकून चालणाऱ्या स्त्रीला पाप लागतच नाही, परंतु न चालण्याने पाप निश्चितच लागते. याचा पत्नीवर परिणाम झाला आणि ती शांत झाली. पत्नीने पतीच्या पापात सहभागी होणे तिचा धर्म आहे यावर माझा मात्र विश्वास नाही. परंतु इथे मात्र मी पत्नीच्या सहकार्याचे स्वागत केले कारण अस्पृश्यता नाहीशी करणे हे पूण्यकर्म आहे असे मी समजत होतो. आश्रमात राहण्याकरिता अस्पृश्यतानिवारण ही एक अट होती. यामुळे माझ्या बायकोने जर या अटीचे पालन केले नसते तर तिला आश्रमाबाहरच राहावे लागले असते. ही गोष्ट माझ्याकरितासुद्धा दुःखद होती. जीने अतिशय त्रास सहन करून माझ्या प्रत्येक सुखदुःखात साथ दिली होती तिचा वियोग सहन करणे माझ्याकरिताही कठीण होते. परंतु धर्मपालनाकरिता कसाही त्रास झाला तरी तो सहन करणे भागच होते. यामुळे स्वतंत्रपणे जरी नाही तरी पत्नीधर्म म्हणून माझ्या पत्नीने जेव्हा स्पर्शास्पर्शता सोडली तेव्हा मला तिचा स्वीकार करण्यात संकोच वाटला नाही.

मगनलालची परीक्षा माझ्याहूनही कडक होती. त्याने तर क्षणात आश्रम सोडायचा विचार करून टाकला. सामान बांधून तो माझी परवानगी घ्यायला आला. मी परवानगी कसा देणार? मी मगनलालला सावध केले. आश्रम उभारण्यात जितका माझा हात होता तितकाच त्याचाही होता. त्याने स्थापिलेली गोष्ट तोच कसा तोडू शकत होता? मगनलालची तशी इच्छा नव्हती. हे सर्व मगनलालकरिता फार होत होते. स्वतःच घडवलेली गोष्ट सोडण्याची परवानगी तो तरी कसा मागणार होता? अशा प्रकारे तो आश्रम सोडून जाऊच शकत नव्हता. मी इतके सांगणे मगनलालकरिता फार झाले. हे लिहीत असताना मला तर असे जाणवते की माझा मार्ग निष्कंटक करण्याकरिताच मगनलालला ते पाऊल उचलणे योग्य वाटले असावे. मी सर्वांचा वियोग सहन करू शकत होतो, परंतु मगनलालचा वियोग सहन करणे माझ्याकरिता कठीण होते. यामुळे मगनलालला मी कुटुंबासह मद्रासला जा असे सांगितले. तिथे जाऊन दोघांनीही शांत व्हावे आणि विणाईच्या कलेचे जास्त ज्ञान मिळवावे असे मी सांगितले. आश्रमात जो विणकर आला होता त्याने एका सीमेपलीकडे शिकवायला नकार दिला होता. त्याला निरर्थक भीती वाटत होती की असे केल्याने आपला धंदा बसून जाईल. मद्रासमध्ये स्वर्गीय त्यागराज चेट्टींनी हाताने विणकाम करायचे काम शिकण्याकरिता आपल्या कारखान्यात मगनलालला ठेवले. परंतु मद्रासच्या कारागिरांनाही अहमदाबादच्या कारागिरांसारखीच भीती वाटत होती. यामुळे कारागीर

मनमोकळेपणाने आपली कला शिकवत नव्हते. मगनलालमध्ये भरपूर वशीकरण शक्ती होती. त्याचे ज्ञानही जास्त होते. माझा विश्वास होता की तो पाहून पाहूनही बरेच काही शिकून घेईल. याचबरोबर दक्षिणेशी सरळ संबंध जोडायचेही काम होते. अशा प्रकारे मगनलालला मद्रासला पाठवण्याकरिता मला धर्मसंकटाचे निमित्त मिळाले. मगनलालला आणि त्याच्या बायकोला ही गोष्ट आवडली. ते मद्रासला गेले आणि तिथे जवळपास सहा महिने राहिले. दोघेही विणाईचे काम चांगल्या प्रकारे शिकले. तसेच गंभीरपणे विचार करून त्यांनी आपल्या मनातील अस्पृश्यतेचा कलंक पूर्णपणे काढून टाकला. दोघेही त्यांच्यात शिरलेली दुर्बलता पाहू शकले. मद्रासमधील अस्पृश्यांना ते मनमोकळेपणाने भेटू लागले. त्यांनी इतरांशीही संबंध स्थापित केले आणि काम आटोपल्यानंतर ते आणि मणिलाल सोबत आले.

अशा प्रकारे आश्रमवासींमधील खळबळ शांत झाली. बाहेरही काही कमी खळबळ निर्माण झाली नव्हती. ज्यांनी आश्रमाला मदत करण्याचे आश्वासन दिले होते त्यांतील काहींनी लगेच मदत करणे बंद केले. विहिरीचे पाणी मिळणार नाही अशीही भीती निर्माण झाली. परंतु या संकटातून आम्ही अडथळे न येता पार पडलो. आणि रुपये-पैशासंबंधी 'नरसी मेहताची हुंडी' स्विकारण्या सारख्या घटना घडल्या. अनपेक्षित ठिकाणावरन अचानक १३ हाजार रुपयांच्या नोटा येऊन पडल्या. असे म्हणता येते की आश्रमाने दुधाभाईसंबंधात आलेले सर्व संकट सहन करून निभवून घेण्याची जी प्रतिज्ञा केली होती ती कोणतेही फार मोठे संकट सहन न करावे लागता पूर्ण झाली. अशा प्रकारे अस्पृश्यता मिटवण्याच्या परीक्षेत आश्रम उत्तीर्ण झाला. आता आश्रमात अस्पृश्य कुटुंब सहजपणे येऊजाऊ शकतात आणि राहूही शकतात. दूधाभाईंची मुलगी लक्ष्मी तर अशी झाली आहे की जणू काय ती कुटुंबातीलच मुलगी असावी.

अस्पृश्यांसबंधात आश्रमात तीन व्यवसाय चालतात, आणि त्यांच्यात सुधारणा होत आहेत. आश्रमात राहणाऱ्या सर्वांना भंगीकाम करावेच लागत असते. खरे म्हणजे त्याला व्यवसाय म्हणता येत नाही. ते तर प्रत्येकाचे कर्तव्य आहे. यामुळे संडासाची सफाई सर्व मिळून करतात. ती डॉ. पूर यांनी तयार केलेल्या पद्धतीप्रमाणे होत असते. विष्टा उथळ जमिनीत गाडली जाते. यामुळे थोड्याच दिवसात तिचे खत तयार होते. पूरचे म्हणणे आहे की बारा इंचापर्यंतची जमीन सजीव असते. तिच्यात असीमित जीवजंतू राहत असतात. त्यांचे काम घाणेरडी जमीन स्वच्छ करणे आहे. तोपर्यंत हवा आणि सूर्यकिरण पोहोचत असतात. यामुळे तितक्या खोलवर विष्टा पुरल्यामुळे ती लवकर मातीत परिवर्तित होते. संडासही अशा प्रकारे बनवण्यात येत

असतात की त्यांचा वास येणार नाही आणि सफाई करण्यात थोडासाही त्रास होणार नाही. उपयोग केल्यानंतर प्रत्येक माणूस त्यात भरपूर कोरडी माती टाकतो. इतकी की केव्हाही पाहिले तरी संडास वाळलेला दिसेल.

दुसरा व्यवसाय विणाईचा आहे. गुजरातमध्ये जाड खादी विणकरच विणत असतात. आता त्यांचा व्यवसाय जवळपास नष्ट झाला आहे, आणि बहुतेक लोक भंगीकाम करू लागले आहेत. आता त्या व्यवसायाचा जीर्णोद्धार झाला आहे.

तिसरा चांभाराचा व्यवसाय आहे. हाही आश्रमात सुरू झाला आहे. त्यासंबंधात जास्त माहिती गोसेवेच्या विषयाच्या वेळी सांगितली जाईल.

आश्रमात पोटजातींचे बंधन मान्य केले जात नाहीत. एकदुसऱ्याबरोबर खाण्यापिण्यात अस्पृश्यता पाळली जात नाही. यामुळे आश्रमात सर्व एकाच पंगतीत जेवायला बसत असतात. या व्यवहाराचा प्रचार बाहेर केला जात नाही. अस्पृश्यता मिटवण्याकरिता ही गोष्ट आवश्यक आहे असे समजले जात नाही. अस्पृश्यता मिटवण्याचा अर्थ हा आहे की अस्पृश्यांवर सार्वजनिक संस्थांमध्ये जाण्यासंबंधात जी बंधने आहेत, अडथळे आहेत ते दूर करणे. तसेच त्यांना स्पर्श करण्यासंबंधात जी स्पर्शास्पर्शता पाळली जाते ती मिटवणे. ही बंधने कायद्यानेही हटवली जाऊ शकतात. रोटीबेटी व्यवहार ही यापेक्षा वेगळी सुधारणा आहे. यात कायदा वा समाज हस्तक्षेप करू शकत नाही. या मान्यतेप्रमाणे आश्रमवासी आपल्याकरिता सर्वांबरोबर स्वयंपाक तर करतात परंतु असे करण्याचा प्रचार करत नाहीत.

आश्रमातर्फे अस्पृश्यांकरिता शाळा उघडण्याचा आणि विहिरी खोदण्याचाही प्रयत्न सुरू आहे. यात आश्रमाचे मुख्य काम पैसा गोळा करणे आहे. अस्पृश्यतेसंबंधात आश्रमाचे खरे काम तर अस्पृश्यांशी जे आचरण करण्यात येते त्यात सुधारणा करणे आहे. आश्रमात उच्च-नीचपणाला कोणतेही स्थान नाही.

असे असूनही आश्रम वर्णाश्रमधर्माला हिंदूधर्माचा एक भाग समजतो. चार वर्ण आणि चार आश्रम ही व्यवस्था केवळ हिंदूधर्मातच आहे अशी काही गोष्ट नाही. ही गोष्ट तर सर्व माणसांमध्ये आहे. त्यांचा भंग केल्याने जगाला किती तरी संकटांचा सामना करावा लागला आहे. जसे चार वर्ण आहेत तसेच चार आश्रमही आहेत - ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास. ब्रह्मचर्याश्रमाचा अर्थ आहे विद्याभासाचा काळ. या काळात स्त्री वा पुरुष विद्यार्थ्यांनी केवळ ब्रह्मचर्याचे पालन करणे पुरेसे नाही. या काळात त्याच्यावर विद्यासंपादन करण्याशिवाय दुसरे कोणतेही ओझे असू नये. ही अवस्था किमान २५ वर्षांची असते असे समजण्यात येते.

यानंतर त्या व्यक्तीला गृहस्थ जीवनात प्रवेश करायचा असेल तर तो करू शकतो. ९९.७५ टक्के लोक तर या जीवनात प्रवेश करतीलच. परंतु ते या आश्रमात वयाच्या ५० वर्षापर्यंतच राहू शकतात. या काळात माणसाने विषयांची तृप्ती करावी, व्यवसाय करावा, पैसा कमावावा, मुले निर्माण करावी. बाकी राहिलेली २५ वर्ष पतिपत्नींनी वेगळे राहून केवळ जनहिताचे काम करावे, जनसेवा करावी, कुटुंबासून दूर राहून वसुधैवकुटुंबकम वृती म्हणजे सगळे जग आपले घरच आहे असे समजण्याचा प्रयत्न करावा. अखेरची २५ वर्षे दोघांनीही संन्यास घेऊन व्यतीत करावे. यात कोणताही विशेष व्यवसाय करण्याऐवजी लोकांमध्ये धार्मिक जीवनाचा प्रचार करावा. आदर्श जीवन व्यतीत करून लोकांना आदर्श शिकवावा, आणि त्यांनी स्वतः लोकांच्या दयेवर निर्वाह करावा. स्पष्ट आहे की अशा प्रकारचे जीवन समाजातील बहुतांश लोक व्यतीत करतील तर सामाजिक जीवन फार उच्च पातळीवर जाईल.

परंतु या आश्रमांची वयोमर्यादा वर सांगितली तितकी आजही राहिली पाहिजे की काही वेगळी याबद्दल वेगवेगळी मते असू शकतात. मला माहीत नाही की या आश्रमधर्माचा शोध हिंदूधर्माच्या बाहेरही लागलेला आहे की नाही. आज तर असे सांगता येते की हिंदूधर्मात आश्रमव्यवस्था जवळपास पूर्णपणे नाहीशी झाली आहे. ब्रह्मचर्याश्रम जीवनाचा आधार असूनही त्याच्यासारखी गोष्ट तर जणू काय अस्तित्वातच नाही. दुसऱ्या आश्रमात संन्यासाश्रम केवळ नावानेच ओळखला जातो, बाकी तर बहुतेक संन्यासी केवळ वेषधारी राहिले आहेत. बहुतेक ज्ञानहीन आहेत. आणि ज्या इतर काही लोकांनी चांगले शिक्षण मिळवले आहे तेही ब्रह्मज्ञानी तर नाहीतच, केवळ धर्मांध आहेत. यांत कुठेकुठे निश्चितच चांगले चारित्र्यसंपन्न संन्यासी पाहायला मिळतात. परंतु संन्यासाचे तेज असलेले संन्यासी फार क्वचित पाहायला मिळतात. शक्य आहे की असे लोक अज्ञातवासातच राहत असतील. परंतु हे तर स्वयंसिद्ध आहे की संन्यासाश्रमाचा लोप होतो आहे. ज्या समाजात प्रौढ संन्यासी विचरत असतात त्या समाजात धर्माची आणि अर्थाची कंगाली नसते. तो पराधीन नसतो. आजचा हिंदू समाज धर्महीन, तेजोहीन, अर्थहीन आणि पराधीन आहे. याबद्दल दुसरे मत मी ऐकले नाही. माझे स्वतःचे मत तर असे आहे की संन्यासाश्रम जर जिवंत असता तर दुसऱ्या जवळच्या धर्मांवरही त्याचा प्रभाव पडल्याशिवाय राहिला नसता. संन्यासी काही केवळ हिंदू धर्माचाच नसतो, तो तर सर्व धर्मांचा असतो.

परंतु असे संन्यासी ब्रह्मचर्याश्रमाशिवाय निर्माण होऊ शकत नाही, वानप्रस्थाश्रम तर नावापुरताही नाही. बाकी राहिला गृहस्थाश्रम तर गृहस्थ जीवन आश्रमाच्या रूपात राहिलेले नाही. ते मनमानी करायचे, स्वच्छंदी जीवन जगायचे साधन झाले आहे. त्यात मर्यादा राहिलेली नाही. इतर आश्रमांच्या ढालीशिवाय

गृहस्थ जीवन हे पशू जीवन आहे. गृहस्थ जीवनाची मर्यादा माणूस आणि पशू यांच्यातील मोठे अंतर आहे. तो भेद राहिला नाही तर मनुष्य जीवनात पशुजीवनाशिवाय दुसरे काहीही राहणार नाही असे जर मी म्हणालो तर ती अतिशयोक्ती होणार नाही.

या आश्रमजीवनाचा पुनरुद्धार करण्याचा प्रयत्न आश्रमात सुरू आहे. मला स्वतःला तर हा प्रयत्न एखाद्या मुंगीने गुळाचा डबा आपल्या डोक्यावर उचलायचा प्रयत्न केला तर तो जितका हास्यास्पद वाटेल तितकाच हास्यास्पद वाटतो. परंतु हा प्रयत्न कितीही जरी हास्यास्पद वाटला तरी हा प्रयत्न सत्यनिष्ठेने प्रेरित असलेला प्रयत्न आहे. आणि यामुळेच आश्रमात सर्वांनाच ब्रह्मचर्याचे पालन करावे लागत असते. आश्रमवासींना मरेपर्यंत ब्रह्मचर्याचे पालन करावे लागत असते. यामुळेच आश्रमात राहणाऱ्यांना ब्रह्मचारी म्हणत नसतात. ज्याने आजीवन ब्रह्मचर्य पाळण्याचे व्रत घेतले आहे त्यालाच आश्रमवासी म्हणतात. असे तर फार थोडे आहेत. बाकी सर्वांना आश्रमातील विद्यार्थी समजले जाईल. हा प्रयत्न जर यशस्वी झाला तर त्यातून कदाचित आश्रमव्यवस्था निर्माण होईल. माझ्या मते या प्रयत्नाच्या यशाचा अंदाज करण्याकरिता आश्रमाचे सोळा वर्षांचे जीवन पुरेसे नाही. मला माहीत नाही की हा अंदाज कधी करता येईल. इतकेच सांगू शकतो की सोळा वर्षांच्या प्रयोगानंतर मला किंचितही निराशा जाणवली नाही.

आश्रमव्यस्था जर इतक्या प्रमाणात बिघडली असेल तर वर्णव्यवस्थेची अवस्थाही यापेक्षा काही कमी वाईट नाही. मुळात चार वर्ण होते. आता असंख्य आहेत वा एकच आहे. जातींना जर वर्ण मानले तर जातींना सीमा नाही. आणि जर असे समजलो की जातींचा वर्णांशी संबंध नाही (माझ्या मते तर असेच समजायला पाहिजे.) तर एकच वर्ण राहतो, आणि तो आहे शुद्र. इथे शुद्र हा शब्द दोषसूचक नाही तर वस्तुस्थितीसूचक आहे. जो वर्ग नोकरी करत असतो तो पराधीन असतो, म्हणजे शुद्र असतो. आज तर संपूर्ण हिंदुस्थान पराधीन आहे. यामुळे तो शुद्र आहे. शेतकरी आपल्या जमिनीचा मालक नाही, व्यापारी आपल्या व्यापाराचा मालक नाही. शास्त्रात ब्राह्मणांचे आणि क्षत्रियांचे जसे वर्णन आहे तसे ब्राह्मण आणि क्षत्रिय नशिबानेच पाहायला मिळतील.

वर्णव्यवस्थेचा जेव्हा शोध लागला होता तेव्हा माझ्या मते समाजात उच्च-नीच ही भावना नव्हती. या जगात ना तर कोणी उच्च आहे, ना कोणी खालचा. यामुळे जो स्वतःला उच्च समजतो तो कधीही उच्च असू शकत नाही. जो स्वतःला कमी समजत असतो तो तसे केवळ अज्ञानामुळेच तसे समजत असतो. त्याला कमीपणाचा जो पाठ शिकवण्यात आला आहे तो त्याच्या आधाराने उच्चपणा भोगणारांनी शिकवला आहे.

ब्राह्मणात ज्ञान असेल तर ज्ञानहीन लोक त्याचा आदर करतीलच. परंतु जो ब्राह्मण त्या ज्ञानामुळे अहंकारी होईल वा स्वतःला उच्च मानेल तो त्याच क्षणी ब्राह्मण राहणार नाही. गुणाची पूजा नेहमीच होईल, गुणवान माणूस जर आपल्या गुणांमुळे स्वतःला उच्च समजत असेल तर लगेच त्याचे गुण निरर्थक होऊन जातील. ज्याच्यात कोणताही गुण वा शक्ती आहे तो तिचा रक्षक असतो आणि त्याने त्या गुणांचा वा शक्तीचा समाजाकरिता उपयोग केला पाहिजे. कोणत्याही माणसाला केवळ स्वतःकरिता जगण्याचा अधिकार नाही. आपल्या शक्तीचा उपयोग तो स्वतःकरिता करू शकत नाही. सर्व आपल्या शक्तीचा उपयोग समाजाकरिता करू शकतात.

या कल्पनेतून वर्णव्यवस्थेची स्थापना झालेली असो वा नसो, आज तर कोणीही स्वतःला उच्च समजून जीवननिर्वाह करू शकत नाही. हा दावा समाज आपल्या इच्छेने मान्य करू शकत नाही. हे शक्य आहे की समाज असहाय होऊन आपली मान खाली घालत असेल. आज जगात आलेल्या जागृतीमुळे स्वेच्छाचार कितीही जरी वाढलेला असेल तरी जनता उच्च जातींचा भेदभाव मान्य करायला तयार नाही. दिवसेंदिवस या भेदासंबंधातील नकार वाढत चालला आहे. आत्मस्वरूपात सर्व बरोबरीचे आहेत हे ज्ञान वाढत चालले आहे. आम्हांला सर्वांना ईश्वराने घडवले आहे ही भावनाही उच्चनीच हा भेद मिटवते आहे. याचा अर्थ असा नाही की हा भेद नाहीच वा असायला नको. अर्थात सर्वांची शक्ती समान नाही. सगळ्यांची शक्ती सारखी नसते, सगळ्यांची संपत्ती सारखी नसते, सगळ्यांना समान संधी नाही, तरीही सर्व समान आहेत याचेच नाव भ्रातृभाव आहे, भाऊबहीण सर्व भिन्न प्रकृतीचे, भिन्न शक्तीवाले, वेगवेगळ्या वयाचे असूनही समान असतात. आणि तरीही ते समान असतात. हीच गोष्ट प्राणिमात्रांकरिताही खरी आहे.

अशा प्रकारे वर्णव्यवस्था जर परमार्थाकरिता असेल, धार्मिक असेल उच्च-नीचकरिता वावच राहणार नाही.

अशा प्रकारे एकमेकांना समान सजणारे चार वर्ग समाजात आहेत. आणि ते जन्माच्या आधारावर आहेत. कर्माने ते बदलू शकत असतीलही, परंतु वर्णव्यवस्थेचा आधार जन्म नसेल तर असे वाटते की वर्णव्यवस्थेला काही आधारच राहणार नाही.

वर्णव्यवस्थेत धर्म आणि अर्थाचा संग्रह आहे. त्यात मागील जन्माचा आणि आईवडिलांचा प्रभाव मान्य करण्यात आला आहे. सर्व सारखीच शक्ती आणि वृत्ती घेऊन जन्माला येत नसतात. हेही सांगता येत नाही की असंख्य मुलांच्या शक्तीचा आईवडील वा सरकार अंदाज करू शकेल. परंतु या मान्यतेनुसार जर मुलाला

व्यवसायाकरिता तयार करण्यात येत असेल तर मुलाच्या आईवडिलांचा, आजूबाजूच्या वातावरणाचा आणि पूर्व संस्कारांचा प्रभाव जर पडत असेल तर त्याबद्दल काही वाटायला नको. यामुळे निरर्थक करण्यात आलेल्या प्रयोगाचा वेळ वाचेल, नैतिकतेचा नाश करणारी स्पर्धा होणार नाही, आजीविकेकरिता धावपळ करावी लागणार नाही.

या व्यवस्थेच्या गर्भातच उच्च-नीच हा भेद मिटून जातो. चांभारापेक्षा सुतार मोठा आणि सुतारापेक्षा वकील, डॉक्टर मोठे असतील तर कोणी आपल्या इच्छेने चांभार होण्याचा प्रयत्न करणारच नाही, उलट ते वकील, डॉक्टर व्हायचा प्रयत्न करतील. आणि असे करण्याचा त्यांना अधिकारही असला पाहिजे. ही गोष्ट प्रशंसनीय समजली गेली पाहिजे. याचा अर्थ वर्णव्यवस्था वाईट आहे असे समजून ती नष्ट करण्याकरिता प्रयत्न केला पाहिजे.

प्रत्येकाने आपला वडिलोपार्जित व्यवसाय स्वीकारावा असे म्हणण्याचा अर्थ हा आहे वा असायला पाहिजे की प्रत्येक व्यवसायाला व्यावसायिक मूल्य तितके असले पाहिजे की ज्यामुळे त्याची आजीविका चालू शकेल. चांभारापेक्षा जर सुताराची दिवसाची मजुरी जास्त असेल आणि या दोघांपेक्षाही वकिलाची वा डॉक्टरची मजुरी फार जास्त असले तर मग सगळे वकील, डॉक्टर होण्याचा प्रयत्न करतील. असेच सुरू आहे. यामुळे द्वेष वाढतो आणि वकील डॉक्टरांची संख्या आवश्यकतेपेक्षा जास्त झाली आहे. समाजात जशी चांभाराची सुताराची आवश्यकता असेल तशीच आवश्यकता वकिलांची, डॉक्टरांचीही असू शकेल इथे हे चार व्यवसाय उदाहरणाकरिता घेतलेले आहेत, आणि एकमेकाशी तुलना करण्याकरिता घेतले आहेत. कोणत्या व्यवसायाची समाजाला जास्त आवश्यकता आहे वा बिलकूल नाही हा प्रश्न इथे अप्रस्तुत आहे.

परंतु वर्णव्यवस्था मान्य करण्याबरोबरच हेही मान्य केले पाहिजे की विद्वत्ता हा काही व्यवसाय नाही आणि पैसै वा संपत्ती गोळा करण्याकरिता त्याचा उपयोग व्हायला नको. यामुळे वकील, डॉक्टराच्या ज्या सीमेपर्यंत धंदा मानला जाईल त्या सीमेपर्यंत त्यांनी त्या व्यवसायातून इतकेच घेतले पाहिजे जितके आजीविकेकरिता पुरेसे होईल. आधी असेच होते. गावठी वैद्य सुतारापेक्षा जास्त कमावत नव्हते. त्यांनाही आजीविकेपुरतेच मिळायचे. याचा अर्थ प्रत्येक धंद्याची किंमत समान वा जीविकेकरिता पुरेशी असली पाहिजे. वर्णांचे वैशिष्ट्य माणसाचे कर्तव्य ठरवण्यात आहे. वर्णांची संख्या एक असो वा अनेक, शास्त्रकारांनी तर वर्णांची संख्या चार ठरवली आहे. सर्वांना समान दर्जा दिल्यानंतर त्यांची संख्या एक असो वा अनेक काहीही फरक पडत नाही.

हा अर्थ लक्षात ठेवून वर्णांचा पुनरुद्धार करण्याचा प्रयत्न सुरू आहे. हा प्रयत्न समुद्राच्या लाटा अडवण्यासारखा जरी असेल तरी काही हरकत नाही. दोन मूलभूत गोष्टींचा मी उल्लेख केला आहे - उच्चनीच हा भेद नष्ट करणे आणि सगळ्यांना आजीविका मिळवण्याचा अधिकार देऊन सर्वांची मिळकत समान ठेवणे. हे ध्येय पूर्ण करण्यात जितके यश मिळेल तितकाच समाजाचा लाभ होईल.

कोणी म्हणेल की अशा व्यवस्थेमुळे विद्योपार्जन करण्याची जी होस असते ती कमी होईल हे स्पष्ट दिसत असताना या हानीकडे तुम्ही कसे काय दुर्लक्ष करू शकता? विद्येची हौस आज ज्या कारणामुळे असते ते कारण विद्येला कलंकित करते, आणि त्या सीमेपर्यंत ती कमी होईल तर त्यामुळे समाजाचे भलेच होईल. विद्या मुक्तीकरिता म्हणजे सेवेकरिता असली पाहिजे. ज्याच्या मनात सेवेची आकांक्षा असेल तो विद्या मिळवण्याचा प्रयत्न करीलच. त्याची विद्या त्याच्या समाजाकरिता आणि त्याच्याकरिता भूषणास्पद होईल. तेव्हा विद्येद्वारे पैसा मिळवण्याचा मोह कमी होईल. अशा परिस्थितीत विद्याभासाचा क्रमही बदलेल; विद्या मिळवण्याची आणि विद्या प्रदान करण्याची पद्धतही बदलेल. आज तर त्याचा भरपूर दुरुपयोग होतो आहे. या नवीन दृष्टिकोनाला मान्यता मिळाली तर विद्येचा दुरुपयोग किमान होईल.

यानंतरही स्पर्धेची शक्यता तर असेलच, परंतु ती स्पर्धा, चांगला होण्याकरिता, सेवावृत्ती वाढवण्याकरिता असेल. आणि प्रत्येकाला आजीविकेइतके मिळेल, तर असंतोष नाहीसा होईल, अंदाधुंदी नाहीशी होईल.

या विचारसरणीनुसार आज जो वर्णाचा चुकीचा अर्थ होतो आहे तो दूर व्हायला पाहिजे, स्पर्शास्पर्शता नाहीशी झाली पाहिजे, रोटी-बेटी व्यवहाराशी वर्णाचा जो निकटचा संबंध आहे तो नाहीसा झाला पाहिजे. कोणाबरोबर खावे, कोणाशी विवाह करावा याच्याशी वर्णाचा काहीही संबंध नाही. माणसाला जिथे आवडेल तिथे तो खाईल, जिथे त्याला प्रेमाने निमंत्रण मिळेल तिथे तो जाईल. स्त्रीपुरुषांना जिथे आपले श्रेय दिसेल तिथे ते विवाह करतील. सामान्यपणे विवाह एका वर्णातच होण्याची शक्यता आहे. परंतु दुसऱ्या वर्णात होत असेल तर ते पाप आहे असे समजता येत नाही. पापाचा निर्णय वेगळ्याच प्रकारे होईल. माणसाचा बहिष्कार वर्णामुळे नाही तर समाजामुळे होईल. समाजाचे नियम-कायदे आजपेक्षा अधिक चांगले असतील. त्यात ज्या घाणीने, पाखंडीपणाने घर केले आहे ती निघून जाईल.

# शेती

आश्रमात जी शेती होते ती मगनलालमुळेच होते हे सांगायलाच पाहिजे. शेतीशिवाय आश्रमाची परिस्थिती वराशिवाय वरातीसारखी झाली असती. तरीही शेतीत पडायची मला मुळीच हिंमत होत नव्हती. मला वाटत होते की ना तर आश्रमाजवळ शेतीचे कौशल्य आहे आणि ना तशी परिस्थिती आहे. शेतीचे काम एक फार मोठे साहस आहे आणि त्याकरिता बरीच जमीन, पैसे, माणसे हवी असतात. शेतीकडे लक्ष दिले तर दुसरी जी आवश्यक कामे आहेत असे समजले जात होते आणि जे पूर्ण करण्याची हिंमत होती, आणि जे थांबण्यासारखे नव्हते, त्यांना धक्का लागण्याची भीती होती. मगनलाल म्हणाला, “निदान माझ्या करमणुकीकरिता तरी शेती होऊ द्या.” मगनलाल माझ्याशी क्वचितच वाद घालायचा. मी जे सांगत असे त्यावर तो अंमल करायचा. धर्म तर तो पुरेपूर शिकला होता. जिथे त्याला कळत नसे वा जिथे त्याचे मत वेगळे असायचे तिथे तो मला सांगायचा. एवढ्यानंतरही मी जर माझ्या विचारावर दृढ राहिलो तर मी म्हणतो तेच बरोबरच असेल असे समजून तो आपल्या कामाला लागायचा. खरे सांगायचे तर शेतीशिवाय आश्रमाचे अस्तित्व असूच शकत नाही असे त्याचे मत होते. परंतु याकरिता त्याच्याशी वाद घालावा लागत होता. तसे न करता त्याने प्रेमाचा सर्वात मोठा युक्तिवाद केला आणि शेती सुरू झाली. आश्रमात जी झाडे आहेत ती एक तर मदनलालने लावली आहेत वा इतरांकडून लावून घेतली आहेत. शेतीबद्दल आजही माझ्या शंका कायम आहेत. आजही मी दावा करणार नाही की आश्रम शेती करतो. परंतु आश्रमात जी शेती सुरू आहे तिच्याकरिता मला दुःख नाही. तिच्यात पैसाही बराच खर्च झाला आहे. परंतु आजही शेती स्वावलंबी झाली आहे असे हिशेब करून दाखवता येऊ शकत नाही. असे जरी असले तरी जितकी शेती होते आहे तितकी आश्रमाच्या अस्तित्वाकरिता आवश्यकच होती असे वाटते. शेतीशिवाय आश्रम असूच शकत नाही. आश्रमाने स्वतःचा भाजीपाला तर निर्माण केलाच पाहिजे. मगनलालने गत काही वर्षात हे व्रतच घेऊन टाकले होते की आश्रमाच्या शेतीत जो काही भाजीपाला तयार होईल त्यानेच काम भागवीन. आश्रमात स्वतःला आवश्यक इतके धान्य आणि गवतही निर्माण करण्याइतकी शक्ती असलीच पाहिजे. शेती सुधारण्याचा मोह नसेलही, परंतु मी पाहतो की नाकाशिवाय शरीर जसे वाटेल तसा शेतीशिवाय आश्रम वाटेल. ही शेती अजून तरी प्रयोगाच्या स्वरूपातच आहे. शेतीच्या माध्यमातून कोणाला काही शिकवता येते असा दावाही करता येऊ शकत नाही. परंतु शेतीची बारीकसारीक माहिती कळण्याकरिता तर तिचा उपयोग आहेच. आश्रमाच्या जमिनीवर जिथे एकही झाड नव्हते तिथे आता अनेक झाडे झाली आहेत. भाजीपाला होतो, थोडी फळे होतात.

गवत-चारा होतो. मी आधीच सांगितल्याप्रमाणे माणसाची विष्टा खताच्या रूपात शेतीकरिता उपयोगात आणली जाते. आणि त्याचा फार चांगला परिणाम झाला आहे असेही सांगता येते.

शेती करण्याकरिता जुन्या आणि नवीन नांगरांचा उपयोग करण्यात आला आहे. पाणी ओढण्याकरिता त्याच योजना अवलंबिण्यात आल्या आहेत ज्या गावात चालू शकतात. असे सांगता येते की जुन्या अवजारांकडे आमचा कल राहिला आहे. गरीब शेतकऱ्यांकरिता ही अवजारे आदर्श आहेत असे वाटते. याचसंबंधात दुसरी गोष्ट अशी आहे की त्यांच्यात थोडा फेरबदल करता येऊ शकतो. परंतु यासंबंधात निश्चितपणे सांगता येईल असे परिणाम आतापर्यंत मिळू शकलेले नाहीत. याचे कारण त्याकरिता जितका वेळ दिला पाहिजे आणि जितकी बुद्धी लावली पाहिजे तितका वेळ अजून देऊ शकलो नाही.

## गोसेवा

आश्रमाचा आदर्श तर दुधाशिवाय भागवणे आहे. मांसाहार हा माणसाचा आहार नाही हे जसे आश्रमाचे मत आहे तसेच दुधासंबंधीही मत आहे. दुधातुपाशिवाय भागवण्याचा अतिशय जिद्दीने एक वर्ष प्रयोग केल्यानंतर तो अखेरीस थांबवावा लागला. आश्रमात पालनपोषण होणाऱ्या मुलांचे शरीर त्यामुळे अशक्त होऊ लागले. मोठी माणसेही अशक्त होऊ लागली. यामुळे हळूहळू तूप आणि त्यानंतर दूध सुरू करण्यात आले. हा निश्चय झाल्यानंतर आश्रमात गुरेढोरे ठेवण्याचा निर्णय अपरिहार्य झाला.

आश्रमाचा ‘गोरक्षा’ धर्मावर विश्वास आहे. ‘गोरक्षा’ या शब्दात अहंकारही आहे आणि ढोंगही आहे. माणूस गुराढोरांचा रक्षक होण्याकरिता असमर्थ आहे. ज्याला स्वतःचे रक्षण हवे असते तो इतरांचे रक्षण करू शकत नाही. सर्व प्राणिमात्रांचा एकमेव रक्षक परमेश्वरच आहे असा विश्वास असल्यामुळे आश्रमाने ‘गोरक्षा’ ऐवजी ‘गोसेवा’ शब्दाचा प्रयोग करणे पसंत केले. परंतु दूधतूप सोडून गोसेवा करण्याची आश्रमाची जी इच्छा होती ती पूर्ण होऊ शकली नाही. यामुळे गुरेढोरे पाळण्यात आली. सुरुवातीला स्पष्ट नव्हते की केवळ गाईबैल पाळणेच धर्म आहे. यामुळे गायी, बैल आणि आणि म्हशी ठेवल्या होत्या.

परंतु दिवसेंदिवस लक्षात येत गेले की आज तर केवळ गोसेवा करूनच सर्व मनुष्येतर प्राण्यांचे रक्षण होऊन जाते. गोसेवा तर माणसाच्या मार्गदर्शनाकरिता आहे. यापलीकडे जाण्याचे त्याच्याजवळ साधन नाही. आणि शिवाय हिंदु-मुसलमानांच्या भांडणाचे कारण गोवध होत असते. आश्रमाचा विश्वास आहे की,

मुसलमानांपासून बळजबरीने गाय हिसकून घेण्याचा हिंदूंना अधिकार नाही, आणि ना तो त्याचा धर्म आहे. दुसऱ्याकडून बळजबरीने गाय सोडवण्यात गोसेवा वा गोरक्षण नाही. उलट यामुळे गायीची हत्या लवकर होऊ शकते. गायीबद्दल आपले स्वतःचे कर्तव्य पार पाडून, आणि त्याद्वारे गायीचे मूल्य वाढवूनच हिंदू गोसेवा वा गोरक्षण करू शकतात. आजकाल हे काम हिंदू समाजाने सोडून दिले आहे. गायीची आवश्यकता कमीच वाटत असते. गायीपेक्षा म्हैस जास्त दूध देते. तिच्या दुधात तुपाचे प्रमाण जास्त असते. ती पाळण्यात खर्च कमी येतो. शिवाय म्हशीचे पाडस - पाडा असेल तर त्याची विशेष काळजी घ्यावी लागत नाही. याचे कारण म्हशीची सेवा करणे वा तिचे रक्षण करणे आपला धर्मच नाही. अशा प्रकारे हिशेब करून हिंदू समाजाने भित्रेपणा, अज्ञान आणि स्वार्थ यांमुळे गायीची उपेक्षा केली. आणि गायीला म्हशीची जागा दिली. असे करून त्याने दोघांचेही नुकसान केले आहे. म्हशीला पाळल्यामुळे म्हशीचाही लाभ होत नाही. म्हशीचे हित ती स्वतंत्र राहण्यात आहे. म्हैस पाळण्याचा अर्थ आहे पाड्याला दुःख देऊन मारणे. ही गोष्ट सर्व प्रांतांना लागू होत नाही. परंतु गुजरातेत पाड्याचा उपयोग शेतीत होत नाही. यामुळे त्याच्या नशिबी वाईट मृत्यूच लिहिलेला असतो.

यामुळे आश्रमाने म्हशीला काढून टाकले आहे आणि गाय, बैल पाळण्याचा आग्रह ठेवला आहे. गायीच्या वंशात सुधारणा करणे, वेगवेगळ्या प्रकारचा चारा देऊन तिचे दूध वाढवण्याच्या शक्यतेचा शोध घेणे, दूध अधिक काळ टिकण्याच्या कला शिकणे, त्यातून सहजपणे लोणी काढणे, वासरांना किमान त्रासाने खच्ची करणे इत्यादी गोष्टींकडे आश्रमात लक्ष देण्यात येत असते. सध्या तर या सर्व गोष्टी प्रयोग म्हणून सुरू आहेत. परंतु आश्रमाचे मत आहे की गायीचा पूर्ण उपयोग व्हावा आणि त्यात दयाभाव असावा. असे केले तर गाय ओझे होणार नाही.

आज कदाचित कोणाला कल्पना नसेल की गाय महाग पडत असते. ती महाग पडते म्हणूनच तिची हत्या होत असते. माणूस इतका परोपकारी नसतो की स्वतः मरून तो गायीला वाचवील. याचाच अर्थ गायीला आपला भक्षक होऊ देणे. आजच्या हिशेबाने पशूंची संख्या इतकी आहे की त्यांचे जर चांगल्या प्रकारे पालनपोषण करायचे असेल तर माणसाला स्वतःलाच खायला काही मिळणार नाही. ही गोष्ट बरोबर नाही हे सिद्ध करण्याकरिता हे सांगणे आवश्यक आहे की गायीबैलांचे चांगल्या प्रकारे पालनपोषण केल्याने त्याची उत्पादन शक्ती वाढू शकते. आश्रमाचे मत आहे की हे सिद्ध करून दाखवता येऊ शकते.

परंतु हे सिद्ध करण्याकरिता धर्माच्या नावावर जे अनेक भ्रम शिरले आहेत ते आधी मिटवले पाहिजे. हिंदू समाज गायींची हाडे, आतडे इत्यांदींचा उपयोग करत नाही. मेल्यानंतर गायीचे काय होते याची तो फिकीर

करत नाही. चांभाराचा व्यवसाय पवित्र मानण्याऐवजी अपवित्र मानण्यात येतो. इतर जनावरांची हाडे उपयोगात आणली जातील, परंतु गायीची नाही. आणि उपयोगात आणली जात असतीलही तरी तो उपयोग हिंदू समाजाने केलेला नसेल. गायीची अगदी हाडे दिसू लागल्यानंतर तिची जर ऑस्ट्रेलियात गेल्यानंतर कत्तल होत असेल, तिथून तिच्या हाडांचे खत तयार करून परत इथे येत असेल, तिच्या कातड्याचे जोडे तयार करून इथे येत असतील तर मात्र त्या सर्वांचा उपयोग केला जाईल. तिच्या मांसाचा अर्क औषध म्हणून येईल तर तोही आपण पिऊ!

असे केल्याने गायींचा नाश होतो, पैसे वाया जातात आणि धर्माच्या नावावर लूट चालते. यामुळे आश्रमात महत्प्रयासाने चांभाराचा धंदा सुरू करण्यात आला आहे. त्यात अजून कोणीही कौशल्य मिळवू शकलेला नाही. बाहेरून असा कोणीही चांभार मिळाला नाही की जो शिक्षित असेल आणि आश्रमाच्या नियमांचे पालन करू शकेल. एक आला होता, परंतु त्याला आम्ही ठेवू शकलेलो नाही. सामान्य चांभारांना वसवण्याचा प्रयत्नही अयशस्वी झाला. असे जरी असले तरी चांभाराचे काम आश्रमाचा एक भाग झाला आहे; आणि चरख्याप्रमाणेच या कलेचा प्रचार करून त्याला लोकप्रिय करण्याची आश्रमाला आशा वाटते. मेलेल्या गायीच्या शरीराच्या सर्व भागांचा जेव्हा उपयोग करण्यात येईल तेव्हाच गाय परवडेल हे याचे कारण कारण आहे. मग गाय ओझे होणार नाही. तिच्यापासून नफा तर कधीही होणार नाही. धर्म कधीही अर्थविरोधी नसतो. परंतु नफ्याच्या विरोधात तो नेहमीच राहिला आहे. परंतु गायीवर होणारा खर्च तिच्याकडून काढायचा असेल तर आज ज्या प्रकारे तिच्या मृत शरीराचा दुरुपयोग होतो आहे वा ज्या प्रकारे व्यापाऱ्याचा व्यापार वाढवण्याकरिता त्याचा उपयोग होतो तो बंद व्हायला पाहिजे. हे बळजबरीने बंद करता येऊ शकत नाही. परंतु हिंदू समाज गायीला आपल्याजवळ ठेवेल, ती जिवंत असताना तिचे आणि तिच्या संततीचे चांगल्याप्रकारे पालनपोषण करील, म्हातारपणी तिची काळजी घेईल आणि मेल्यानंतर तिच्या शरीराचा पूर्ण उपयोग करील तर गायीचे रक्षण होऊ शकते आणि तिचे रक्षण करत असताना प्राणिमात्रांचे रक्षण करणे आपण शिकू. आज तर आपले अज्ञान, आळस आणि द्वेष यामुळे गायीची हानी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. मग इतर पशूंची गोष्टच काय?

आश्रमाचे मत आहे की जितक्या गोशाळा आणि पांजरपोळ असतील त्यांचा धार्मिक आणि शास्त्रीय उपयोग व्हावा. श्रीमंतांनी गोशाळा चालवावी आणि गायीच्या दुधातुपाच्या उपयोगाचा आग्रह ठेवावा. तसेच

गायीच्या दुधाचा व्यापार निषिद्ध समजून सार्वजनिक गोशाळा अशा प्रकारे चालवाव्या की त्यांचे उत्पन्न आणि खर्च बरोबर होतील. असे झाले तर गायीचे रक्षण होऊ शकते.

सध्या तर आश्रमाचा हेतू लहान आहे - आश्रमात आदर्श गोशाळा चालवणे, गायीबैलांचा विकास करणे, आणि मेल्यानंतर त्यांच्या शरीराचा उपयोग केला तर गायबैल ओझे होत नाहीत आणि गोशाळेचा खर्च अंगावर पडत नाही हे सिद्ध करणे, गोशाळा चालवत असताना गोसेवक तयार करणे आणि ते तयार झाल्यानंतर त्यांच्या सेवेचा उपयोग करणे. सध्या हे काम सुरू आहे. यात अनेक अडथळे आहेत, परंतु यात यश मिळेल अशी पूर्ण खात्री वाटते.

## शिक्षण

इथे शिक्षण या शब्दाचा विशेष आणि साधारण अशा दोन्ही अर्थांनी उपयोग केला आहे. या शिक्षणाच्या प्रयोगात आश्रमाची जितकी परीक्षा झाली आहे तितकी अजून कशातही झाली नाही.

आश्रमाची स्थापना होताच माझ्या लक्षात आले की आश्रमात राहणाऱ्या स्त्रियांना आणि मुलांना शिकवणे आश्रमाचा धर्म आहे. पुढे चालून असेही लक्षात आले की आश्रमात जे अशिक्षित पुरुष येतात त्यांच्याकरिताही अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे. जे लोक आश्रमात आहेत ते या कामाची पूर्ती करू शकणार नाही याचीही स्पष्ट जाणीव झाली. शिकवू शकणाऱ्या लोकांना आश्रमाकडे आकर्षित करण्याची किंचितही आशा ठेवायची असेल तर ब्रह्मचर्याच्या नियमाचे इतक्या कडकपणे पालन करण्याची अपेक्षा करता येत नाही असेही लक्षात आले. यामुळे आश्रमाचे दोन भाग करण्यात आले - एक शिक्षक विभाग आणि दुसरा आश्रम विभाग. त्याकरिता इमारतीही वेगवेगळ्या बांधण्यात आल्या.

मानवप्राणी आपला स्वभाव एकाएकी कसा सोडू शकतो. खूप प्रयत्न केल्यानंतरही हे दोन विभाग सुरू होताच उच्च आणि नीच भावनेचे विष पसरू लागले. 'आश्रम विभागाच्या' लोकांना अभिमान वाटू लागला. शिक्षक विभाग हे कसे सहन करणार होता? हा अभिमान आश्रमाच्या उद्दिष्टाविरुद्ध होता. यामुळे तो असत्य होता. परंतु पूर्ण ब्रह्मचर्याचे पालन आवश्यक असेल तर हे विभागही स्वाभाविक होते. पूर्ण ब्रह्मचर्याचा ठसा उमटलेल्यांनी स्वतःला उच्च मानण्याचे तर काही कारण नव्हते. परंतु असेही तर होऊ शकत होते की पूर्ण ब्रह्मचर्याचा दावा आणि पालन करणारांच्या मनातून म्हणजे विचारातून पतन होत असेल आणि ब्रह्मचर्चाचा

दावा न करणारे, परंतु ते आवडणारे लोक आपल्या प्रयत्नामुळे दिवसेंदिवस उच्च पातळीवर जात असतील. बुद्धीने ह सर्व कळत होते, परंतु त्यावर अंमल करणे सर्वांकरिता कठीण झाले असावे.

घसरणीचे हे एक कारण तर होतेच. अजून दुसरे एक कारण निर्माण झाले. शिक्षणाच्या पद्धतीबद्दल मतभेद निर्माण झाले. आणि त्यामुळे आश्रमाच्या व्यवस्थेत अडचणी निर्माण होऊ लागल्या. अनेक वादविवाद झाले, अनेक झंझटी निर्माण झाल्या, विष निर्माण झाले, लोक हताश झाले. इतके झाल्यानंतरही अखेरीस सर्व शांत झाले, वा एकमेकांना सहन करू लागले. यात मला आश्रमाचा वा सत्याचा विजय जाणवला. मतभेदवाल्यांच्या मनात किल्मिष नव्हते. कोणीही घाणेरड्या चालबाजीत पडला नव्हता. जे मतभेद होत असत त्यांच्याबद्दल त्यांना वाईट वाटत असे. प्रत्येकाची इच्छा सत्याच्या मार्गावर चालण्याची होती. आपापल्या मतामुळे समोरच्याला समजून घेण्यात अपयश येत असे. यामुळे मनात क्लेष आणि उद्वेग होता. यावरूनच आश्रमवासीयांमध्ये परस्परांबद्दल किती उदाऱपणाची भावना आहे याची परीक्षा होत होती.

कोणते शिक्षण द्यावे आणि ते किती वेळ द्यावे यासंबंधात आश्रमात खूप चर्चा झाली. आम्ही अंतिम निर्णयावर पोहोचलो असा दावा अजूनही करता येत नाही. या विषयाचे माझे स्वतःचे विचार वेगळे आहेत. माझ्या सहकाऱ्यांना मी माझे मत पटवू शकलो असे मी म्हणू शकत नाही. यामुळे आश्रमाचा शिक्षणासंबंधी निश्चित आदर्श काय आहे हे मी सांगू शकत नाही.

माझे शिक्षणासंबंधी विचार असे आहेत -

१. मुलामुलींना सहशिक्षण दिले पाहिजे. ही बाल्यावस्था आठवर्षांपर्यंत समजली जावी.

२. त्यांचा वेळ प्रामुख्याने शारीरिक कार्यात जायला पाहिजे. आणि हे कार्यही शिक्षकाच्या देखरेखीत व्हायला पाहिजे. या शारीरिक कार्यालाही शिक्षणाचा एक भागच समजायला पाहिजे.

३. प्रत्येक मुलामुलीला त्याची स्वतःची आवडनिवड पाहून काम सोपवायला पाहिजे.

४. प्रत्येक काम घेत असताना त्याच्या कारणाची माहिती दिली पाहिजे.

५. मुलाला वा मुलीला कळू लागते तेव्हापासूनच त्यांना सामन्य ज्ञान दिले पाहिजे. त्याचे हे ज्ञान अक्षर ज्ञानाआधी सुरु व्हायला पाहिजे.

६. अक्षरज्ञानाला सुंदर लेखन कलेचा भाग समजून आधी मुलांना भूमितीतील आकृत्या काढायला शिकवले पाहिजे. आणि जेव्हा त्यांच्या बोटांना सवय होईल तेव्हा त्यांना वर्णमाला शिकवली पाहिजे. म्हणजेच सुरुवातीपासूनच उत्तम अक्षर लिहिणे शिकवण्यात यावे.

७. लिहिण्याआधी मुलाने वाचणे शिकायला पाहिजे. म्हणजे अक्षराला चित्र समजून ते ओळेखणे शिकायला पाहिजे. आणि मग त्याने अक्षरांचे चित्र काढावे.

८. या पद्धतीने जो मुलगा शिकेल त्याला वयाच्या आठ वर्षांपर्यंत आपल्या शक्तिनुसार बरेच ज्ञान यायला पाहिजे.

९. मुलाला बळजबरीने शिकवू नये.

१०. ते जे शिकतात त्यात त्यांना रस वाटलाच पाहिजे.

११. मुलांना शिक्षण खेळासारखे वाटले पाहिजे. खेळसुद्धा शिक्षणाचा आवश्यक भाग आहे.

१२. मुलाचे सर्व शिक्षण मातृभाषेतून व्हायला पाहिजे.

१३. मुलांना हिंदू-उर्दूचे ज्ञान राष्ट्रभाषा म्हणून दिले पाहिजे. त्याची सुरुवात आधी अक्षरज्ञानापासून झाली पाहिजे.

१४. धार्मिक शिक्षण आवश्यक समजण्यात यावे. ते पुस्तकातून नाही तर शिक्षकाच्या तोंडून आणि त्याच्याच व्यवहारातून मिळाले पाहिजे.

१५. नऊ ते सोळा वर्षाचा काळ हा शिक्षणाचा दुसरा कालखंड आहे.

१६. या दुसऱ्या काळातही शक्यतोवर मुलामुलींना सहशिक्षण देण्यात यावे.

१७. दुसऱ्या कालखंडात हिंदू मुलांना संस्कृतचे ज्ञान मिळाले पाहिजे, आणि मुसलमान मुलांना अरबीचे.

१८. या काळातही शारीरिक कार्य सुरू राहिलेच पाहिजे. अक्षरज्ञानाचा काळ आवश्यकतेनुसार वाढवला पाहिजे.

१९. या काळात आईवडिलांचा व्यवसाय जर निश्चित असेल तर तो शिकवला पाहिजे. आणि तो मुलाला अशा प्रकारे शिकवला पाहिजे की त्याला आईवडिलांच्या व्यवसायाच्या आधारे आपला उदरनिर्वाह करणे आवडले पाहिजे. हा नियम मुलींना लागू होत नाही.

२०. सोळा वर्षाच्या वयापर्यंत मुलामुलींना जगाच्या इतिहास-भूगोलाचे आणि वनस्पतिशास्त्र, खगोलशास्त्र, गणित, भूमिती आणि बिजगणिताचे सामान्य ज्ञान झाले पाहिजे.

२१. सोळा वर्षांच्या मुला-मुलींना शिवणकाम आणि स्वयंपाक करणे आले पाहिजे.

२२. सोळा ते पंचवीस वयाचा काळ मी शिक्षणाचा तिसरा कालखंड समजतो. या काळात प्रत्येक युवक-युवतीला त्यांच्या त्यांच्या इच्छेनुसार आणि परिस्थितीनुसार शिक्षण मिळाले पाहिजे.

२३. नऊ वर्षानंतर होणारे शिक्षण स्वावलंबी असले पाहिजे. याचा अर्थ विद्यार्थ्यांने शिकत असताना त्याच्या उत्पन्नाने त्याच्या पाठशाळेचा खर्च निघायला पाहिजे.

२४. पाठशाळेच्या उत्पन्न तर सुरुवातपासूनच सुरू झाले पाहिजे. परंतु सुरुवातीच्या वर्षांत खर्चाइतके उत्पन्न होणार नाही.

२५. शिक्षकांचा पगार फार जास्त असू शकत नाही. परंतु त्यांना जीविकेइतके तर त्याला मिळायलाच पाहिजे. त्यांच्यात सेवावृत्ती असली पाहिजे. प्राथमिक शिक्षणाकरिता कशाही प्रकारच्या शिक्षकाकडून काम भागवण्याची वृत्ती वाईट आहे. शिक्षकांनी चारित्र्यसंपन्न असायलाच पाहिजे.

२६. शिक्षणाकरिता मोठमोठ्या इमारतींची गरज नाही.

२७. इंग्रजीचे शिक्षण एक भाषा म्हणूनच होऊ शकते, आणि तिला पाठ्यक्रमात जागा मिळाली पाहिजे. जशी हिंदी राष्ट्रभाषा आहे तसाच इंग्रजीचा उपयोग परराष्ट्राशी व्यवहार आणि व्यापार यांच्याकरिता होतो.

यात सर्वसामान्य शिक्षणाबद्दलचे माझे सर्व विचार येतात. स्त्रियांचे विशेष शिक्षण केव्हापासून आणि कसे सुरू करायचे याबद्दल मी अजून निश्चित नाही. परंतु जितक्या सोयी मुलांना मिळतात तितक्याच मुलींनाही मिळाल्या पाहिजे. आणि जिथे विशेष सुविधेची आवश्यकता आहे तिथे विशेष सुविधाही मिळाली पाहिजे.

निरक्षर प्रौढ स्त्री-पुरुषांना रात्रीच्या वर्गांची आवश्यकता निश्चितच आहे. परंतु माझे मत असे आहे की त्यांना अक्षरज्ञानही असले पाहिजे. त्यांच्याकरिता व्याख्यानांद्वारे सामान्यज्ञान मिळवता येण्याची विशेष व्यवस्था असली पाहिजे आणि ज्यांना अक्षरज्ञान मिळवण्याची इच्छा असेल त्यांच्याकरिता तशी विशेष सुविधा असली पाहिजे.

माझ्या म्हणण्याचा असा अर्थ नाही की या सगळ्या गोष्टीत माझ्या सहकाऱ्यांशी माझे मतभेद आहेत. परंतु काही बाबतीत सूक्ष्म मतभेद आहेत. यामुळेच वरीच विचार माझे म्हणून मी सांगितलेले आहेत. आश्रमात या संबंधात आम्ही जितके काही प्रयोग केले आहेत त्यावरून आम्ही कोणत्या तरी निश्चित निर्णयावर पोहोचलो

आहो असे म्हणता येत नाही. हं, एका गोष्टीसंबंधात आम्हा सर्वांचे एकमत आहे, आणि ती ही की शिक्षणात उद्योगाला, आणि विशेषेकरून कताईला मोठे स्थान मिळाले पाहिजे. बहुतांश शिक्षण स्वावलंबी असले पाहिजे आणि ते ग्रामीण जीवनाला पोषक आणि त्याच्याशी संबंधित असले पाहिजे.

माझ्या मते शिक्षणासंबंधात आश्रमाला जास्तीत जास्त यश स्त्रीशिक्षणासंबंधात मिळाले आहे. तो असा की शिक्षणामुळे आश्रमातील स्त्रियांमध्ये जी स्वातंत्र्याची आणि आत्मविश्वासाची भावना निर्माण झाली आहे ती तितक्याच काळात आणि त्याच वर्गाच्या स्त्रियांमध्ये इतरत्र पाहायला मिळत नाही. याचे कारण आश्रमातील वातावरण आहे. आश्रमात असा कोणताही अंकुश ठेवण्यात आलेला नाही जो पुरुषांवरही नसेल. स्त्रियांच्या मनात स्वातंत्र्याचा विचार आधीच भरण्यात आलेला होता. कामात सर्वांना सारखाच भाग घ्यावा लागत असतो. एखादे विशिष्ट काम स्त्रीचेच आहे आणि पुरुषांनी ते करूच नये अशा फरक करण्यात आलेला नाह. स्वयंपाकाच्या कामात दोघांनीही भाग घेतला आहे आणि आताही भाग घेत असतात. शारीरिक श्रमाचे जे काम स्त्री करूच शकत नाही त्या कामापासून तिला मुक्त ठेवण्यात आले आहे. हे वगळता असा एकही उद्योग नाही की ज्यात स्त्रीपुरुष दोघेही काम करत नाहीत. पडदा वा घुंघट यासारखी कोणतीही गोष्ट आश्रमात नाही. अशा प्रकारे आश्रमाचे वातावरण असे काही झाले आहे की स्त्री कुठूनही आलेली असो, आश्रमात येताच तिला वेगळ्याच प्रकारचे स्वतंत्र वातावरण अनुभवायला मिळते आणि ती स्वतःला निर्भय समजू लागते. माझा विश्वास आहे की यात ब्रह्मचर्याचा फार मोठा हात राहिला आहे. मोठ्या वयाच्या मुलीही कुमारिका आहेत. आश्रमात राहणाऱ्या आम्हा सर्वांना कल्पना आहे की हा प्रयोग धोक्याने भरलेला आहे. परंतु अशा प्रकारची जोखीम पत्करल्याशिवाय स्त्रियांची जागृती अशक्य आहे असे वाटते.

ज्या प्रकारे अस्पृश्यता मिटवणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे स्त्रियांच्या बाबतीत काही भ्रम, मते आणि पद्धती नाहिश्या करण्याची आवश्यकता आहे. बालविवाह, प्रत्येक मुलीने लग्न केलेच पाहिजे असे मान्य करणारा धर्म, मासिक पाळी सुरू होण्यापूर्वी लग्न करण्याची आवश्यकता, विधवेवर पुनर्विवाह न करण्याकरिता समाजाने घातलेले बंधन वगैरे प्रथा जोपर्यंत बंद होत नाहीत तोपर्यंत स्त्री पुढे जाऊ शकत नाही. या दृष्टीने स्त्री आश्रमात येताच तिला शिक्षण दिले जाऊ लागते की वरीच प्रथा खोट्या आणि धर्मविरोधी आहेत. स्त्रिया या विचारांची अमंलबजावणी होत असताना पाहत असतात, यामुळे त्यांना धक्का लागत नाही. तसेच त्यांना असेही वाटत नाही की या सर्व गोष्टी इतरांना शिकवण्याकरिता आहेत.

ज्याला आपण सामान्यपणे शिक्षण समजतो तसे शिक्षण आश्रमात कमीच दिसेल. इतक्यावरूनही मी सांगू शकतो की मुलांपासून तर वद्धांपर्यंत सर्व स्त्रीपुरुषांमध्ये शिक्षणासंबंधात इच्छा जागृत झाली आहे, ज्ञान मिळवण्याची इच्छा वाढत चालली आहे आणि याकरिता वेळ मिळत नसल्याच्या तक्रारीही वाढत चालल्या आहेत. हे शुभ चिन्ह आहे असे मला वाटते. आश्रमात येणारे लोक शिक्षणात रस नसलेले वा शिकलेले असतातच असे नाही. बहुतेकांना मुश्किलीने लिहिणे वाचणे येत असते. बाहेर तर त्यांना यापुढे जाण्याची आकांक्षासुद्धा नसते. आश्रमात थोडा काळ घालवल्यानंतर अक्षरज्ञान मिळवण्याची आकांक्षा निर्माण झाली. जी संस्था इतके करू शकते तिचा मार्ग सुलभ होतो. याचे कारण पहिली पायरी तर शिक्षणासंबंधीची उत्कंठा निर्माण करणेच असते. आश्रमात येणारात ही उत्कंठा लगेच निर्माण होते. ही उत्कंठा पूर्ण करण्याकरिता आश्रम आवश्यक तितक्या सुविधा उपलब्ध करून देऊ शकत नाही याचे मला दुःख नाही. आश्रमाच्या नियमांमुळे असे लोक कदाचित पुरेशा प्रमाणात कधीच येणार नाहीत की जे शिक्षणाचे कामही करतील आणि आश्रमाच्या कामातही भाग घेतील. यामुळे आश्रमात या कामाकरिता जे लोक तयार होतील त्यांच्यावरच आश्रमाला समाधान मानावे लागेल. परंतु असेही होऊ शकते की आश्रमाच्या कामाकाजामुळे असे शिक्षक तयारच होणार नाहीत, वा ते तयार होण्यात फार वेळ लागेल. असे जरी असेल तरी ज्यांच्यात ज्ञान मिळवण्याची उत्कंठा जागृत झाली आहे ते नंतर तरी ते ज्ञान मिळवतीलच. शिक्षणाकरिता वेळेची कोणतीही सीमा नाही. खरे शिक्षण तर शाळा सोडल्यानंतरच सुरू होत असते. ज्याला त्याचे महत्त्व कळले आहे ते तर सदैव विद्यार्थीच असतात. आपल्या कर्तव्याचे पालन करत असताना आणि त्या कर्तव्याचे पालन करण्याकरिता माणसाच्या ज्ञानात वृद्धी व्हायलाच पाहिजे. जो सर्व काम समजूनउमजून करतो त्याचे ज्ञान रोज वाढायलाच पाहिजे. आणि ही गोष्ट आश्रमाला चांगल्या प्रकारे कळली आहे.

शिक्षणाच्या प्रगतीत एक गोष्ट अडथळा आणणारी आहे. शिक्षकाशिवाय शिक्षण घेता येऊच शकत नाही हा भ्रम समाजाची बुद्धी कुंठित करतो. माणसाचा खरा शिक्षक तर तो स्वतःच असतो. आजकाल तर स्वयंशिक्षणाची साधने खूप वाढली आहेत. मेहनत केली तर माणसाला बऱ्याचशा गोष्टीचे ज्ञान मिळू शकते, आणि जिथे शिक्षकाची गरज असते तिथे माणूस स्वतःकरिता शिक्षकाचा शोध घेतोच. अनुभव सर्वात मोठी पाठशाळा आहे. अनेक व्यवसाय असे आहेत की जे शाळेत शिकवलेच जात नाहीत. ते व्यवसाय तर त्या व्यवसायांशी संबंधित दुकानात वा कारखान्यात शिकवले जात असतात. पाठशाळेतील ज्ञान तर अनेकदा

पोपटासारखे असते. पुस्तकांमध्ये तर व्यवसायाबाहेरचे ज्ञान मिळत असते. यामुळे प्रौढांकरिता तर शाळेऐवजी इच्छाशक्तीची, उत्कंठेची, आत्मविश्वासाची आवश्यकता जास्त असते.

मुलांचे शिक्षण आईवडिलांचा धर्म आहे. असा विचार केला तर शाळांपेक्षा खरे वातावरण निर्माण करण्याची जास्त आवश्यकता आहे. असे वातावरण निर्माण होताच जिथे शाळेची गरज असेल तिथे ती आपोआप उभी राहील.

आश्रम या दृष्टीने शिक्षणाचे काम करतो आहे. आणि या दृष्टीने विचार केला असता काही प्रमाणात यशही चांगले मिळाले आहे.

## सत्याग्रह

आश्रमातील विविध कामकाजांचे वर्णन इथे बहुतांशाने आहे. आश्रमाचा उद्देश सत्याच्या आग्रहाद्वारा सत्याचा शोध घेणे आहे. आणि असा आग्रह असताना जेव्हा सत्याग्रहाच्या शस्त्राचा प्रयोग करावा लागतो तेव्हा आश्रमाने त्या शस्त्राचा प्रयोग करावा आणि त्याच्या नियमांचा मर्यादांचा शोध घ्यावा. सामान्यपणे याचे नियम काय असायला पाहिजे याचीही चर्चा इथे झालेली आहे.

परंतु याच्या मर्यादा काय आहेत? या शस्त्राचा तीव्र उपयोग केव्हा करता येऊ शकतो? माणसाने नेहमी सत्यावर अढळ राहणे म्हणजे सत्याग्रह. इथे या सत्याग्रहाची चर्चा नाही, चर्चा त्या सत्याग्रहाची आहे ज्याचा शस्त्र म्हणून दुसऱ्याच्या विरोधात उपयोग करण्यात आला आहे.

असा सत्याग्रह सहकाऱ्यांच्या विरोधात, समाजाच्या विरोधात, राज्याच्या विरोधात, सगळ्या जगाविरुद्ध होऊ शकतो. याच्या मुळात . . .

(हा इतिहास यापुढे लिहिला गेला नाही.)

* * * * *